म ग्र स वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र २४०५
IRBK-0102405
IRBK-0102405
IRBK-0102405

२८०५.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

17 APR 1981

21 JAN 1975

23 MAR 1975

20 DEC 1979

शरत्-साहित्य माला—२

कथा ६८
ग्र० क्र०
२४०५

# चार मिनार

[ डॉ. शरच्चन्द्र चतर्जींच्या मूळ बंगाली वरून ]

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र २४०५ नों. दि ..............
वि. का.प. ..............

: अनुवादक :

यशवन्त तेंडुलकर

प्रस्तावना लेखक

श्री. अनंत काणेकर

IRBK-0102405

IRBK-0102405

: प्रकाशक :

नवभारत प्रकाशनसंस्था, मुंबई ४.

प्रकाशकः—
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशन संस्था,
६, केळेवाडी, मुंबई ४.

पुनर्मुद्रण जानेवारी १९४६

किंमत १॥ रुपया

मुद्रक—
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, मुंबई नं. ४.

# प्रस्तावना

रवींद्रनाथ टागोर आणि शरच्चंद्र चट्टोपाध्याय हीं वंगवाङ्मयांतलीं दोन नांवें महाराष्ट्रांत तरी आतां सर्वतोमुखीं झालेलीं आहेत. टागोरांची कीर्ति अधिक मोठी असली तरी, मला वाटतें, मराठी वाचकवर्गांत शरद्‌बाबूच अधिक लोकप्रिय आहेत. आणि त्याचें कारण उघड आहे. शरच्चंद्रांच्या गोष्टी काय, किंवा कादंबऱ्या काय, अधिक साध्या आणि समजावयाला अधिक सोप्या आहेत. म्हणूनच त्यांच्या कांहीं गोष्टींचीं आणि कादंबऱ्यांचीं मराठींत दोन दोन तीन तीन भाषांतरें झालीं आहेत. या दृष्टीनें शरच्चंद्रांचें संपूर्ण वाङ्मय एका मालेच्या रूपानें मराठींत आणण्याच्या या प्रयत्नाचें मराठी वाचक मनःपूर्वक स्वागत करतील यांत शंका नाहीं.

'चार मिनार' हें या मालेंतील दुसरें पुस्तक होय. 'सीमा' 'विलासिनी' 'बाल्यस्मृति' आणि 'हरिचरण' या चार लघुकथा या पुस्तकांत आहेत. 'सीमा' ही पहिली गोष्ट चांगली पन्नास पानांची असली, तरी तीही एक दीर्घ लघुकथा आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं. या चारही गोष्टींत शरद्‌बाबूंनीं बंगाली मध्यमवर्गाच्या कौटुंबिक जीवनांचीं साधीं, पण हृद्य चित्रें रेखाटलीं आहेत. प्रतिभावान् लेखकाला आपल्या आजूबाजूच्या सामान्य जीवनांतही मनुष्यस्वभावाचे किती विविध आणि वैचित्र्यपूर्ण नमुने मिळूं शकतात, हें या गोष्टी वाचल्याबरोबर तावडतोब ध्यानांत येतें. उत्तम लघुकथेला एखादा लेखक, संपादक किंवा कॉलेजचा तरुणच नायक लागतो असें नाहीं 'सीमें'तला तेरा वर्षांचा खट्याळनायक रामलाल याच्या उनाडक्या, त्याची वडील भावजय निरुपमा हिची त्याच्यावरील मातृवत् माया, किंवा तिच्या म्हाताऱ्या आईचा रामलालविरुद्ध हेवादावा, याही गोष्टी कांहीं कमी हृदयस्पर्शी होऊं शकत नाहींत.

'विलासिनीं'त मृत्यूंजय नांवाचा एक खेडवळ ब्राह्मण मुलगा एका शूद्र मांत्रिकाच्या मुलीच्या प्रेमांत सांपडल्यामुळें जातपात सगेसोयरे सोडून स्वतः मांत्रिक कसा होतो, याचें जितकें उपरोधिक तितकेंच हृदयद्रावक वर्णन शरदबाबूंनीं केलें आहे. मृत्यूंजयासारख्या वेडगळ, सर्वांनीं टाकलेल्या मुलावरचें गरीब विलासिनीचें निःसीम प्रेम, खेडवळ सनातन्यांनीं क्रूरपणें केलेला तिचा छळ आणि शेवटीं तिनें केलेली आत्महत्त्या सहृदय वाचकाच्या डोळ्यांतून पाणी आणल्यावांचून रहाणार नाहींत. 'बाल्यस्मृति'

आणि ' हरिचरण ' या दोन गोष्टींत घरकाम करणाऱ्या दोन सालस नोकरांचीं चित्रें रंगविलीं आहेत, घरांतले नोकर हींही माणसें असतात याची चांगल्या चांगल्या लोकांनाही शुद्ध नसते, या जुन्याच पण नेहमीं विसरल्या जाणाऱ्या सत्यावर शरद्‌बाबूंनीं यांत विदारक प्रकाश पाडला आहे.

तंत्राच्या दृष्टीनें पाहातां सर्वच गोष्टी अगदीं सैल आणि ' बाबाशाही ' वळणाच्या आहेत. पण आधुनिक लघुकथेची कसोटी यांना लावणें अन्यायाचें आहे असें मला वाटतें. तंत्र कसेंही असलें तरी गोष्टी वाचनीय आहेत यांत शंका नाहीं. मात्र केवळ त्या एका प्रथितयश बंगाली लेखकाच्या आहेत म्हणून पहिल्या दर्जाच्या आहेत असें मी मुळींच म्हणणार नाहीं मानवी स्वभावाच्या एखाद्या गूढावर त्यांत कांहीं प्रकाश पाडला आहे, किंवा जीवनाच्या एखाद्या विशिष्ट तत्त्वज्ञानाची त्यांत चमक दिसते आहे असें मुळींच नाहीं. बहुतेक ठिकाणीं भावनाविवशतेचा ( Sentimentaity ) अतिरेक आहे. अशा प्रकारच्या इतक्या किंवा यापेक्षांही चांगल्या गोष्टी हरिभाऊ आपटे, मामा वरेरकर किंवा य. गो. जोशी यांनीं मराठींत लिहिल्या आहेत. दुय्यम किंवा तिय्यम दर्जाच्या गोष्टी नी कादंबऱ्या लिहिणाऱ्या मुनशी प्रेमचंदांसारख्या हिंदी लेखकाच्या किंवा एखाद्या बंगाली लेखकाच्या वाङ्मयाकडे बोट दाखवून ' असें वाङ्मय आमच्याकडे कधीं होणार ? ' म्हणून उगाच गळा काढून रडण्याची सांथ अलिकडे फार बोकाळते आहे, म्हणून मी हें मुद्दाम लिहित आहें. या लेखकांच्या इतकीं भाराभर पुस्तकें लिहिणारे लेखक मराठींत नसतील, पण तितक्या किंवा त्याहून वरचढ गुणांचीं पुस्तकें लिहिणारे लेखक मराठी भाषेंत होऊन गेले, आणि आहेतही. असो.

श्री. यशवंत तेंडुलकर यांची भाषा साधी आणि समर्पक आहे. ' चन्द्रनाथ ' पेक्षांहि त्यांचें हें भाषांतर अधिक सरस उतरलें आहे. ' संपूर्ण शरचंद्रा ' चे पुढील भाग असेच एकाहून एक सरस निघतील अशी आशा आहे.

अनंत काणेकर.
६-१-३९.

# सीमा

## १

रामलालचें वय तर कमी होतें; पण त्याची दुष्टबुद्धि कमी नव्हती. गांवांतील लोक त्याला भीत असत. कधीं, कुठून नि कशा रीतीनें येऊन ती पीडा छळील याचा नेम नसे. त्याचा सावत्र वडील भाऊ श्यामलाल याला देखील अगदींच शांत स्वभावाचा म्हणतां येणार नाहीं. परंतु इतकें खरें कीं, क्षुल्लक कारणावरून कठोर शिक्षा करणारा तो नव्हता. गांवच्या जमीनदार-कचेरींत तो कारकुनाचें काम पाही, आणि आपल्या शेतीभातीचीही देखरेख ठेवी. त्याची सांपत्तिक स्थिति बरी होती. तळी, बाग, आगर, दहाबारा बाग्दी जातीचीं कुळें व थोडी मायाही त्यानें जवळ केली होती. त्याची बायको निरूपमा इकडे सासरीं येऊन नांदूं लागली त्याच वर्षी,–तेरा वर्षांमागची गोष्ट–रामची विधवा आई निवर्तली. ती अडीच वर्षांचा तान्हा राम नि प्रपंचाचा पसारा, आपली तेरा वर्षांची तरुण सून निरूपमा हिच्या पदरांत टाकून गेली.

यंदा चोंहींकडे तापाची भयंकर सांथ आली होती. निरूपमेलाही ताप भरला. तीनचार गांवांत मिळून एक तेवढे अर्धवट शिकलेले नीलमणी सरकार डॉक्टर, आणि त्यांची फी तर यावेळीं रुपयाची दोन रुपये झालेली. तशांत त्यांच्या क्विनाईनच्या पुड्याहि आरारुटची बुकी मिसळल्यामुळें स्वादिष्ट बनल्या होत्या. सात दिवस होऊन गेले. पण निरूपमेचा ताप किंचितही कमी झाला नाहीं. तेव्हां श्यामलाल काळजींत पडला.

घरची मोलकरीण नृत्यकाली डॉक्टरला बोलावण्यास गेली होती. ती हिरमुसल्या तोंडानें परत येऊन म्हणाली, " डाक्टरसाहेब आज परगांवीं जाणार; आतां त्यांची फी चार रुपये झालीय्,—ते येऊं शकणार नाहींत. "

श्यामलाल रागावून म्हणाला, " अग, आम्ही देखील दिले नसते का चार रुपये ? पैसा अधिक कीं प्राण अधिक ? जा, घेऊन ये त्या चांडाळाला ! "

घरांतून हें संभाषण ऐकून क्षीण स्वरांत निरूपमा म्हणाली, " इतके घाबरतां कशाला ! डॉक्टर आज नाहीं येत, तर उद्यां येईल. आणखी एक दिवस लागला म्हणून काय बिघडतं ? "

रामलाल अंगणांतील एका कोपऱ्यांत पेरूखालीं पक्ष्यांसाठीं पिंजरा बनवीत बसला होता. तो उठून आला आणि म्हणाला, " तूं थांब ग नृत्या, मी जातों. "

दिराचे शब्द कानीं पडतांच निरूपमा दचकून उठली आणि म्हणाली, " ऐकलंत का ! रामला अडवा—ए राम, तुला माझ्या गळ्याची शपथ आहे जाशील तर. सोन्या कसा रे तूं ! भांडूं नये बाळ. "

रामनें तिच्या बोलण्याकडे लक्षच दिलें नाहीं. बाहेरच्या बाहेर तो चालूं लागला. तेव्हां इतका वेळ हातांत कामट्या धरून बसलेला त्याचा पांच वर्षांचा पुतण्या त्याला विचारूं लागला, "काका, पिंजरा नाहीं का बनवणार ?"

"बनवूं रे !" असें म्हणून राम चालता झाला.

मग कपाळांवर हात मारून स्फुंदत स्फुंदत निरूपमा नवऱ्याला उद्देशून म्हणाली, "त्यालं जाऊं कां दिलेत ? आतां पहा काय प्रताप गाजवून येतो तें"

श्यामलाल वैतागला होता. तो जास्तच चिडून म्हणाला, "मी काय करूं ! तुलाही ज्यानं जुमानलं नाहीं, तो आमच्या आडवण्यानं थोडाच थांबला असता ?"

"हात कां नाहीं पकडलेत ? छे ! जगेन म्हणावं तरी ही एक कटकट मागं लागलेली;—यापेक्षां मरण पुरवलं ! जा ग वाई नृत्या, उभी राहूं नकोस. भोळाला दवड; गोडीगुलावीनं त्याला परतून आणूं दे. अजून गोठ्यापर्यंत देखील गेला नसेल तो कदाचित्."

नृत्यकाली भोळाला शोधण्यास गेली.

* * *

राम नीलमणी डॉक्टरांच्या घरीं जाऊन थडकला. त्यावेळीं डॉक्टर आपल्या 'डिस्पेन्सरीं'त,—म्हणजे एका टाकाऊ कपाटासमोर, एका मोडक्या मेजाशीं बसून हातांतील ताजव्यानें औषधें तोलीत होते. आणि चारपांच रोगी तोंड वासून तें बघत होते. रामकडे एक कटाक्ष फेंकून डॉक्टर आपलें काम करूं लागले.

क्षणभर स्तब्ध राहून रामनें विचारलें, "वयनीचा ताप कसा कमी होत नाहीं ?"

ताजव्यावरच नजर ठेवून डॉक्टर म्हणाले, "त्याला मी काय करूं? औषध तर देतों—"

"माती देतां ! नासक्या पिठाच्या पुडीनं कधीं आजार बरा झालाय् ?"

हें ऐकतांच नीलमणी थक्क झाले. ताजवा वगैरे वस्तूंचें त्यांना भान राहिलें नाहीं. लाल डोळे वटारून ते रामकडे बघूं लागले. इतकी उर्मटपणाची भाषा आपणासमोर कोणी तोंडावाटे काढूं शकेल असें त्यांना कधीं वाटलेंच नाहीं मुळीं.

दुसऱ्याक्षणीं ते गरजले, "नासक्या पिठाची पुडी काय ! मग न्यायाला कां येतोस रे ? तुझा दादा माझ्या पायां पडून बोलावणं कशाला पाठवतो रे ?"

राम उत्तरला, "या बाजूला दुसरा डॉक्टर नाहीं म्हणून; कुणी असता तर तुम्हाला बोलावलंच नसतं."

खोलींत बसलेले लोक चकित होऊन ऐकत होते. त्यांच्याकडे पाहून राम पुन्हा म्हणाला, "तुम्हीं क्षुद्र वृत्तीचे अहांत, ब्राह्मणाची मान-मर्यादा राखणं जाणत नाहीं. म्हणूनच बकलांत—'पायां पडून बोलावणं पाठवतां.' दादा नाहीं कुणाच्या पायां पडत. येतांना वयनीनं शपथ घातली आहे; नाहीं तर आतांच तुमची बत्तीशी रंगवून गेलों असतों ! बरं ऐका,—चांगलंसं औषध घेऊन आधी लवकर घरीं चला, उशीर लावूं नका. आणि जर का ताप उतरला नाहीं, तर समोर तीं आंब्याची कलमं लावलेलीं दिसताहेत ना,—अजून जास्त वाढलींहि नाहींत म्हणा; कुऱ्हाडीच्या एकेका घावानं सहज उडवतां येतील—त्यापैकीं एक देखील आज रात्रीं रहाणार नाहीं. अन् उद्यां येऊन तुमच्या या डब्यांचा नि बाटल्यांचा निकाल केला जाईल !"

इतकें बोलून स्वारी पसार झाली.

डॉक्टर हातांत ताजवा धरून निश्चेष्ट बघत राहिले !

मग थोडा धीर करून एक म्हातारा म्हणाला, “ डॉक्टरसाहेब, आणखी उशीर लावूं नका. चांगलंसं औषध कुठं ठेवलं असेल तर तें घेऊन जा पाहूं. तो बोलून गेला आहे तें केल्यावांचून राहणार नाहीं.”

हातांतील ताजवा खालीं ठेवून डॉक्टर म्हणाले, “ मी चाललों चौकीवर पोलीसपाटलाकडे. तुम्ही सगळे साक्षी अहांत ! ”

डॉक्टरांना सल्ला देणारा म्हातारा म्हणाला, “ साक्षी ! साहेब, साक्ष कोण देईल ? अन् क्विनाईन खाऊन खाऊन तर माझे कानच गप्प झालेत. राम ठाकूर काय बोलला तें नीटसं ऐकूं आलं नाहीं. आणि पाटील झाला म्हणून काय करणार ? ती मूर्ति दिसते लहान, पण त्याच्या सोबत्यांची टोळी लहान नाहीं बरं. घरादाराला आग लावून जिवंत जाळूं लागला तरी चौकीदार चौकशी करण्यास सुद्धां येणार नाहींत कीं पाटीलदादाहि परत घर शाकारण्यासाठीं पेंडीभर गवत देऊन उपकार करणार नाहींत. तें कांहीं आमच्याकडून व्हायचं नाहीं. त्याला सर्वच भितात. त्यापेक्षां, जें करण्यास तो सांगून गेला आहे तें करणं उत्तम. बरं, जरा माझी नाडी तपासा पाहूं. आज भाकरतुकडा उष्टावूं का ? ”

डॉक्टर मनांत जळफळत होते. म्हाताऱ्यानें नाडी तपासण्याची गोष्ट काढतांच त्यांचा भडका उडाला.—“ साक्ष देववत नाहीं तुला अं ! मग नीघ इथून. मी नाहीं तपासत कुणाची नाडी. कुणाचा प्राण चालला तरी औषध देणार नाहीं. दाखवंतों तुमची काय गत होते ती ! ”

काठी टेकून उठत म्हातारा म्हणाला, “ डॉक्टरसाहेब यांत दोष आमचा का ? मोठा खट्याळ आहे तो पोर. हो, एकदां जाऊन त्याला सांगितलं पाहिजे. नाहींतर समजेल, कीं तुम्हाला चावडीवर जाण्याचा

सल्ला आम्हीच दिला. बिघाभर जागेंत वांगीं रोपलीं आहेत,—चांगलीं फोफावलीं देखील;—न जाणों आज रात्रींच तीं उपटून टाकायचा. तीं पोरं रात्रीं निजतात थोडींच ! साहेब, चौकीवर जाऊं नका. पाहिजे तर पुन्हां कधीं जा. पण आज एका बाटलींतून चांगलंसं औषध नेऊन त्याचा राग निववा पाहूं."

आणि म्हातारा निघून गेला, व मग इतरांनीहि तिथून हळुहळू पाय काढण्यास सुरुवात केली. नंतर नीलमणी बाबूहि मानवजीवनांतील अनुभवाचे अमोल बोल—संसारांतील सर्वोत्तम ज्ञानसूत्र—तोंडानें पुटपुटत घरामध्यें गेले.—"जगांत कुणाचं भलं करतां कामा नये बाबा !"

* * *

निरूपमा डोकावून खिडकीबाहेर बघत चरफडत होती. इतक्यांत रामनें परत येऊन साद घातली.—"गोविंद ! चला पिंजरा बनवूं या."

पण निरूपमेनें त्यालाच बोलाविलें. "ए राम, ज़रा इकडे तर येशील."

बांबूच्या कामट्या काळजीपूर्वक तासतां तासतां राम म्हणाला,—"यावेळीं नाहीं यायचा. कामांत आहें मी."

निरूपमा त्याला धमकावून म्हणाली, "चल लवकर सांगतें ना !"

हातांतील कामट्या टाकून राम उठला, आणि मुकाट्यानें वयनीच्या खोलींत येऊन तिच्या बाजेवर पायाकडील बाजूला बसला. निरूपमेनें त्याला विचारलें, "डॉक्टर भेटले का घरीं ?"

"हो."

"काय सांगितलंस त्यांना ?"

"यायला सांगितलं."

निरूपमेला खरें वाटेना. तिनें विचारलें: “ नुसतं यायला सांगितलंस ? आणखी कांहीं नाहीं म्हणालास ? ”

राम गप्प राहिला.

निरूपमा विचारते, “ बोल ना, काय काय म्हणालास ? ”

“ नाहीं सांगत जा ! ” राम म्हणाला.

इतक्यांत नृत्यकालीनें येऊन खबर दिली—“ डॉक्टरसाहेब येताहेत हं. ”

तशी निरूपमा जाडजूड रझई पांघरून कुशींवर वळून निजली आणि राम पळाला. थोड्या वेळानें श्यामलाल डॉक्टरांना घेऊन खोलींत आला. डॉक्टरनीं आपलें काम पुरें करून जातांना निरूपमेला म्हटलें, “ वयनीसाहेब ! ताप बरा होणं न होणं काय डॉक्टरच्या हातची गोष्ट आहे ? तुमच्या दिरानं मला आजची मुदत दिली आहे. एवढ्या मुदतींत तुम्ही बऱ्या झालां तर ठीक; नाहींतर तो आमच्या घरादाराला आग लावून देणार म्हणे. ”

लाजेनें निरूपमेला मेल्यापरी झालें. ती म्हणाली, “ त्याचं सगळंच बोलणं तसलं. तुम्हीं मुळींच चिंता करूं नका. ”

डाक्टर म्हणाले, “ लोक सांगतात कीं, त्याच्या सोबत्यांची एक टोळी आहे. ते बोलतात तेंच करतात. म्हणून ज़रा धास्ती वाटते. वयनी, आम्ही औषधच देऊं शकतों, प्राण घालूं शकत नाहीं. ”

जरा वेळ उगी राहून निरूपमा म्हणाली, “ हें तर ठरलेलंच आहे, कीं तो कार्टा एक ना एक दिवस तुरुंगांत जाणार. पण त्याच्या-बरोबर आम्हालाहि जावं न लागो म्हणजे मिळवलं. ”

नीलमणीनीं आज आपल्या खाजगी खोलींतील पेटी उघडून शुद्ध क्विनाईन नि ताजें औषध आणलें होतें. तें देऊन सर्व समजावून ते जाण्यास निघाले तेंव्हां श्यामलालनें त्यांच्या हातावर चार रुपये ठेवले.

तत्क्षणीं ते जीभ चावून म्हणाले, " वा ! हें काय करतां ? माझी फी एक रुपया आहे, त्याहून अधिक कदापि मी घेणार नाहीं. मला नाहीं तसली संवय. श्यामबाबू ! पैसा दोन दिवसांचा, पण धर्म अमर आहे बरं ! "

दोन दिवसांमागें इथूनच आपण एक रुपयाहून अधिक फी घेऊन गेलों होतों ही गोष्ट देखील आज ते विसरले. श्यामलाल मात्र सर्व कांहीं उमजला. कसेंहि असो. निरूपमा बरी झाली आणि घरांतील कामकाज पूर्ववत् होऊं लागलें.

२

दोन महिन्यांनंतरची गोष्ट. नदीवरून न्हाऊन येतांच निरूपमेनें कडेवरची घागर उतरत विचारलें, " नृत्या; तें माकड कुठं गेलं ग ? "

' माकड ' कोण हें घरांतील सगळ्याजणांना माहीत होतें. नृत्या म्हणाली, " धाकटा बाबू इथंच तर होता कीं !–तो पहा, तिकडे पतंग करीत बसला आहे. "

त्याला पाहून निरूपमेनें हांक मारली–" इकडे ये रे काळतोंड्या ! ये इकडे. तुझ्यापायीं गळ्याला फांस लावून घेऊं कीं, करूं तरी काय !"

रामलाल बेलफळाच्या अर्धुकांतील गीर काठीनें खरवडत खरवडत निरूपमेसमोर येऊन उभा राहिला.

निरूपमेनें त्याला विचारलें, " सांतरिणीच्या माटवावरचा काकडीचा वेल तोडून कां आलास, बोल ? "

" तिनं मला तोडतांना बघितलंय् ? "

" तिनं नाहीं बघितलं म्हणून ? मी तर बघितलं ! कां तोडलास, सांग ? "

माझ्या वाटेला कां जावं त्या थेरडीनं ?

निरुपमा उत्तरली, "वाटेला जाण्याचं मग ऐकतें. अगोदर हें सांग तूं चोरी कां केलीस?

रामलाल नेहमींप्रमाणेंच विस्मित नि क्रुद्ध होऊन म्हणाला, चोरी केली! वा: जराशी काकडी घेतली तर चोरी झाली?"

निरुपमा अधिकच भडकली आणि म्हणाली, "हो माकडा! झाली-झाली-झाली; शंभरदां सांगतें झाली म्हणून. चोरी कशाला म्हणतात तें नखाएवढं पोर सुद्धां जाणतं; अन् तुला माहित नाहीं चल, उभा रहा एका पायावर! पाजी कुठला!—रहा उभा; उचल पाय—"

या घरांतील लहान मुलगा गोविंद रामचें खेळणें होतें. सदान् कदा तो रामबरोबर असायचा. आणि हरएक कामांत त्याला मदतहि करी. त्यावेळीं रामच्या हुकुमाप्रमाणें पतंग धरून तो बसला होता. पण ही गडबड चाललेली ऐकतांच पतंग सोडून आईकडे आला व तिच्या जवळ उभा राहिला.

राम अळंटळं करीत आहे हें पाहून त्यानें "काका, उभा रहाना एका पायावर,—असा" म्हणून चटकन् एका पायावर उभें राहण्याची रीत त्याला दाखवली!

त्याबरोबर रामनें ताडकन् त्याच्या श्रीमुखांत एक लगावली, आणि मागें वळून एका पायावर तो उभा राहिला!

निरूपमा कसेंबसें हंसूं आवरून मुलाला कडेवर उचलून सैंपाक घरांत गेली. जराशानें परत येऊन पहाते, तर राम तस्सा एका पायावर उभा असून नेसलेल्या धोतराच्या शेवानें सारखे डोळे पुशीत आहे.

ती म्हणाली, "बरं पुरे, जा अतां. पुन्हा करूं नकोस असं."

पण रामानें तिचें ऐकलें नाहीं. रागानें तसाच एका पायावर उभा राहून डोळे पुसूं लागला.

निरूपमेनें जवळ जाऊन त्याचा हात ओढला; तरी तो ताठच उभा. तिच्या हाताला हिसका देऊन त्यानें तिला बाजूला सारलें. निरूपमेनें पुन्हा एकदां त्याचा हात ओढण्याचा प्रयत्न केला. तेव्हां मात्र पहिल्याप्रमाणेंच तिला झिडकारून तो पळाला !

एका तासानें नृत्यकाली त्याला बोलावण्यास आली. चंडीच्या देवळांतील वरांड्यांत तो पाय सोडून त्रिज्या हालवीत उगी बसला होता.

नृत्या त्याला म्हणाली, " शाळेला जाण्याची वेळ झाली बरं का बाबू. वयनी बोलावते आहे.

रामानें हूं कि चूं केलें नाहीं. जणूं ऐकलेंच नाहीं आपण अशा रीतीनें तो बसून राहिला.

नृत्या त्याच्या अगदीं जवळ येऊन म्हणाली, " वयनी सांगते आहे, कीं आंघोळ करून जेवायला चल."

तिच्यावर डोळे वटारून राम गुरगुरला—" तूं चालती हो इथून "

" पण वयनीनं काय सांगितलं तें ऐकलंस ना ? "

" नाहीं ऐकलं. मी नाहीं न्हात, नाहीं जेवत, कांहीं नाहीं करत !"

" बरं, जाऊन सांगतें तर " असें म्हणून नृत्या जाऊं लागली.

तत्काळ उठून रामनें घरामागील घाणेरड्या तळींत झटपट एक बुचकळी मारली आणि ओल्या केसांनीं व चिंब कपड्यांनीच तो घरांत शिरला, निरूपमेला हें कळतांच ती घाबऱ्याघुबऱ्या धांवत आली—" अरे, ए भूता ! काय केलंस हें ! बुडायला होईल या भयानं त्या तळींत कुणी पायसुद्धां घालत नाहीं. अन् तूं खुशाल बुचकळी मारून आलास ? "

मग तिनें आपल्या पदरानें त्याचें अंग नीट पुसलें, केंस पुसले,

त्याचे कपडे बदलले आणि त्याला सैंपाकघरांत नेऊन वाढलें पण राम वाढलेल्या पानासमोर ताठ बसून राहिला.

निरूपमेनें त्याच्या मनांतील गोष्ट ओळखली. त्याच्या अंगाखांद्यावर हात फिरवीत ती म्हणाली, “सगुण्या! आतांच्या घडीं जेव हं आपल्या हातांनी. रात्रीं तुला भरवीन बरं मी. अजून मला किती कामं करायचीं आहेत पहा. बाळ, जेव नोरे!”

तसा राम जेवून कपडे करून शाळेला गेला.

तो गेल्यावर नृत्यकाली निरूपमेला म्हणाली, “वयनी, तुमच्याच मुळं याला वाईट वळण लागत चाललं आहे बरं. एवढ्या मोठ्या मुलाला कुठं मांडीवरं बसवून भरवत असतात वाटतं? जरासा रुसला कीं त्याला आपल्या हातांनीं भरवतां ही तुमची रीत तरी कुठली बाई?”

निरूपमा मंद स्मित करून म्हणाली, “नाहीं तर जेवत नाहीं ना! रात्रीं भरवण्याची लालुच दाखवली नसती, तर तसाच तोंड फुगवून बसून राहिला असता; जेवला नसता.”

नृत्यकाली म्हणाली, “जेवला नसता! भूक लागल्यावर आपसूक जेवला असता. एवढा मोठा—”

निरूपमा रागावली आणि म्हणाली, “त्याचं वयच तेवढं बघतेस तूं. अग, तो मोठा झाला, शहाणा बनला, कीं त्याला स्वतःलाच लाज वाटेल, मग माझ्या मांडीवर बसूं इच्छील का तो? अन् जेवणार नाहीं असं तरी म्हणेल?”

नृत्या खिन्नपणें म्हणाली, “मी तर त्याच्या भल्यासाठीं सांगतें, वयनी. नाहींतर मला काय करायच्या या उठाठेवी? सोळासतरा वर्षांचा झाला तरी अक्कल आली नाहीं, मग येणार कधीं?”

आतां मात्र निरूपमा अगदीं चिडली. तिनें उत्तर दिलें, “सगळ्या

माणसांना कांहीं ठराविक वयांतच अक्कल येत नसते. कुणाला दोन वर्षं अगोदर येते, तर कुणाला दोन वर्षं मागाहून. अन् ती येवो न येवो, तुम्हाला या पंचायती कशाला ? "

नृत्या म्हणाली, " इथंच तर तुमचं चुकतं, वयनी. तो किती द्वाड बनला आहे हें स्वतः पहातांच. आळींतील माणसं म्हणतात, कीं तुमच्याच लाडांनी तो—"

निरूपमा उसळून उत्तरली, " आळींतल्या माणसांना लाड तेवढे दिसतात. त्याला करतें ती शिक्षा कुणी पहात नाहीं. पण तूं तर आळींतली नव्हेस. सकाळीं एका पायावर उभा राहून रडत होता, तळींतल्या घाणेरड्या पाण्यानं न्हाऊन आला,—देव जाणें आजारी पडतो कीं काय ! नि याउपर तुझं म्हणणं मी त्याला उपाशीं पोटीं शाळेंत पाठवावं ? घरांतील नि बाहेरील लोकांचे हे आळ माझ्यानं सहन करवत नाहींत ग, नृत्या ! "

असें बोलत असतांच तिचा कंठ दाटून आला, आणि अश्रूंनीं तिचे डोळे डबडबले. तिनें डोळ्यांना पदर लावला. आदल्या रात्रीं याच गोष्टीवरून नवऱ्याशीं तिची बोलाचाली झाली होती हें नृत्याला माहीत नव्हतें. अगदीं ओशाळून नि हळवी होऊन ती म्हणाली, " असं हो काय वयनी ! कांहीं वाईट गोष्ट तर सांगितली नाहीं मी. लोक बोलतात म्हणून जरा सावध केलं. "

डोळे पुसून निरूपमा म्हणाली, " देव सर्वांना सारखाच करीत नसतो. तो जरा पोरकट आहे, म्हणून ज्याचं त्याचं बोलणं मी निमूटपणं ऐकून घ्यावं ? अन् उठल्यासुटल्या माझ्या लाडाचीं वर्मं कशाला काढतां ? तुझी इच्छा तरी काय,—त्याचे तुकडे तुकडे करून नदींत फेंकावं त्याला ? मग होईल तुझं समाधान ? " इतकें बोलून कोण-

त्याहि प्रकारच्या उत्तराची वाट न पाहतां ती फणकाऱ्यानें चालती झाली.

नृत्यकाली खजील होऊन मग स्वतःशींच म्हणते,—'देव जाणें काय भानगड आहे! जी प्रत्येक गोष्टींत धीरानं नि शहाणपणानं वागते तिला एवढी गोष्ट कां कळूं नये? शिक्षा तरी मोठीच हिची! मुलगा मिनिटभर एका पायावर रडत उभा राहिला तर प्रलय झाला जणुं!"

* * *

भावाच्या पंक्तीस जेवायला बसणें रामला मुळींच आवडत नसे. आज निरूपमेनें मुद्दामच दोघां भावांचीं पानें जवळ जवळ मांडलीं; आणि ती स्वतः एका बाजूला बसली. सैंपाकघरांत शिरतांच राम धिंगाणा घालूं लागला,—"मी नाहीं जेवायचा जा. आज मी जेवणारच नाहीं!"

निरूपमा म्हणाली, "मग जा, नीज जाऊन."

निरूपमेच्या या गंभीर बोलण्यानें रामचा धिंगाणा बंद पडला. पण तो पानावर बसला नाहीं. गप्प उभा राहिला. आणि सैंपाकघराच्या दुसऱ्या दारानें श्यामलाल आंत येतांच त्यानें पळ काढला.

श्यामलाल स्वस्थपणें जेवण्यास बसला तेव्हां त्यानें विचारलें, "राम नाहीं का जेवणार?"

"तो माझ्याबरोबर बसेल." एवढेंच निरूपमा म्हणाली.

श्यामलाल जेवून बाहेर जातांच राम मुठींत राख घेऊन घरामध्यें आला आणि म्हणाला, "मी नाहीं कुणाला जेऊं द्यायचा! सगळ्यांच्या पानांत राख फेंकतों,—फेंकूं?"

"फेंकून तर पहा, कशी गंमत होते मग!" निरूपमा म्हणाली.

मुठींत राख धरून पण शांत होऊन राम म्हणाला, "आलीस

मोठी गंमत करणारी ! सकाळीं मला फसवून जेवायला लावलंस, नि आतां म्हणतेस गंमत पहा ?"

"जेवलास कशाला ?"

"तूं म्हणालीस कीं रात्रीं—"

"वैलोबा कुठला ! परक्याच्या हातानं भरवून घ्यायला लाज नाहीं वाटत ?"

राम चकित होऊन विचारतो, "परकी कोण ? तूंच विचारतेस ना हें ?"

निरूपमेनें अधिक हुज्जत घातली नाहीं. ती म्हणाली, "बरं, जा; राख फेंक नि हात धुऊन ये. पण पुन्हा कधीं भरावयाला सांगितलंस तर पहा."

घास भरवणें चाललें होतें, आणि त्याचवेळीं नृत्यकाली उगाचच आंत डोकावत दारासमोरून पलीकडच्या पडवीकडे निघून गेली !

निरूपमेनें तें ताडलें. रामला ती म्हणाली, "राम, तूं कधीं निवळशील रे ? देव तुला कधींच सुबुद्धि देणार नाहीं का ! लोकांचं बोलणं माझ्यानं आतां ऐकवत नाहीं बाळ."

तोंडांतील घास गिळून राम म्हणाला, "कोण आहेत ते लोक ? त्यांचीं नांवं सांग !"

एक दीर्घ निःश्वास सोडून निरूपमा म्हणाली, "बस,—कोण आहेत ? त्यांचीं नांवं सांगतें तुला !

× × ×

पण थोड्याच दिवसांत निरूपमा खरोखर कंटाळून गेली. तिची विधवा आई विचक्षणा आपली धाकटी मुलगी सुरू हिच्यासह इतके दिवस भावाच्या घरीं काळ कंठत होती. पण अकस्मात तो भाऊ

वारल्यामुळें ती निराधार झाली. तेव्हां निरूपमेनें नवऱ्याची संमति घेऊन तिला आपल्या घरीं आणण्यास गडी पाठवला. त्या दोघीजणीं आल्या. आणि येतांच विचक्षणेनें मुलीवर आपला दाब बसवला, नि रामाला मुठींत ठेवण्याच्या उद्योगास ती लागली. प्रथमपासून रामवर तिची वक्रदृष्टि वळली.

एका सकाळीं रामनें दोनचार हात लांब पिंपळाचा रोपटा आणला व तो अंगणांत मध्यभागी रोपूं लागला. सैंपाकघराच्या उंबरठ्यांत बसलेली विचक्षणा हातांतील जपमाळ फिरवतां फिरवतां सगळें कांहीं बघून घेऊन पंचम स्वरांत किंचाळली—"हें काय चालवलं आहेस राम ?"

तिच्याकडे वळून राम म्हणाला, "हा पिंपळ वाढला, कीं मग कशी गार सावली पडेल पहा ! आमच्या मास्तरांनीं सांगितलं आहे कीं पिंपळाची सावली फार आरोग्यकारक असते. गोविंद ! जा बघूं तांब्याभर पाणी घेऊन ये. भोळा ! मोठासा बांबू आण जा; नाहींतर गुरं खाऊन टाकतील हा रोपटा."

विचक्षणेच्या अंगाची नुसती लाही लाही झाली. ती म्हणाली:— "अंगणामध्यें पिंपळाचं झाड ! ही जगावेगळी रीत कुणी बापजन्मीं बघितली नाहीं !"

तिच्या बडबडण्याकडे रामनें दुर्लक्ष केलें.

गोविंद आपल्या शक्तीप्रमाणें गडूभर पाणी घेऊन आला. रामनें त्याच्या हातांतील गडू घेऊन प्रेमपूर्वक हंसत म्हटलें, "एवढ्याशा पाण्यानं काय होणार रे वेड्या ! तूं उभा रहा हं इथं; मी पाणी आणायला लागतों."

आणि नंतर घागरीवर घागरी पाणी ओतून सबंध अंगणांत चिखल केला गेला. वृक्षरोपणाचें हें कार्य राम आटोपतो न आटोपतो तोंच

निरूपमा नदीवरून न्हाऊन परत आली. तोंवर विचक्षणा जळल्या तुसाप्रमाणें मनांतल्या मनांत धुसफुसत होती. तिच्या डोळ्यांदेखतच या महदनुष्ठानाला प्रारंभ होऊन तें जवळजवळ समाप्तहि झालें होतें. मुलीला बघतांच तिच्या संतापाचा स्फोट झाला—" बघ ग निरू, बघ ! आपल्या दिराचें कर्म एकदां बघ तरी. अंगणामध्यें पिंपळ रोपून म्हणतो कसा—' सावळी पडेल गार !' आणि तो बघ त्याच्या पाठीमागें हरामखोर भोळा. वेळूचें बेटच्या बेट घसटत आणतो आहे—म्हणे वई करणार ! "

निरूपमेनें तें पाहिलें. खरोखरच भराभर वेळू नि खुंट घेऊन तो येत होता. तिला हंसू आलें. एकीकडे आई रागानें वेडी झालेली, तर दुसरीकडे रामाचा हा खुळेपणा. सगळेंच दृश्य तिला हास्यास्पद वाटलें. ती हंसून विचारते, " अंगणांत पिंपळ रे कशाला ? "

राम चकित होऊन म्हणाला, " कशाला म्हणजे ? वा: ! कशी थंडगार सावली पडेल पहाशील. त्या कोंवळ्या डहाळ्या दिसतात ना,—एः गोविंद, बोट दाखवूं नये !—त्या वाढल्या कीं मग गोविंद-साठीं त्यांना एक झोपाळा बांधूं. भोळा, वई जरा उंच केली पाहिजे बाबा. नाहींतर काळी पाडी मान घालून चट्ट करील. कोयता माझ्याकडे दे पाहूं. तुला जमणार नाहीं तें. " असें म्हणून त्यानें खटाखट फटाफट बांबू तोडण्यास सुरुवात केली.

निरूपमा हंसत हंसत कडेवरची घागर उतरण्यासाठीं सैंपाक-घरांत गेली.

भारी रागानें विचक्षणेच्या डोळ्यांतून जणुं ज्वाळा निघूं लागल्या. मुलीकडे क्रोधपूर्ण दृष्टिक्षेप करून तिनें विचारलें, " तूं कांहींच बोलली नाहींस तें ? मग पिंपळ होणार ना इथं ? "

निरूपमा हंसून म्हणाली, " आई, इतकी अधीर कशाला

होतेस ? एवढा मोठा रोपटा त्याला घागरीच्या घागरी पाणी घातलं म्हणून जगणार थोडाच ! त्याला पाळंमुळं का आहेत ? उद्यांच मरून जाईल बघ. ”

विचक्षणेचें मुळींच समाधान झालें नाहीं. ती म्हणाली, “ होय मरतो आहे ! मरणार नाहीं, चांगला पसरणार मात्र. खरं म्हणशील तर उपटून टाक.

निरूपमा घाबरून म्हणाली, “ बाप रे ! मग कुणाला रहायलाच नको इथं . ”

विचक्षणा म्हणाली, “ वा ! घर काय त्याचं एकट्याचं आहे, कीं मनांत आलं म्हणजे. अंगणामध्यें पिंपळ लावील ? देवा रे ! पिंपळावर गांवोंगांवचे कावळे न् घारी नि गिधाडें येऊन घरटीं बांधतील, अंगणांत हाडमांस टाकून घाण करतील,—आणि असं झालं तर माझ्यानं इथं रहावणार नाहीं ग निरू ! मला कळत नाहीं त्याची तुला इतकी भीति का वाटते. माझं घर असतं तर पाहिलं असतं तो किती खोड्या करतो तें. एका दिवसांत वठणीवर आणला असता त्याला ! ”

निरूपमेला आईचं हृदय आरशांतील प्रतिबिंबाप्रमाणें स्पष्ट दिसलें. क्षणमात्र उगी राहून खदखदां हंसून ती म्हणाली, “ आई अजून लहान आहे तो. त्याला अक्कल असती, तर त्यानं आपल्या अंगणांत पिंपळ कशाला लावला असता ? दोन दिवस असूं दे. मग तो स्वतःच फेंकून देईल बघ. ”

विचक्षणा म्हणाली, “ होय फेकतोय् ! तो काय फेंकणार, मीच उपटून फेंकतें आतां. ”

निरूपमा काकुळतीनें म्हणाली, “ नको ग आई, नको ! असलं कांहीं तूं करूं नकोस. अगोदरच तुला सांगून ठेवतें. त्याला तूं ओळखत नाहींस. माझ्या खेरीज त्याच्या अंगाला हात लावण्याची हिंमत त्याच्या

दादांना होत नाहीं. आई, आजच्या दिवस तरी थांब, ”

विचक्षणा वैतागून उत्तरली, “ बरं, पुरे पुरे पुरे. जा तूं कपडे वदल. ”

त्या दिवशीं निरूपमा आपल्या खोलींत उशीचा अभ्रा शिवीत बसली होती. इतक्यांत नृत्यानें धांवत येऊन तिला बातमी दिली,— “ वयनी ! घात झाला हं ! आजीबाईनीं धाकट्या बाबूचं झाड उपटून टाकलं. आतां शाळेंतून येतांच तो कुणाला सोडत नाहीं. ”

शिवणकाम तसेंच ठेवून निरूपमा सत्वर बाहेर आली. बघतें तर खरोखरच झाड कुठें नाहीं. तिनें आईला विचारलें, “ आई रामचं झाड काय झालं. ”

विचक्षणेनें तोंड वेडेंवांकडें वरून बोट दाखवलें,—“ तें तिकडे पडलयं. ”

निरूपमेनें जवळ जाऊन पाहिलें. तिनें नुसतें उपटूनच टाकलें नव्हतें, चुरमुडून त्याचा नायनाट केला होता. निरूपमेनें निमूटपणें तें उचललें नि तत्क्षणींच दूर फेंकून दिलें. आणि ती आपल्या खोलींत आली. शाळेंतून येतांच राम सगळ्या अगोदर झाड बघण्यास गेला.—आणि वह्या-पुस्तकें भिरकावून त्यानें एकदम आरोळी ठोकली,—“ वयनी ! माझं झाड ! ”

निरूपमा माजघरांतून बाहेर येऊन म्हणाली, “ ये सांगतें, ये ना. ”

“ नाहीं जा, येत नाहीं. माझं झाड कुठं ? ”

“ माझ्याजवळ ये ना सांगतें, ”

राम जवळ येतांच त्याचा हात धरून तिनें त्याला आपल्या खोलींत नेलें, आणि मांडीवर बसवून त्याच्या ओठागालांवरून हात फिरवीत ती म्हणाली, “ मंगळवारीं कुठं पिंपळ लावत असतात का रे ? ”

राम मऊपणें विचारतो, “ कां,—काय होतं ग ?

निरूपमा हंसून म्हणाली " तसं केलं, तर घरांतील थोरली वयनी मरते हो ! "

रामचा चेहरा निमिषार्धांत खर्रकन् उतरला. तरी तो म्हणाला, " अं हं खोटं !"

निरूपमा पुन्हां हंसून म्हणाली, " छे रे ! खोटं नाहीं. पंचांगांत लिहिलंय्—"

" पाहूं पंचागांत कुठं लिहिलंय् तें ?"

निरूपमा मनांतल्या मनांत घुटमळली. चटकन् गंभीर चेहरा करून ती म्हणाली, " बाळ कसा रे तूं ! मंगळवारीं पंचांगाचं नांवसुद्धां घेत नाहींत अन् तूं पाहणार कसं ? भोळाला देखील माहीत आहे हें. जा, बोलाव बघूं त्याला. "

भोळासमोर आपल्या अज्ञानाचें प्रदर्शन होईल या आशंकेनें विचार-मूढ होऊन त्यानें मातृसम वहिनीच्या गळ्यांत दोन्ही बाहू घालून, तिच्या कुशींत तोंड लपवीत म्हटलें, " मला देखील माहीत आहे हें ! पण आतां झाड उपटून टाकल्यावर कांहीं होणार नाहीं ना, वयनी ?"

त्याला छातीशीं कवटाळून निरूपमा म्हणाली, " नाहीं हं, आतां कांहीं व्हावयाचं नाहीं. " तिच्या डोळ्यांत आंसवें खळखळलीं ! धीरेंच ती म्हणाली, " काय रे राम, मी मेलें तर तूं काय करशील ?"

जोरानें मान हालवून राम म्हणाला, " चल्, असं म्हणूं नये !"

हळूच डोळे पुसून निरूपमा म्हणाली, " आतां म्हातारी तर झालें, मग मरणार नाहीं का ?"

तेव्हां कोठें रामच्या लक्ष्यांत आलें, कीं ती थट्टा करत आहे. मान वर करून तो हंसून म्हणाला, " वा ! तूं म्हातारी झालीस का ? अजून एकहि दांत पडला नाहीं, एक केंससुद्धां पिकला नाहीं तो ?"

निरूपमा म्हणाली, " केंस पिकला नाहीं म्हणून काय झालं ?

एक दिवस नदींत बुडून मरेन. न्हाण्यासाठीं जाईन ती परत येणारच नाहीं."

"कां ग वयनी ?"

"तुझ्या गुणांनीं. माझी आई तुला दृष्टीसमोर देखील नकोशी झाली आहे. रात्रन् दिवस तर तिच्याशीं भांडतोस. मग समजेल नदीवरून मी परत आलें नाहीं म्हणजे."

तिच्या या बोलण्यावर रामनें विश्वास ठेवला नाहीं. तरी मनांतल्या मनांत बावरून तो म्हणाला, "बरं, आतां मी तिला कांहीं करणार नाहीं. पण ती मला टाकून कां बोलते ग ?"

"बोलेना. ती माझी आई आहे. तूं तिचा मान राखला पाहिजेस. तूं जसं माझ्यावर प्रेम करतोस तसंच तिच्यावर करशील ना ?"

रामानें पुन्हा वहिनीच्या कुशींत तोंड लपवलें. याच जागीं जें तोंड खुपसून त्यानें तेरा वर्षांचा दीर्घावधि लोटला होता त्या तोंडावाटे एवढी धडधडीत खोटी गोष्ट तो कशी काढणार बरें ? असें करणें त्याला शक्यच नव्हतें.

दाटून आलेल्या कंठस्वरानें निरूपमा म्हणाली, तोंड लपवून काय होणार रे !"

याच वेळीं विचक्षणा तिथें प्रगट झाली. लाळ घोटून ती म्हणाली, "तुला कांहीं कामधंदा नाहीं का निरू ? इथं दिराला घेऊन त्याचं कौतुक करीत बसली आहेस; अन् तिकडे तुझ्या बाळाची आबाळ चालली आहे."

रामानें झटकन् मान बाहेर काढून तिच्याकडे बघितलें त्यावेळीं त्याचे डोळे हिंस्त्र श्वापदाच्या डोळ्याप्रमाणें लकाकले !

निरूपमेनें बळेंच त्याला छातीशीं कवटाळून आईला म्हटलें, "बाळाची आबाळ चालली आहे ! ती कशी ग ?"

"कशी! छान बोललीस हं." असें म्हणून विचक्षणा चालती झाली. कांहीं खोटेंनाटें रचून सांगणें तिला जमलें नाहीं.

ती गेल्यावर रामनें जोर करून आपलें तोंड बाहेर काढलें आणि तो म्हणाला, "या सटवीची मानच मुरगळतों बघ!"

त्याच्या तोंडावर हात ठेवून निरूपमा म्हणाली, "काव्यां चूप! माझी आई ना ती?"

* * *

चारएक दिवसांनंतरची गोष्ट. राम जेवीत असतां दोनदां 'हाय-हूय' करीत पाणी प्याला आणि ताट भिरकावून थैमान घालूं लागला.—या थेरड्या सटवीच्या हातचं मी कधीं खाणार नाहीं जा; कध्धीं नाहीं खायचा. तिखटामुळें माझ्या तोंडाची आग होते आहे ग वयनी!— "ए वयनी!"

त्याच्या शंखध्वनीमुळें पूजाअर्चा अर्ध्यावरच सोडून निरूपमा धांवत आली. तिनें विचारलें, "काय झालं रे?"

रागाच्या भरांत राम रडूं लागला. तो म्हणाला, "मी कधीं नाहीं खायचा,—कध्धीं नाहीं. तिला हांकलून दे!" आणि तो धूम पळत सुटला.

निरूपमा क्षणभर स्तंभित झाली. मग ती आईला म्हणाली, "आई, तुला वारंवार सांगतें, कीं जेवणांत जास्त तिखट घालत जाऊं नकोस. इतकं तिखट खाण्याची या घरांत कुणाला संवय नाहीं ग."

विचक्षणा चवताळून म्हणाली, "अग, पण जास्त तिखट घातलं तरी? अवध्या दोन मिरच्या वाटून घातल्या, त्यासाठीं एवढा गलबलाट का?"

निरूपमा वैतागून उत्तरली, "दोन मिरच्या तरी कशाला? कुणी खातच नाहीं जर—"

" तोंड मिट निरू, चूप ! लागली मला सैंपाक शिकवायला. रांधतां वाढतां माझे केंस पिकून पांढरे झाले. आणि आतां रांधावं कसं तें पोटच्या पोरीकडून मला शिकलं पाहिजे नाहीं ? धिक् माझं जिणं ! "

निरूपमा कांहीं उत्तर न देतां सैंपाकघरांत जाऊन पुन्हा रांधण्याच्या तयारीस लागली.

विचक्षणा उंबरठ्यांतच बसली आणि तिनें कपाळ बडवून आक्रोश आरंभला,—" भाऊराया रे ! कुठं गेलास तूं ! मला पण ने ना तुझ्याकडे. आतां मला सोसवत नाहीं हें. तोंडाला येतील त्या शिव्या जो तो मला देतो. मी थेरडी, मी सटवी, मला हांकलून लाव,— असं म्हणतो. कशी ग तरी ! मुळीं—जांवयाचं अन्न मला खावं लागत आहे. गळफांस लावून घेण्यास दोरी देखील मिळत नाहीं मला. यापेक्षां दारोदार भीक मागणं शतपट बरं, सुरू ! चल बाई जाऊंया इथून. आतां या घरांतील पाणी घेणं नको. "

सुरू रडत रडत आईजवळ येऊन उभी राहिली. आणि तिचा हात धरून जाण्यास विचक्षणा सिद्ध झाली.

निरूपमा भाजी चिरण्याचें काम टाकून आली. व तिनें आईला आडवलें.

विचक्षणा रडत रडत म्हणाली, " आम्हाला आडवूं नकोस, निरू, जाऊं दे. झाडापेडाखालीं उपाशीं मेलेलं बरं. पण तुझ्या घरच्या तुकड्यांवर जगणं नको. "

निरूपमा हात जोडून म्हणाली, " कुणावर रागावून जातेस आई ? आमच्याकडून कांहीं चूक झाली असेल तर सांग. "

विचक्षणेच्या रडण्याला अधिकच उमाळा आला. नाकांतून ती म्हणाली, " मी कांहीं कुकुबाळ नाहीं बरं निरू. सगळं समजतं मला. तुझ्या पाठबळावांचून इतकं शेफारून बोलण्याची त्याची छाती आहे

का ? मी सटवी अं !—मला हांकलून लाव नाहीं ? बरं, जातें तर मी. आम्ही म्हणजे तुमच्यावरचं संकट,—तुमच्या गळ्यांतील धोंड ! चल् वाट सोड ! ”

तिचे पाय धरून निरूपमा म्हणाली, “आई, आजच्या घडीं विसरून जा. त्यांना तरी येऊं दे. मग वाटेल तसं कर. ” आणि तिच्या हाताला धरून तिनें घरांत नेलें, तिचे पाय धुऊन पदरानें पुसले व तिला पाटावर बसवून ती पंख्यानें वारा घालूं लागली.

त्यावेळेपुरता तिचा राग निवाला. परंतु दुपारीं श्यामलाल जेवण्यास बसतांच ती दाराआडून स्फुंद-स्फुंदून रडूं लागली. श्यामलाल आश्चर्यचकित झाला. ही भानगड काय आहे तें त्याच्या लक्षांत येईना. नंतर सगळा प्रकार हळुहळू त्याच्या ध्यानीं आला तेव्हां तो अर्ध्या जेवणावरून उठला.

श्यामलाल कुणावर रागवला तें नृत्यकाली समजली. तिला हें सहन झालें नाहीं. या घरांत स्पष्टभाषी अशी एक ती होती. चटकन् बोलून गेली,—“ आजीबाईनी मुद्दामच बाबूजींच्या जेवणांत मोडा घातला. डोळ्यांतील टिपं कांहीं आटलीं नसतीं आजीबाई ! जरा सबूर करायचं होतं. ”

तिच्या या बोलण्यानें विचक्षणेचा चेहरा काळाठिक्कर पडला. ती निरुत्तर होऊन गप्प बसली.

कुठें कुठें भटकून राम दोनप्रहरीं घरीं आला. इकडे तिकडे डोकावून तो वहिनीच्या खोलींत गेला. पहातो तर, गोविंदला घेऊन ती निजली आहे. हा प्रकार त्याच्या नीटसा लक्षांत आला नाहीं. तरी तो हळूच म्हणाला, “ मला भूक लागलीय् ग ! ”

निरूपमेनें उत्तरच दिलें नाहीं.

तो जरा मोठ्यानें म्हणाला, “ काय खाऊं सांग ? ”

निरूपमेनें पडल्या पडल्याच उत्तर दिलें, "मला नाहीं माहीत. जा पाहूं इथून."

"नाहीं जात जा. मला भूक लागली नाहीं वाटतं!"

निरूपमा त्रासून पाठ फिरवीत म्हणाली, "सतावूं नकोस हं. तिकडे नृत्या असेल तिला सांग."

राम अधिक कांहीं न बोलतां बाहेर गेला. नृत्याला हुडकून तो म्हणाला, "खायाला दे ना नृत्या."

नृत्या जणुं तयारच होती. तिनें ताबडतोब वाटीभर दूध, थोडे चुरमुरे आणि चारपांच चुनाचे लाडू आणून त्याला दिले.

पण रामला राग आला. तो विचारतो कसा—"बस! एवढंच?"

नृत्या म्हणाली, "बाबू, पाहिजे तर मुकाट्यानं एवढं खाऊन घे. आज दंगामस्ती करूं नकोस. दादा कांहीं खाल्ल्यावांचून कचेरीला गेले आहेत. वयनी उपाशीं निजलीय्. गोंधळ घातलास तर उठून येईल. मग धडगत नाहीं, सांगून ठेवतें."

राम तें बघूनच आला होता. अधिक चौकशी करण्याच्या भानगडींत न पडतां स्वारी दूध प्याली; आणि चुरमुरे व लाडू धोतरांत बांधून तळीकाठीं एका झाडाखालीं जाऊन बसली. खाण्याकडे त्याचें लक्ष नव्हतें. कारण, त्याची वहिनी उपाशीं निजली होती. अन्यमनस्क होऊन चुरमुरे खात खात तो विचार करूं लागला. ऋषींप्रमाणें आपल्याला एकादा मंत्र आला असता, तर बसल्या जागेवरूनच आपण वहिनीचें पोट भरलें असतें त्याला वाटलें. पण मंत्र येत नाहीं; मग करावें कसें? त्याला कांहींएक सुचेना. घरीं येऊन जेवण्यासाठीं वहिनीचें मन वळवण्याला लाज वाटूं लागली. आणि ती जेवणार तरी कशी? दादाच जेवला नव्हता मुळीं. मग धोतराच्या ओटींतील चुरमुरे वगैरे फेंकून तिथल्या तिथें तो येरझारा घालूं लागला. पुनः पुन्हा

त्याला हेंच वाटत होतें, कीं वहिनी उपाशीं आहे. हा विचार जितक्यांदा त्याच्या मनांत येई तितक्यांदाहि त्याच्या मनाला असंख्य सुया टोंचत जणुं !

त्या रात्रीं श्यामलाल बायकोला म्हणाला, "यापुढं मला खपणार नाहीं हें. आतां त्याच्यासह राहणं अशक्य आहे."

निरूपमेनें चकित होऊन विचारलें, "कुणाची गोष्ट बोलतां ?"

"रामची. तुझी आई चारपांच दिवसांपासून सारखी सांगत आहे, कीं राम तिचा उगाचच अपमान करतो. मी पंचांना बोलावून इस्टेटीचं वांटप करून त्याला वेगळा करायचं ठरवलंय्. मला आणखी सहन करवत नाहीं."

निरूपमा थक्क होऊन क्षणमात्र उगी राहिली. मग ती म्हणाली, "रामला वेगळा करणार ! बोलूं नका असली गोष्ट. अजून कोवळा पोर आहे तो. इस्टेट-बिस्टेट घेऊन काय करणार सांगा ?"

श्यामलाल तिला वेडावून म्हणाला, "हो, कोवळा पोर खरा ! इस्टेटीचं काय करावं तें तोच जाणें."

निरूपमेनें उत्तर दिलें, "तें तो नाहीं जाणत, मी जाणतें ! पण हें तर कळूं दे, आई तुम्हाला चारपांच दिवसांपासून हीच गोष्ट सांगत आहे का ?"

श्यामलाल एकदम स्तब्ध झाला. अळंटळं करीत तो म्हणाला, "छे ! ती नाहीं म्हणाली असं. लोकांनाहि डोळे आहेत. मी पहात नाहीं असं का तूं समजतेस ?"

निरूपमा म्हणाली, "मी नाहीं समजत असं. पण विचारतें, त्याला कोण आहे ? कुणाला घेऊन तो वेगळा होणार ? ना आई, बहिण, कीं मावशी बिवशी ! आहे तरी कोण,—रांधून जेवूं कोण घालील त्याला ?"

श्यामलाल विरक्तपणें म्हणाला, "मला नाहीं माहीत हें सगळं."

तो बोलून तर गेला–'मला नाहीं माहीत' पण मनांतून त्याला सगळ्या गोष्टींची जाणीव होती. एवढें मोठें सत्य जाणल्यावांचून सुटकाच नव्हती मुळीं. निरूपमेला कांहीं तरी सांगायचें होतें. परंतु तिचे ओंठ कांपूं लागले. म्हणून जरा वेळ उगी राहून, स्वतःला सांवरून भरल्या कंठानें ती म्हणाली, "मी तेरा वर्षांची असतांना, जेव्हां पोरी भातुकलीचा खेळ खेळतात तेव्हां,–सासूबाई या संसाराचा भार माझ्या शिरावर लादून स्वर्गवासी झाल्या. त्यांनी माझ्यावर सोपवलेली कामगिरी मी पार पाडूं शकतें किंवा नाहीं हें त्या बघत असतील. मी रांधतावाढतां, मुलाबाळांचा संभाळ करतां करतां आणि कुटुंबाचा भार एकटीच वहातां वहातां आज सव्वीस वर्षांच्या वयांत अर्धीमुर्धी थेरडी तर झालें आणि आतां तुम्ही माझ्या कारभारांत ढवळाढवळ करूं लागाल तर, खरं सांगतें, नदींत जीव देईन. मग दुसरं लग्न करून रामला खुशाल वेगळा काढा नि मनाला येईल तसा प्रपंच चालवा. मी बघायला येणार नाहीं, कीं सांगासवरालाहि येणार नाहीं. पण मी जीवंत असेंपर्यंत कांहींएक चालायचं नाहीं."

श्यामलाल बायकोला वचकून असे. म्हणून तो अधिक कांहीं बोलला नाहीं. त्या रात्रीं गोष्ट तेवढ्यावर राहिली. दुसेर दिवशीं निरूपमेनें रामला जवळ घेऊन त्याच्या अंगाखांद्यावर हात फिरवीत म्हटलें, "राम, आतां तूं इथं राहूं नकोस. कुठं तरी दुसरीकडे जाऊन राशील ना ?"

तत्क्षणींच तयार होऊन राम म्हणाला "हो, राहीन ग वयनी ! तूं मी गोविंद नि भोला. वयनी सांग ना कधीं जाऊं या !"

निरूपमा निरूत्तर झाली. याउपर आणखी ती बोलणार तरी काय ? पण राम गप्प राहिला नाहीं. उत्साहित होऊन त्यानें पुन्हा विचारलें, "वयनी ! कधीं जाऊं या सांग ?"

निरूपमेला उगी रहावेनाच. यावर उत्तर म्हणून तिनें त्याला आपल्या छातीशीं घट्ट कवटाळलें आणि विचारलें, "वयनीला सोडून तूं कुठं राहूं शकणार नाहींस का रे ?"

राम मान हलवून म्हणाला, "अं हं !"

"अन् वयनी वारली तर रे ?"

"चल् !"

"चल् नाहीं. अलीकडे वयनीचं तूं ऐकत नाहींस अगदीं मग बघशील."

रामनें उलट विचारलें, "कधीं ऐकलं नाहीं ग ?"

निरूपमा म्हणाली, "कधीं ऐकतोस, सांग ? किती दिवसांपासून तुला सांगतें आहे, कीं माझ्या आईच्या वाटेला जात जाऊं नकोस म्हणून. तरी देखील तिच्या खोड्या काढल्याशिवाय रहात नाहींस. तोंडाला येईल तें बोलतोस तिला. काल पण तूं तिचा अपमान केलास. आतां कुठं तरी चालती होतें मी !"

"मी पण येईन तुझ्याबरोबर !"

"तुला कळणारच नाहीं मी कुठें जाणार तें."

"अन् गोविंद ?"

"तो तुझ्याबरोबर राहील. त्याला तूं संभाळ."

"छे. माझ्यानं नाहीं व्हायचं हें, वयनी !"

निरूपमा हंसून म्हणाली, "तुला संभाळावाच लागेल त्याला."

हें सारें रामला खोटें वाटलें. मग खुदकन् हंसून तो म्हणतो, "सगळं खोटं ! कुठंहि जाणार नाहींस तूं."

"अरे खोटं नाहीं. अगदीं खरं सांगतें. बरं, बघशील जातें कीं नाहीं."

राम म्लान होऊन म्हणाला, "अन् तुझं सगळं ऐकलं मग तर झालं ?"

निरूपमा हंसून म्हणाली, "तसं केलंस, तर मग नाहीं जायची. गोविंदला पण संभाळावं लागणार नाहीं तुला."

आनंदित होऊन राम म्हणाला, "बरं, आजपासून तूं पहा!"

३

आठदहा दिवस निर्विघ्नपणें गेले. विचक्षणेकडून विघ्न आणण्याचा प्रयत्न होत नव्हता असें नाहीं. पण राम चिडत नसे. त्या दिवशीं वहिनी जें कांहीं म्हणाली तें सगळें त्याला खरेंच वाटलें असें नव्हे. तरी त्याला धाकधुक वाटत होती. परंतु दैव विचित्र! आणखी एक दुर्घटना घडली.

आज विचक्षणेनें आपल्या वडलांच्या वर्षश्राद्धानिमित्त बारा ब्राह्मणांना भोजन घालण्याचा संकल्प केला होता. तिच्या वडलांचा आत्मा आजपर्यंत मुलाच्या—विचक्षणेच्या भावाच्या घरीं चुप्प पडून होता. पण आतां नातजांवयाच्या घरीं त्याचें येणें जाणें होऊं लागलें,— अर्थात् स्वप्नामध्यें! मग त्याची शांति तर केली पाहिजे?

आज सकाळच्या प्रहरीं राम पाटीवर गणितें सोडवीत बसला होता. इतक्यांत भोळ्यानें येऊन त्याच्या कानांत सांगितलें, "दादा! भगा बाग्दी कीं नाहीं तुझ्या कार्तिक-गणेशला पकडण्यासाठीं ज़ाळं घेऊन आलाय्. खरंच! बघ तरी चल."

गोष्ट अशी होती कीं, पुष्कळ दिवसांपासूनचे दोन मोठाले रोही मासे तळीकाठीं पाण्यांत फिरत होते. त्यांना माणसांचें मुळीं भय वाटत नसे. राम म्हणे, कीं हे आपण पाळलेले मासे आहेत, त्यानें त्यांचीं नांवें पण ठेवलीं होतीं,—'कार्तिक-गणेश'! ज्यानें कार्तिक-गणेशच्या असाधारण रूपागुणाचें वर्णन रामाच्या तोंडून ऐकलें नाहीं, आणि त्याच्या आग्रहावरून एकवेळ त्यांचें दर्शन घेतलें नाहीं असा कुणीहि सबंध आळींत नव्हता. त्या दोघां माशांत फरक काय तें

एका रामालाच माहीत होतें;—गणेश कुठचा नि कार्तिक कुठचा हें फक्त त्यालाच ओळखतां येई. भोळाला देखील, सदोदित रामबरोबर राहूनहि, त्यांना ओळखतां न आल्यामुळें रामाकडून पुष्कळदां कानपिचक्या मिळत !

निरूपमा हंसून म्हणायची, " रामचे कार्तिक–गणेश माझ्या श्राद्धा दिवशीं बरे उपयोगीं पडतील हो ! "

भोलाच्या बातमीनें राम मुळींच विचकित झाला नाहीं. पाटीवर अधिकच वांकून म्हणाला, " एकदां मजा तर चाखूं दे त्यांना. जाळं तोडून ते निसटतात कीं नाहीं पहा ! "

भोला म्हणाला, " छे ! दादा, तें आमचं जाळं नव्हे. कोळ्यां-कडून भगा मजबूत जाळं घेऊन आलाय्. तें मुळींच तुटणार नाहीं."

पाटी-पेन्सिल ठेऊन राम म्हणाला, " चल बघूं या. "

तळीकांठीं जाऊन तो बसतो, तर खरोखरच त्याच्या कार्तिक—गणेश विरुद्ध कट चालला आहे. भगा काठावरून पाण्यांत थोडे चुरमुरे टाकून जाळें फेंकण्याच्या तयारीनें राहिला होता.

त्याला एक गचांडी देऊन राम म्हणाला, " पाजी कुठला ! चुरमुरे फेकून माझ्या माशांना बोलावतो आहे. "

भगा रडत्या सुरानें म्हणाला, " बड्या बाबूंचा हुकूम आहे. आणखी कुठं मासे मिळाले नाहींत, दादा, ! "

रामनें त्याला धक्की देऊन त्याच्या हातांतील जाळें हिसकावून फेंकलें. आणि. तो म्हणाला, " नीघ इथून, चल जा ! "

जाळें उचलून भगा हळुहळू चालूं लागला.

राम घरीं येऊन पुन्हा पाटी-पेन्सील घेऊन बसला. त्यानें प्रतिज्ञा केली होती कीं, कुणावर आग पाखडायची नाहीं.

विचक्षणा आज सकाळींच स्नानादि नित्य कर्में घाईघाईनें उकरत

होती. इतक्यांत नृत्यानें येऊन तिला खबर दिली, "आजीबाई, मासे मिळाले नाहींत हो. धाकट्या बाबूनं भगाला मारून झोडून घालवलं"

त्या दोन्ही माशांवर विचक्षणेचा फार दिवसांपासून डोळा होता. त्या मोठ्या रोही माशांसंबंधीं विधवेच्या मनांत कोणता बेत होता याची कल्पना करतां येत नाहीं. परंतु तिचा हा बेत निव्वळ स्वार्थी नसावा असें वाटतें. या माशांचें स्वतःच्या हातांनीं रांधलेलें जेवण आपल्या एकाद्या कार्यप्रसंगीं सत्पात्रीं वाढून पुण्य नि कीर्ति संपादण्याची इच्छा कितीतरी दिवसांपासून तिच्या मनांत होती. आदल्याच दिवशीं तिनें जांवयाची संमति घेऊन,—अर्थात् कार्तिक-गणेशाचें नांव न काढतां-कोळ्यांकडून मजबूत जाळें आणवलें होतें. आणि भगा कोळ्याला चार आणे देण्याचें कबूल करून हा सगळा बेत रचला होता. आज सकाळीं पुन्हां एकदां तळीकांठीं जाऊन त्या माशांना तिनें पाहिलें व निश्चिंत चित्तानें घरीं येऊन ती जपाला बसली. अशा स्थितींत मिळालेल्या या बातमीनें तिला विवेकशून्य केल्यास नवल नाहीं. दांत ओठ खाण्याची तिला खोड होती. यावेळींही दांत कटकटावून गळ्यांतील माळ उंचावत ती चित्कारली—"कोणरे हा माझा वैरी! देव जाणें कधीं हा कार्टा मरेल, नि माझ्या जिवाला विसावा मिळेल. अद्याप पाण्याचा थेंबसुद्धां तोंडांतून घातला नाहीं रे देवा! मी खरी असेन तर तीन दिवसांतच—"

जवळच निरूपमा भाजी चिरत होती. विद्युत्वेगानें धांवून आली नि कडाडली—"आई!"

असें सांगतात कीं, अपत्याच्या तोंडून निघालेलें मातृसंबोधन अतुलनीय आहे! आज निरूपमेच्या तोंडून निघालेल्या मातृसंबोधनाला देखील कशाची सर येणार नाहीं. तिच्या हांकेनें विचक्षणेच्या हृदयांतील रक्तप्रवाह गोठून गेला. निरूपमा मात्र स्वतःला आवरू

शकली नाहीं. तिच्या दोन्ही गालांवरून झरझर आंसवें ओघळूं लागलीं. पण लगेच डोळे पुसून ती राम अभ्यास करीत होता तिकडे गेली.

तिनें रामला दरडावून विचारलें. “ भगा कोळ्याला तूं मारून झोडून घालवलास काय ? ”

राम चपापला. पाटीवरची दृष्टि काढून त्यानें क्षणमात्र तिच्याकडे पाहिलें, आणि उत्तर देण्याच्या भानगडींत न पडतां पलीकडच्या दारानें यःपलायन केलें !

निरूपमेला खरी हकीकत कांहीं समजली नाहीं. घरांत येऊन तिनें भगा कोळ्याला पुन्हा बोलावून आणलें, व मासे पकडण्याची आज्ञा केली.

हुकूम मिळतांच भगा जाळें घेऊन गेला. आणि थोड्याच अवकाशांत त्यानें एक भला थोरला रोही मासा खांद्यावरून आणून धपकन् अंगणांत टाकला.

निरूपमा सैंपाकघराच्या दरवाजांत उभी होती. तो मासा बघतांच ती नखशिकान्त कांपली ! साशंकित होऊन तिनें विचारलें, “ काय रे, आपल्या घाटावर तर नाहीं पकडलास हा ? रामाच्या कार्तिक गणेशपैकीं नव्हेना ? ”

एवढा मोठा मासा आपण किती लवकर पकडून आणला हें सांगण्याच्या फुशारकींत भगा म्हणाला, “ होय वयनीसाहेब ! हा आपल्या तळींतील रोही. किती मोठा आहे बघा ! ”

आणि विचक्षणेकडे अंगुलिनिर्देश करून तो म्हणाला, “ या आजीबाईंनीं हाच पकडून आणण्यास सांगितलं होतं. ”

निरूपमा स्तब्ध उभी राहिली. नृत्यकालीची रामवर फारशी मर्जी नव्हती तरी तिला देखील हा मासा पाहून रामचा कैवार घ्यावेसें वाटलें. ती विचक्षणेला म्हणाली, “ आजीबाई ! धाकट्या बाबूंच्या

होती. इतक्यांत नृत्यानें येऊन तिला खबर दिली, "आजीबाई, मासे मिळाले नाहींत हो. धाकट्या बाबूनं भगाला मारून झोडून घालवलं"

त्या दोन्ही माशांवर विचक्षणेचा फार दिवसांपासून डोळा होता. त्या मोठ्या रोही माशांसंबंधीं विधवेच्या मनांत कोणता बेत होता याची कल्पना करतां येत नाहीं. परंतु तिचा हा बेत निव्वळ स्वार्थी नसावा असें वाटतें. या माशांचें स्वतःच्या हातांनीं रांधलेलें जेवण आपल्या एकाद्या कार्यप्रसंगीं सत्पात्रीं वाढून पुण्य नि कीर्ति संपादण्याची इच्छा कितीतरी दिवसांपासून तिच्या मनांत होती. आदल्याच दिवशीं तिनें जांवयाची संमति घेऊन,—अर्थात् कार्तिक-गणेशचें नांव न काढतां-कोळ्यांकडून मजबूत जाळें आणवलें होतें. आणि भगा कोळ्याला चार आणे देण्याचें कबूल करून हा सगळा बेत रचला होता. आज सकाळीं पुन्हां एकदां तळीकांठीं जाऊन त्या माशांना तिनें पाहिलें व निश्चिंत चित्तानें घरीं येऊन ती जपाला बसली. अशा स्थितींत मिळालेल्या या बातमीनें तिला विवेकशून्य केल्यास नवल नाहीं. दांत ओठ खाण्याची तिला खोड होती. यावेळींही दांत कटकटावून गळ्यांतील माळ उंचावत ती चित्कारली—"कोणरे हा माझा वैरी! देव जाणें कधीं हा कार्टा मरेल, नि माझ्या जिवाला विसावा मिळेल. अद्याप पाण्याचा थेंबसुद्धां तोंडांतून घातला नाहीं रे देवा! मी खरी असेन तर तीन दिवसांतच—"

जवळच निरूपमा भाजी चिरत होती. विद्युत्वेगानें धांवून आली नि कडाडली—"आई!"

असें सांगतात कीं, अपत्याच्या तोंडून निघालेलें मातृसंबोधन अतुलनीय आहे! आज निरूपमेच्या तोंडून निघालेल्या मातृसंबोधनाला देखील कशाची सर येणार नाहीं. तिच्या हांकेनें विचक्षणेच्या हृदयांतील रक्तप्रवाह गोठून गेला. निरूपमा मात्र स्वतःला आवरू

शकली नाहीं. तिच्या दोन्ही गालांवरून झरझर आंसवें ओघळूं लागलीं. पण लगेच डोळे पुसून ती राम अभ्यास करीत होता तिकडे गेली.

तिनें रामला दरडावून विचारलें. " भगा कोळ्याला तूं मारून झोडून घालवलास काय ? "

राम चपापला. पाटीवरची दृष्टि काढून त्यानें क्षणमात्र तिच्याकडे पाहिलें, आणि उत्तर देण्याच्या भानगडींत न पडतां पलीकडच्या दारानें यःपलायन केलें !

निरूपमेला खरी हकीकत कांहीं समजली नाहीं. घरांत येऊन तिनें भगा कोळ्याला पुन्हा बोलावून आणलें, व मासे पकडण्याची आज्ञा केली.

हुकूम मिळतांच भगा जाळें घेऊन गेला. आणि थोड्याच अवकाशांत त्यानें एक भला थोरला रोही मासा खांद्यावरून आणून धपकन् अंगणांत टाकला.

निरूपमा सैंपाकघराच्या दरवाजांत उभी होती. तो मासा बघतांच ती नखशिकान्त कांपली ! साशंकित होऊन तिनें विचारलें, " काय रे, आपल्या घाटावर तर नाहीं पकडलास हा ? रामाच्या कार्तिक गणेशपैकीं नव्हेना ? "

एवढा मोठा मासा आपण किती लवकर पकडून आणला हें सांगण्याच्या फुशारकींत भगा म्हणाला, " होय वयनीसाहेब ! हा आपल्या तळींतील रोही. किती मोठा आहे बघा ! "

आणि विचक्षणेकडे अंगुलिनिर्देश करून तो म्हणाला, " या आजीबाईंनीं हाच पकडून आणण्यास सांगितलं होतं. "

निरूपमा स्तब्ध उभी राहिली. नृत्यकालीची रामवर फारशी मर्जी नव्हती तरी तिला देखील हा मासा पाहून रामचा कैवार घ्यावेसें वाटलें. ती विचक्षणेला म्हणाली, " आजीबाई ! धाकट्या बाबूंच्या

कार्तिक गणेशला आळीभरचे लोक जाणतात. मग तुम्ही काय म्हणून हाच मासा पकडण्यास लावलेंत ? आणखींहि तळीं होतीं; त्यांच्यांत मासे नाहींत ? दहा बारा जण तर जेवणार, त्यासाठीं हा अर्ध्या मणाचा मासा कशाला ? आतां लपवा याला; धाकटा बाबू कुठं गेला असेल तो इतक्यांत येईल."

विचक्षणा जड जिभेनें म्हणाली, "मला माहीत नव्हतं बाई याचा एवढा अनर्थ होईल असं. एक मासा पकडला तर लागल्या सतरा गोष्टी सांगायला. याला लपवा !–अन् ब्राह्मण काय जेवतील ? तुझं डोचकं ?"

नृत्या उत्तरली, "तुमचे ब्राह्मण जेवणार दोन अडीच वाजतां. अजून भरपूर वेळ आहे. धाकट्या बाबूला अगोदर शाळेंत जाऊं दे. नाहीं तर या घरांत रहायलाच नको. अहो, भोळा नुकता तर इथं होता. त्याला सांगायला गेला वाटतं. वयनी, आतां काय करायचं तें लवकर करा पाहूं. आणखी उभ्या राहूं नका."

भगा चार आण्यांच्या आशेनें जाळें घेऊन आला होता. परंतु हा सर्व प्रकार पाहून नगद बक्षिसाच्या आशेवर त्यानें पाणी सोडलें आणि जाळ्यासहित तो चालता झाला.

हवा तेव्हां राम नेमका कोठें सांपडूं शकतो. तें भोलाला माहीत होतें. धांवत धांवत तो बगीच्यांत पेरूखालीं गेला. राम एका झाडाच्या डहाळीवर बसून पाय हालवीत पेरू खात होता. धापा टाकीत भोला त्याला म्हणाला, "दादा ! लवकर चल बघायला. भगानें तुझ्या कार्तिकला मारलें रे !"

पेरू खाण्याचें सोडून राम म्हणाला, "वा: !"

"खरंच दादा. आईनं पकडण्यास सांगितलं. अजून अंगणांतच पडला आहे. बघ तरी चल !"

रामानें धाडकन् खालीं उडी ठोकली. आणि तो वायुवेगानें येऊन अंगणांत थडकला. येतांक्षणींच तो जागच्या जागीं गोठल्यासारखा उभा राहिला, आणि त्यानें एकदम किंकाळी फोडली—" अरेरे ! हा तर माझा गणेश ! वयनी, तूं हुकूम देऊन माझ्या गणेशला पकडण्यास लावलंस ना ?" इतकें बोलून तो जमीनीवर उपडीं पडला व मान कापलेल्या बकऱ्याप्रमाणें तंगड्या झाडूं लागला ! त्याचा हा शोक किती सत्य, किती दुर्दम्य होता या विषयीं विचक्षणेला सुद्धां शंका उरली नाहीं.

त्या रात्रीं रामानें जेवावें म्हणून निरूपमेनें परोपरीनें खटपट केली. पण रामानें तिला झिटकारलें. आणि सबंध दिवसाच्या उपवासानंतर पांचसहा घांस गिळून तो उठून गेला.

* * *

विचक्षणा दाराआड उभी राहून जांवयाला म्हणाली, " तुम्ही सांगा एकवेळ, नाहींतर निरू जेवणार नाहीं. दिवसभर उपाशींच आहे."

श्यामलालनें विचारलें, " उपाशीं का ?"

विचक्षणा रडण्याऐवजीं केंविलवाण्या सुरांत म्हणाली, " माझ्याकडून एक चूक झाली. मला काय माहीत, कीं तळींतून ब्राह्मणभोजनासाठीं एक मासा आणला तर एवढा अनर्थ होईल ?"

श्यामलालच्या लक्षांत कांहीं न आल्यामुळें त्यानें नृत्याला बोलावून विचारलें, " नृत्या, काय भानगड आहे ही ?"

दाराआडूनच नृत्या म्हणाली, " तो धाकट्या बाबूचा गणेश—"

श्यामलालनें चकित होऊन विचारलें, " रामच्या कार्तिक-गणेशपैकीं एक होता का तो ?"

नृत्या उत्तरली, " हो !"

अधिक कांहीं सांगण्याची आवश्यकताच नव्हती. सगळी गोष्ट त्याच्या ध्यानांत आली. तो म्हणाला, " राम पण जेवला नसणार ! "

नृत्यानें म्हटलें, " छे ! "

श्यामलाल म्हणाला, " मग तिला जेवण्याचा आग्रह करण्यांत अर्थ काय ? राम जेवला नाहीं, तर ती थोडीच जेवणार ! "

विचक्षणेनें तोंड उघडलें : " असा अनर्थ होईल हें माहीत असतं, तर ब्राह्मणभोजनाची गोष्टच काढली नसती मी. तिनं स्वतः हुकूम देऊन मासा पकडण्यास लावला, नि आतां असं काय करते कोण जाणें. मी उगी होतें, तरी सगळा दोष माझाच. आम्ही नकोशीं झालों आहोंत, तर आम्हाला कुठं दुसरीकडे पाठवा. इथं घडीभरहि निभावणार नाहीं आमचं."

जरा वेळ उभी राहून वहिवाटीनुसार रडव्या सुरांत तिनें पुढें पाढा वाचला,—" माझं नशीब फुटकं नसतं, तर माझा भाऊ कां मरता नि मला लाथाबुक्के खात कां रहावं लागतं ! माझा निरुपाय आहे म्हणून पदर पसरतें; आमची कांहींतरी व्यवस्था करा. "

श्यामलाल त्रासल्यासारखा झाला; पण कांहींच बोलूं शकला नाहीं.

निरूपमा दाराआडून सर्व कांहीं ऐकत होती. आपल्या आईचा हा निर्लज्ज मायावीपणा पाहून तिला मेल्यापरी झालें. सरळ रामच्या खोलीकडे ती गेली आणि दार खडखडावून म्हणाली, " बाळ ! एकदां दार उघड ना ! "

राम जागा झाला. परंतु त्यानें ओ दिली नाहीं. निरूपमा पुन्हा म्हणाली, " ऊठ ! उघड दरवाजा. "

या खेपेला तो मोठ्यानें ओरडला, " नाहीं ! उघडत नाहीं जा. तूं जा. तुम्ही माझे वैरी अहांत ! "

" बरं तसं समज; पण दार तर उघडशील ? "

"नाहीं–नाहीं–नाहीं! मी नाहीं उघडायचा."

श्यामलाल आपल्या खोलींतून हें सगळें ऐकत होता. निरूपमा खोलींत येतांच तिला तो म्हणाला, "यांतून कांहींतरी मार्ग काढ; किंवा मीच इथून चालता होतों. हा धिंगाणा मला खपणार नाहीं."

कांहीं एक उत्तर न देतां निरूपमेनें विचार चालवला.

यानंतर दोन तीन दिवस गेले, तरी रामचा राग कमी झाला नाहीं तेव्हां निरूपमा मनांतून क्षुब्ध झाली. आज सांज होऊन गेली तरीहि राम शाळेंतून परत आला नाहीं, त्यावेळीं तर निरूपमा उत्कंठेनें आणि रागानें फारच अधीर झाली. विचक्षणा नदीवरून न्हाऊन साऱ्या मुलखाच्या उठाठेवी करीत, रामचें अकल्याण चिंतीत, आणि आपल्या थोरल्या मुलीच्या जगावेगळ्या वागणुकीचे दुष्परिणाम काय होतील याचें भविष्य शेजारणीपाजारणीशीं वर्तवीत घरीं परत येत होती. इतक्यांत वाटेमध्यें एक बातमी तिला मिळाली आणि तशी ती जणुं रडतच घरीं येऊन पोंचली. अंगणांत पाय ठेवतांच ती मोठ्यानें म्हणाली, "निरू? ऐकलंस आपल्या दिराचं कर्म?"

भीतीनें निरूपमेचा चेहरा फिका पडला. तिनें विचारलें, "काय ग आई?"

विचक्षणा म्हणाली, "त्याला चौकीवरती नेलें,—नेणारच म्हणा असा खट्याळ आहे बाई, त्याच्यासारखा पुंड सात जन्मांत बघितला नाहीं."

तिच्या चेहऱ्यावर आनंदोर्मि उसळत होत्या. तिला मुळींच उत्तर न देतां निरूपमेनें मोलकरणीला हांक मारून विचारलें, "नृत्या, राम अजून आला कसा नाहीं ग? भोलाला दवड पाहूं जरा; शोधून-सवरून आलें ना!"

नृत्या गोष्टी ऐकण्याच्या नादांत 'हं' म्हणून उभीच राहिली

होती. तिला धमकावून निरूपमा म्हणाली, "उभी आहेस अजून. जात कां नाहींस ? ऐकूं आलं नाहीं वाटतं ?"

नृत्या चुटपुटून चालती झाली. विचक्षणा उसन्या उद्वेगानें म्हणाली, "काय झालं माहीत आहे निरू—"

"आई, तूं ओलेतें बदल बघूं अगोदर. मग पाहिजे तर सांग काय तें." असें बोलून निरूपमा निघून गेली. विचक्षणा चकित होऊन मनांत म्हणाली, "ओहो! पोरीचा राग तरी बघा." एका प्रकरणाचें तिखट मीठ लावलेलें वर्णन करण्यास न मिळाल्यामुळें तिच्या पोटांत दुखूं लागलें.

तें प्रकरण थोडक्यांत असें :—गांवांतील ज्या शाळेंत राम जात असे त्याच शाळेंत जमीनदाराचा एक मुलगा शिकत होता. आज मधल्या सुटींत रामचा नि त्याचा वादविवाद झाला. विषय होता गुंतागुंतीचा; म्हणून निकाल न लागतां हुज्जत जुंपली. जमीनदाराचा मुलगा म्हणाला, "शास्त्रांत लिहिलंय्, कीं स्मशानकालीच रक्षाकालीपेक्षां अधिक जागृत. कारण, तिची जीभ जास्त लांब आहे."

त्यावर हरकत घेऊन राम म्हणाला, "छे! स्मशानकालीची जीभ रुंद आहे खरी, पण इतकी लांब किंवा लालहि नाहीं." थोड्याच दिवसांमागें आळींत रक्षाकालीची सार्वजनिक पूजा झाली होती. त्या वेळच्या सर्व गोष्टींची आठवण रामच्या मनांत ताजी होती. पण जमीनदाराच्या मुलानें त्याचें म्हणणें कबूल केलें नाहीं. आपल्या हाताचा पंजा दाखवून तो म्हणाला, "एवढीशी तर आहे रक्षाकालीची जीभ !"

राम संतापला. तो म्हणाला, "काय एवढीशीच ? मुळींच नाहीं. —इतकी लांब आहे हो. एवढ्याशा जिभेनं ती सगळ्या जगाचं

रक्षण कशी करूं शकेल ? ती जगाचं रक्षण करते म्हणून तिला रक्षाकाली म्हणतात. ”

आणखी थोडी बोलाचाली झाली. आणि प्रकरण हातघाईवर आलें. जमीनदाराचा मुलगा कमजोर होता. अर्थात् त्यानें मार अधिक खाल्ला. त्याच्या नाकांतून दोनतीन थेंब रक्तहि निघालें. या भिकार शाळेच्या जीवनांत असला ‘ भयंकर ’ प्रकार कधींच घडला नव्हता. ज्या जमीनदाराची शाळा त्याच्याच चिरंजीवाच्या नाकांतून रक्त ! मग काय विचारतां ? लगेच हेडमास्तरांनीं शाळा बंद करून विद्यार्थ्यांची सभा भरवली. पण राम अगोदरच पसार झाला होता हें सांगायला कशाला पाहिजे ?

भोला परत येऊन म्हणाला, “ दादा कुठं सांपडत नाहीं. ”

कांहीं वेळानें श्यामलाल सुतकी चेहऱ्यानें घरीं येऊन अंगणांतूनच म्हणाला, “ ऐकलंस ग ! आतां गांव सोडून चालतं झालं पाहिजे. चाकरी करून चार पैसे कमवत होतों ते पण गेल्यांतच जमा. ”

निरूपमा माजघरांतून बाहेर आली. कोरड्या पडलेल्या आवाजांत तिनें विचारलें, “ त्याला चौकीवरती नेलं का ? ”

श्यामलाल मानेनें नकार देऊन म्हणाला, “ बडे बाबू देवमाणूस आहेत; ते सोडतील. पण इतर लोक ? दररोज एक ना एक भानगड व्हायला लागल्यावर गांवांत कसं रहातां येईल ? ”

निरूपमा म्हणाली, “ अजून घरीं आला नाहीं. भयानं कुठं तरी पळाला असं वाटतं ! ”

श्यामलाल गंभीरपणें म्हणाला, “ पळो किंवा न पळो. आतां त्याच्याशीं आमचा संबंध नाहीं. सावत्र भाऊ, लोक नांवं ठेवतील, म्हणून इतके दिवस कसंबसं निभावून नेलं. पण यापुढं जमायचं नाहीं. आतां आपल्या जिवाला जपलं पाहिजे. ”

विचक्षणा सैंपाकघरांतून मध्येंच म्हणाली, " होय तर ! आपल्या मुलांबाळांकडे पाहिलंच पाहिजे. "

श्यामलाल उत्तेजित होऊन म्हणाला, " तर ! पहायला नको कसं ? अलबत् पाहिलं पाहिजे. म्हणून उद्यांच गांवांतील पंच बोलावून वांटप करून मोकळा होतों. अन् तुलाहि बजावून ठेवतों ग, कसल्याच बाबतींत आतां त्याला बोलण्यासवरण्याची आवश्यकता नाहीं. त्याला वाटेल तें तो करो; जमीनदाराच्या मुलावर हात टाकतो काय ? आतां समजेल. "

विचक्षणा मनांतून बेहद्द खूष झाली आणि म्हणाली, " निरूला कोण जाणें काय इतकी गरज पडली आहे त्याला सांगण्यासवरण्याची. त्याला बघतांच माझ्या काळजाचं तर पाणी पाणी होतं ! गांवढळ पोर,–खुशाल मला शिव्या देतो, मग निरूला दिल्याशिवाय राहील ? " मी तर हेंच सांगेन बाई, आपला मान आपण राखला पाहिजे. रामच्या भानगडींत तूं पडूं नकोस. "

सासूच्या या सदुपदेशाला श्यामलाल दुजोरा देऊं शकला नाहीं. उलट लाजून त्यानें मान खालीं घातली. तो एवढेंच म्हणाला, " कांहीं असो. त्याच्या अंगाला हात लावण्याचें कारण नाहीं. "

निरूपमा मुग्ध नि निश्चल होऊन सर्व कांहीं ऐकत होती. कोणत्याहि गोष्टीचें तिनें उत्तर दिलें नाहीं. आणि नंतर हळुहळू आपल्या कामाला ती निघून गेली.

एका तासानें नृत्यानें येऊन तिला हळूच सांगितलें, " वयनी धाकटा बाबू आलाय् बरं का. "

निरूपमा गुपचुप रामच्या खोलींत गेली आणि तिनें खोलीच्या दाराला आंतून कडी लावली. राम बाजेवर स्वस्थपणें पडून कसला तरी विचार करीत होता. कडी लावल्याचा आवाज होतांच त्यानें

दचकून बघितलें.—वयनीनें दार बंद केलें असून तिनें स्वतःच आणून ठेवलेली कोपऱ्यांतील वेताची छडी ती उचलत आहे असें त्याला दिसलें. चटकन् उडी मारून बाजेखालीं पलीकडच्या बाजूला उभा राहिला. निरूपमा म्हणाली, "चल इकडे ये !"

राम काकुळतीनें म्हणाला, "पुन्हा नाहीं करणार असं वयनी, एक वेळ सोड !"

निरूपमा त्याला रागें भरून म्हणाली, "इकडे आलास तर चोप कमी मिळेल नाहींतर हा वेत तुझ्या पाठीवरच फोडीन समजलास !"

तरी राम जागचा हालला नाहीं. जिथल्या तिथें उभा राहून वयनीची मनधरणी करूं लागला.—"वयनी, पुन्हां कधीं करायचा नाहीं असं. शपथ घेतों कान पकडतों—"

निरूपमेनें बाजेवर चढून सपकन् त्याच्या पाठीवर एक वेत ओढला. आणि आणखी वेतामागून वेत लगावले. रामनें अगोदर पलीकडील खिडकीमधून उडी मारून पळण्याचा प्रयत्न केला, मग तो खोलीभर फिरला आणि शेवटीं नाइलाजानें त्यानें रडत रडत वयनीच्या पायावर लोळण घेतली. नृत्या खिडकीबाहेरून हें पहात होती. ती रडकुंडीस येऊन म्हणाली, "वयनी, सोडा ना त्याला ! त्याच्या वाट्याची शिक्षा मला द्या."

विचक्षणा मध्येंच नृत्याला म्हणाली, "ज्या त्या गोष्टींत तोंड कशाला खुपसतेस ग ?"

श्यामलालनें आपल्या खोलींतून बायकोला हांक मारून म्हटलें. काय चालवलंस आहे हें ! सारी रात्र त्याला झोडपतच रहाणार का ?"

छडी फेंकून निरूपमा रामला म्हणाली, "याद राख !"

४

राम न्याहारी करत होता. त्याचवेळीं विचक्षणा दाराआडून हेल काढीत म्हणाली, "एवढ्या मोठ्या मुलाला कुठं असं झोडपतात का! त्याचे दादा देखील त्याच्यावर हात उगारत नाहींत."

काम उरकतां उरकतां नृत्या म्हणाली, "तुम्ही पण कांहीं कमी नाहीं आजीबाई! तुम्हींच तर वयनीकडे त्याच्या कागाळ्या नेतां."

त्या रात्रीं रामला मिळालेला मार तिला मुळींच खपला नव्हता. तिचें बोलणें ऐकून राम डोळे वटारून गुरगुरला, "थेरडी! सटवी! आम्हा सर्वांना खायला आलीय्!"

विचक्षणा किंचाळली, "ऐक ग निरू, ऐक! आपल्या दिराचे शब्द ऐक."

निरूपमा आंघोळीला चालली होती ती मागें फिरली आणि वैतागून म्हणाली, "आणखी कांहीं ऐकण्यासवरण्याचं माझ्यांत त्राण उरलं नाहीं ग, आई. खरं सांगतें नृत्या, मरायला होईल तर बरं; सुटेन एकदांची! आतां मला सोसवत नाहीं हें. अरे ए माकडा! अजून तुझ्या पाठीवरचे वळ देखील गेले नाहींत नि इतक्यांतच सगळं विसरलास?"

रामनें उत्तर दिलें नाहीं. तो जेवूं लागला. आणि निरूपमा अधिक कांहीं न बोलतां आंघोळीस गेली. जेवून होतांच राम अंगणांतील पेरूच्या झाडावर चढला. हाताला लागतील ते कच्चेपक्के पेरू खाण्याचा त्यानें सपाटा चालवला. इतकेंच नव्हे, तर उगाचच कच्चे पेरू कुरतडून फेंकूं लागला. तें पाहून विचक्षणा भडकली. निरूपमा तर घरीं नव्हती. मग तिला उगी रहावेनाच तेव्हां ती रामला म्हणाली, "तुझ्यामुळें पिकलेला पेरू उष्टवायला मिळेल तर शपथ! कशाला कच्चे पेरू तोडतो आहेस उगाच?"

रामला तिचें बोलणें कधींच खपत नसे. तशांत, आपल्याला मार बसण्याचें कारण ही म्हातारी आहे असें नृत्याकडून नुकतेंच समजल्यामुळें तर तो चवताळला. झाडावरूनच तो ओरडला, "मुद्दामच करतोंय्, थेरडे !"

हें विशेषण विचक्षणेला बिलकुल पसंत नव्हतें. तोंड वेंगाडून ती म्हणाली, "थेरडे !—मुद्दामच करतोंय ? बरं येऊं दे तिला. कुत्ता तशीच लत्ता ! कसा कोडगा ग बाई तरी. मार खाऊन पाठीचं सालटं निघालं तरी शरम नाहीं मेल्याला."

राम वरूनच ओरडला, "सटवे ! थेरडे—"

"सटवे ! थेरडे ! लहान तोंडीं मोठा घास ? हरामखोर ! उतर आधीं खालीं."

राम म्हणाला, "कां उतरूं ? झाड काय तुझ्या बापाचं आहे ?"

विचक्षणा वेडावली. ती खूप मोठ्यानें म्हणाली, "अं,—बाप काढतोस ! ऐकलंस नृत्या, ऐकलंस ना ?"

इतक्यांत निरूपमा नदीवरून न्हाऊन आली. झाडावर नजर जातांच ती रामला म्हणाली, "जेवून शाळेला गेला नाहींस तो ?"

रामचा बेत होता, कीं झाडावरून दुरूनच वयनीला येतांना पाहूं नि उतरून पळ काढूं. परंतु भांडणाच्या गडबडींत तिच्या वाटेकडे त्याचें लक्ष गेलें नाहीं. आणि आतां तर ती समोरच येऊन उभी. तो भीत भीत म्हणाला, "पेरू खातोय् !"

"तें तर दिसतंच आहे. शाळेंत कां गेला नाहींस ?"

"पोटांत दुखतंय् ना !"

निरूपमेला भारी राग आला. ती म्हणाली, "तरीच न्याहरी करून वरती पेरू खातो आहेस ?"

मुलीचा आवाज ऐकून विचक्षणा धांवत आली आणि म्हणाली,

"हरामखोर ! बैलोबा !—माझा बाप काढतो बघ. म्हणतो कसा,—कां उतरूं ? झाड काय तुझ्या बापाचं आहे ?"

निरूपमेनें वर बघून विचारलें, "कायरे, बोललास असं ?"

राम ओशाळून म्हणाला, "नाहीं ग वयनी, असं बोललों नाहीं."

विचक्षणा किंचाळली, "नाहीं बोललास हरामखोरा ? नृत्या साक्षी आहे." आणि तोंड वेडेंवांकडें करून ती पुन्हां नाकांत म्हणाली, "त्या दिवशीं सपासप वेत बसले तेव्हां कसा म्हणत होता 'परत नाहीं करणार ग वयनी ! पायां पडतों ग वयनी ! मेलों ग वयनी !' धरला म्हणजे चीं चीं करतो, नि सोडून दिला कीं थपथप नाचतो हरामखोर !"

तेव्हां रामला स्वस्थ राहावलें नाहीं. त्याच्या हातांत एक मोठा कच्चा पेरू होता. तो ताडकन् त्यानें फेंकला. पण तो विचक्षणेला न लागतां निरूपमेच्या डाव्या भोंवईवर जाऊन जोरानें आदळला. त्याबरोबर तिला घेरी आली नि तत्क्षणींच ती मटकन् खालीं पडली. विचक्षणेनें खूप हळकल्लोळ केला. नृत्या हातांतील काम टाकून धांवत आली. आणि रामनें झाडावरून उडी ठोकून एका दमांत पळ काढला !

दुपारीं श्यामलाल जेवण्याखाण्यासाठीं घरीं येऊन बघतो तर हा विपरीत प्रकार ! निरूपमा निपचीत पडली असून तिचा डावा डोळा सुजला होता. त्याच्यावर ओल्या फडक्याची घडी ठेवून नृत्या पंख्यानें वारा घालीत बसली होती. विचक्षणा आज दाराआड उभी न रहातां समोर येऊन जांवयाला म्हणाली, "आज राम निरूला ठारच करणार होता !"

श्यामलाल विस्मित झाला. जवळ जाऊन त्यानें जखमेची परीक्षा केली आणि कठोरपणें तो बायकोला म्हणाला, "याउपर तूं त्याला जेवूं घातलंस, एक दिवसहि त्याच्याशीं बोललीस, त्याच्या कोणत्याहि गोष्टींत पडलीस, तर माझ्या गळ्याची तुला शपथ आहे !"

निरूपमा रोमांचित होऊन म्हणाली, " उगी रहा. कांहींतरी बडबडूं नका. "

श्यामलाल म्हणाला, " माझी एवढी मोठी शपथ तूं पाळणार नाहींस त्या दिवशीं मी मेलेला तुला दिसो ! "

इतकें बोलून तो स्वत: डॉक्टरला आणण्यास गेला.

राम सारा दिवस नदीकिनारीं भटकून अशक्य अशा सर्व गोष्टींची कल्पना करीत, संध्याकाळ झाल्यावर लपतछपत घरीं आला. तेव्हां अंगणाच्या मधोमध तट्या बांधून घराचे दोन हिस्से करण्यांत आले आहेत असें त्याला आढळलें. त्या तट्या त्यानें हालवून पाहिल्या. अगदीं घट्ट होत्या; निखळतां येईनात घराच्या नवीन भागांतील सैंपाघरांत दिवा पेटत होता. हळूच वांकून त्यांनें बघितलें. तिथें कुणीहि नसून तांब्यापितळेच्या भांड्यांची रास मात्र पडली होती. एकंदर प्रकार काय आहे हें जरी त्याला कळलें नाहीं, तरी सकाळच्या प्रकरणाशीं याचा संबंध असावा अशी कल्पना येतांच त्याचें मन खिन्न झालें. मग आपल्या हिस्स्याच्या त्या घरांत जाऊन पलीकडच्या भागांतील माणसांच्या हालचालीचा तो सुगावा घेऊं लागला. अगोदर त्याला फार भूक लागली होती. पण आतां तिचासुद्धां विसर पडला. रात्रीचे नऊ वाजले असतील. रामनें दुसऱ्या घरांत जाऊन पाठीमागचं दार खडखडावलें. दार उघडून नृत्या एका बाजूला उभी राहिली ?"

रामनें विचारलें. " वयनी कुठं नृत्या ? "

" खोलींत निजली आहे. "

त्यानें खोलींत जाऊन पाहिलें. वयनी बाजेवर निजली असून, खालीं जमिनीवर चटई टाकून विचक्षणा आपल्या धाकट्या मुलीला घेऊन बसली होती. गोविंद खेळत होता. तो धांवत येऊन काकाच्या

हाताला लोंबकळत म्हणाला, "काका ! तुझं घर तिकडे आहे; हें आमचं घर. बाबांनीं सांगितलंय्, कीं तूं इकडे आलास तर तंगडीच तोडीन !"

राम निरूपमेच्या बाजेवर तिच्या पायाकडील बाजूस बसला. तिनें आपले पाय आखडले. तरी राम उगा बसून राहिला. तेंव्हां विचक्षणा आपल्या धाकट्या मुलीला हालवून म्हणते, "सुरू, त्याला सांगत कां नाहींस आपल्या भावोजींनी काय बजावून ठेवलंय् तें ?"

सुरू तोंडपाठ केल्याप्रमाणें घडघडां सांगूं लागली, "भावोजी म्हणाले आहेत, कीं तूं इकडे येतां कामा नयेस. उद्यां सकाळीं सर्व—पुढें काय ग आई ?"

विचक्षणा म्हणाली, "इस्टेट—"

सुरू म्हणाली, "इस्टेट इत्यादीचं वांटप होईल."

विचक्षणा म्हणाली, "त्यांनीं काय शपथ घातली आहे सांग ना ! छे, अगदीं निरूपयोगी पोर बाई."

सुरू म्हणाली, "भावोजींनी ताईला शपथ घातलीय्, कीं तुला जेवूं घालतां नये, तुझ्याशीं बोलतां नये,—हो ! असं म्हणाले भावोजी."

निरूपमेनें बिछान्यावर पडल्या पडल्याच तिला धमकावलें,— "पुरे पुरे ! बस कर. उगी रहा."

त्यावर विचक्षणा म्हणाली, "ठीक तर सांगते आहे. हा जर लोकांना ठारच करूं लागला तर ते शपथ घालणार नाहींत ? मी तरी बाई त्यांना मुळीं दोष द्यायची नाहीं. कुणी वाटेल तें म्हणो. यापुढं या घरीं तुझं येणंजाणं, खाणंपिणं चालायचं नाहीं. नवऱ्याची शपथ हिला पाळली पाहिजे ना !'

सुरू मध्येंच आईला म्हणाली, "मला भूक लागलीय् ग. वाढ चल ना !"

विचक्षणा वैतागल्याचा आव आणून म्हणाली, " असं काय ! थांब ग बाळ जरा."

राम घरांत बसला असतांना घराला आग लागती तरी ती उठती ना.

हृदयांत दाबून ठेवलेल्या रड्यामुळें रामचें मस्तक ठणकूं लागलें. तो रडूं शकला नाहीं कीं एकवेळ म्हणूं शकला नाहीं—" वयनी ! पुन्हा करणार नाहीं असं." या एकाच वाक्यानें कितीतरी संकटप्रसंगी त्याचें रक्षण केलें होतें परंतु आज तें उच्चारूं न शकल्यामुळें त्याचा जीव गुदमरला.

निरूपमा खोल गेलेल्या आवाजांत म्हणाली, " सुरू, त्याला जायला सांग."

तेव्हां रडें आवरून तो म्हणाला, " हं ! 'जायला सांग त्याला.' मला भूक लागली नाहीं वाटतं ? कधींचा उपाशीं तर आहे !"

निरूपमा कांहींशी उद्वेगानें म्हणाली, " मग ठार कां नाहीं केलंस मला !–मग खूप खायला मिळालं असतं. मला नाहीं माहित. जा पाहिजे तर नृत्याकडे."

" नाहीं जात नृत्याकडे. कुणाकडे जायचा नाहीं. मी उपाशींच निजेन !" असें म्हणून धाडधाड पाय आपटीत सबंध घर हादरवीत आपल्या खोलीमध्यें जाऊन तो निजला. जराशानें नृत्यकाली त्याच्याकडे जेवणाचें ताट घेऊन आली व म्हणाली, " बाबू, ऊठ ! जेव ना ?"

राम चवताळून ओरडला, " काळतोंडे ! चालती हो इथून आधीं ! चल् निघ...."

नृत्यकाली जेवण तिथेंच ठेवून गेली. रामनें ताट, वाटी उचलून अंगणांत खणाखण भिरकावलीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं श्यामलाल कामाला गेल्यावर राम आपल्या घराच्या अंगणांत येरझारा घालीत ओरडूं लागला,–" मी नाहीं जाणत

शपथ त्रिपथ. ओहो ! काय पण यांची शपथ ! ते कोण शपथ घालणार ? ते काय माझे दादा लागतात थोडेच ? कुणी नव्हेत ते माझे. मी नाहीं ऐकणार त्यांचं. त्या सटव्या थेरडीला मारायला गेलों, पण चुकून वयनीला लागलं. मग उगाच शपथ कां घातली मला ? ”

या सगळ्या बडबडण्याला कोणीहि उत्तर दिलें नाहीं. नंतर तो मऊपणें म्हणाला, “ बरं ! छान् झालं ! हरकत नाहीं, नका बोलूं, नका देवूं खायला. मी स्वतः मजेनें सैंपाक करीन,–डाळ, भात, भाज्या अन् मासे–नि एकटाच पोटभर जेवेन ! माझं काय जातं. ”

या बोलण्यालाहि कोणी उत्तर दिलें नाहीं. मग आपल्या सैंपाकघरांत जाऊन तो दणादण खणाखण ताट, वाट्या, तांब्े इकडे तिकडे आदळत आपटत कामास लागला. त्यानें भोलाला मोठ्यानें हांक मारून डाळ तांदूळ धुण्यास आणि भाजी चिरण्यास सांगितलें. भोलाला त्यानें हुकूम सोडला, “ तूं माझा गडी आहेस. तिकडे जाशील तर खबरदार ! अन् तिकडचं कुणीहि इकडे आलं तर तंगडी तोड,— समजलं भोला ! नृत्याला इकडे फिरकूं दे तर खरी ! ”

निरूपमा आपल्या सैंपाकघराच्या पडवींत बसून निमूटपणें सगळें ऐकत होती. विचक्षणा अधुनमधून उत्सुकतापूर्वक तट्टीच्या फटींत डोकावून पहात होती. थोड्या वेळानें निरूपमेकडे येऊन ती कुजबुजून म्हणाली, “ अहाहा ! काय पण बेट्याची अक्कल ! म्हणे चांगलं जेवण करून जेवणार. पातेलींत कांठोकांठ तांदूळ घातले आहेत अन् पाणी ठेवलंय् एवढंसं—भात शिजवतोय् बरं ! एकटा तर जेवणार, नि भात आहे दहा जणांचा. अन् भात तरी काय ? त्या पातेलींत एवढ्या तांदळांचा भात कसा होईल बाई ? आम्ही नाहीं का सैंपाक केला ? पण आम्हाला कधीं याच्याइतकी घमेंड वाटली नाहीं. भात

करायचा असेल, तर पाणी नेमकं इतकं ठेवीन कीं पुन्हा तिकडे बघायलाच नको,—डोळे झांकून भात उतरावा. अगदीं तयार !.... ”

निरूपमेनें तिच्याकडे पाठ फिरवली.

पण नृत्या जवळच बसली होती ती म्हणाली, “ आजीबाईचं कांहींच्या बाहींच बोलणं. कधीं एक दिवस तरी त्यानं आपल्या हातानं पाण्याचा तांब्या भरून घेतलाय् का ? मग आज तो सैंपाक करणार कसा ? ”

ती जुनी मोलकरीण असल्यामुळें साहजिकच तिला या सगळ्या प्रकाराचा तिटकारा आला.

आईचें अनुकरण करून सुरूहि अधुनमधून तट्टीच्या फटींत डोकावूं लागली. सरासरी तासानें धांवत येऊन आपल्या ताईचा हात ओढत ती म्हणाली, “ ए ताई ! ताई ग, बघ तरी चल ! रामदादा कीं नाहीं कच्चा नि कोरडाच भात जेवतो आहे. दुसरं कांहीं नाहीं, नुसता भातच. वा ! कच्चा भात जेवल्यानं पोटांत दुखणार नाहीं का ताई ? ”

निरूपमेनें तिला झिडकारलें आणि ती अंथरुणावर जाऊन पडली. आज किती कष्टानें, भुकेच्या वेदनांनीं व्याकुळ होऊन तो जेवत होता ही गोष्ट तिला कळल्यावांचून राहिली नाहीं.

दुपारीं श्यामलालचें जेवण झाल्यावर विचक्षणा निरूपमेला जेवण्यास बोलावूं लागली, “ दोन घास खा ना ग निरू ! चल पाहूं, जिवाला जास्त त्रास करून घेशील, तर ताप येईल बरं. चल जेव, मी सांगतें ना जेवण्यामुळें कांहीं अपाय होणार नाहीं. ”

निरूपमा लांबरुंद चादर पांघरून निजतां निजतां म्हणाली, “ मला संतावूं नकोस हं आई तुम्ही जेवून घ्या. ”

विचक्षणा म्हणाली, “ अग भात जेवूं नकोस, दोन चपात्या टाकतें तव्यावर. ”

निरूपमा उत्तरली, " अंहं ! मला कांहीं नको."

विचक्षणा चकित होऊन विचारते, " अं ! असं काय ? कालपासूनची तर उपाशी आहेस. आज देखील जेवली नाहींस, तर कसं चालेल ?"

निरूपमेनें याचें उत्तरच दिलें नाहीं. इतक्यांत नृत्या येऊन म्हणाली, " कशाला उगीच बोलण्याची तसदी घेतां, आजीबाई ? दिवसभर ओरडत राहिलां तरी ती घास उष्टवायची नाहीं. तिला ताप आलाय्, जरा स्वस्थ निजूं द्या."

विचक्षणा बडबडत चालती झाली,—" देव जाणें काय झालं ! जरासं लागलं म्हणून ताप थोडाच येतो ? कुणी उपाशीं का निजतात ? आमच्यानं व्हायचं नाहीं हें."

सांज झाल्यावर निरूपमा पुन्हा सैंपाकघराच्या पडवींत येऊन बसली. जितक्यांदा तिची नि नृत्यकालीची दृष्टादृष्ट झाली, तितक्यांदाहि कांहीं तरी बोलावेंसे तिला वाटलें. पण तिनें तें दाबून टाकलें.

दुसरे दिवशीं शाळेंतून येतांच रामनें हाततोंड धुवून बाजारांतून चुरमुऱ्यांचे लाडू आणले ते खातांखातां तो मोठ्यानें म्हणाला, " माझं काय जातं ! मजेनें जेवून शाळेंत गेलों, नि आतां पण कसा मजेंत बसून खातों आहे !"

तट्टीपलीकडे सगळेजण असणार हें त्याला ठाऊक होतें. परंतु सकाळच्याप्रमाणें यावेळींहि त्याला कोणी उत्तर दिलें नाहीं. तेव्हां बिचारा जास्तच अधीर झाला. मग ओरडून म्हणाला, " ही माझी हद्द. नृत्यकाली किंवा दुसरे कुणीहि या बाजूला आले तर तंगडीच तोडतों बघा."

तंगडी तोडण्याची ही धमकी तो यापूर्वी पण देऊन चुकला होता. परंतु त्यापासून पूर्वी जसें कांहींच निष्पन्न झालें नाहीं तसेंच या

खेपेलाही घडलें. अंधार पडल्यावर दिवा लावून तो आपल्या सैंपाकघरांत गेला आणि धिंगाणा घालूं लागला,—" माझा लाकूडफाटा कुठं, जेवण कसं शिजवूं ? माझा पाटावरवंटा कुठं, मसाला कसा वाटूं ? "

पलीकडच्या घरांतून नूत्या म्हणाली, " वयनी सांगतेय् कीं उद्यां बाजारांतून पाटावरवंटा मागवून देईन. "

" अं-हं, बाजारांतून आणलेला पाटावरवंटा मला नको ! ! " असें म्हणून रडत रडत सैंपाकघरांतून तो चालता झाला.

कांहीं वेळानें परत येऊन तो म्हणाला, " कां माझ्या गणेशाला पकडवलंस ? थेरडीनं मला डिवचून चिडवलं ? खूप शिव्या देतो तिला,—थेरडी मरून पुढच्या जन्मीं डांकीण होईल ! "

विचक्षणा डोळे मिचकावून म्हणाली, " ऐकलंस ग निरू, ऐकलंना ? मुद्दाम कळ काढतोय कीं नाहीं ? "

निरूपमा स्तब्धपणें दुसरीकडे पहात होती, तशीच पहात राहिली.

५

दुसरे दिवशीं सकाळपासूनच रामच्या वागण्यांत फरक पडला. दोन दिवस झाले. त्याच्या वयनीनें त्याला बोलावलें नाहीं, जेवूं घातलें नाहीं कीं मारलेंबिरलेंहि नाहीं. असें कधीं घडल्याचें त्याला माहीत नव्हतें. आज तो खरोखरच फार भयभीत झाला. आणि त्या मनःस्थितींतच सैंपाकघराच्या पडवींत बसून तोंडाला येईल तें बडबडूं लागला.—एकदां म्हणाला, " मांजरीला मारण्यासाठीं पेरू फेंकला मी, " मग म्हणाला, " हातांतून निसटून तो वयनीच्या डोक्याला लागला. " पुन्हा म्हणतो, " मी कच्चा पेरू टाकून देत होतों. " आणि परत म्हणाला, " मी नाहीं कुणाला शिव्या दिल्या ! " परंतु त्याचा एकहि कबुलीजबाब कामीं आला नाहीं. कोणीहि त्याला प्रत्युत्तर दिलें नाहीं, मग मन घट्ट करून लाजलज्जा सोडून तो

म्हणाला, "आतां पुन्हा कधीं करणार नाहीं असं !" पण त्याचा देखील उपयोग झाला नाहीं. तेव्हां त्याला रडूं कोसळलें. आतां तो आणखीं कशा रीतीनें, कोणत्या प्रकारें वयनीला संतुष्ट करणार बरं ? वयनीनें त्याला दूर लोटल्यावर तो जेवणार कुठं ? कुणाजवळ नि कसा रहाणार ? आज दाही दिशांना त्याला तड दिसेना ! आज तो जेवण करण्याच्या भानगडींत पडला नाहीं कीं शाळेलाहि गेला नाहीं. आपल्या खोलींत पडून राहिला.

न जाणें कुणाला नकळत रड रड रडल्यामुळें कीं काय त्या रात्रीं निरूपमेला ताप आला. दुसरे दिवशीं दुपारीं विचक्षणेनें दुधाची वाटी आणून तिच्या पुढ्यांत ठेवली आणि ती म्हणाली, "आतां मात्र घेतलंच पाहिजे. उपाशीं मरणार वाटतं !" निरूपमेनें मुकाट्यानें दुधाची वाटी उचलली व तोंडाला लावून खालीं ठेवली. आणि कुशीं वळून ती निजली. नको नको म्हणण्याचाहि आतां तिला वीट आला होता.

रात्रीचे नऊ वाजून गेले होते. त्यावेळीं नृत्या येऊन तिला म्हणाली, "वयनी, धाकट्या बाबूची कुठं जाग नाहीं. रात्र तर फार झाली !"

निरूपमा उद्वेगानें उठून बसली आणि रडूं लागली. ती म्हणाली, "जा ग, जा ! तो घरांत आहे कीं नाहीं बघून ये."

नृत्याचे डोळे भरून आले. तळहातानें डोळे पुसत ती म्हणाली "तिकडे जाण्याचा हिय्या होत नाहीं हो वयनी !" असें म्हणून ती बाहेर गेली व तिनें भोलाला बोलावून आणलें. भोलानें बघून येऊन सांगितलें कीं, रामदादा घरींच असून निजला आहे. दोन्ही हातांनीं कपाळ बडवून निरूपमा पुन्हां चादर पांघरून निजली.

दुसरे दिवशीं उजाडण्याअगोदर ती न्हाऊनधुऊन सैंपाकाला लागली. जवळजवळ अर्धा सैंपाक होत आला होता. इतक्यांत विच-

क्षणा उठली. आणि मुलीचें हें कामकाज पाहून आश्चर्यचकित झाली. तिनें कर्कशपणें विचारलें, "तुला काल ताप आला होता ना ग निरू? तीन दिवस तूं कांहीं उष्टवलं सुद्धां नाहींस, आणि आज पहाटेस उठून न्हाऊनधुऊन हें काय चालवलं आहेस कळूं दे जरा?"

निरूपमा सहज रीतीनें म्हणाली, "बघतेस तर खरी!—सैंपाक करतें आहे."

"तें तर बघतेंच आहे. पण कां तें कळूं देशील? माझ्या हातचं जेवण तुला चालणार नाहीं वाटतं?

निरूपमेनें उत्तर दिलें नाहीं. ती आपलें काम करूं लागली.

हा संवाद घडला त्याच्या आदल्या दिवशीं रामच्या मनांत एकच विचार घोळत होता, वयनीला किती दुखापत झाली कोण जाणें! एक कच्चा पेरू आपल्या कपाळावर पुन्हा पुन्हा मारून घेऊन त्या दुखापतीची कल्पना आणण्याचा तो यत्न करूं लागला! नंतर, काय केलें असतां अपराधाची भरपाई करतां येईल याचा त्यानें विचार चालवला. विचार करतां करतां त्याला एका गोष्टीची आठवण झाली. कांहीं दिवसांमागें वयनीनें त्याला इथें रहाण्याबद्दल सांगितलें होतें. त्याप्रमाणें आपण कुठें तरी गेलों, तर वयनी खूष होईल असें त्याला वाटलें. त्याचें आजोळ तारकेश्वर गांवापलीकडे होतें, पण नक्की कुठें तें त्याला माहीत नव्हतें. तिकडे जाऊन शोध करूं असें त्यानें ठरविलें. लहानसें गाठोडें बांधलें आणि उजाडण्याची वाट पहात तो बसून राहिला.

सैंपाक तयार होतांच निरूपमेनें एका ताटांत सर्व पदार्थ पद्धतशीर वाढले. त्याच वेळीं भोलानें येऊन तिला हांक मारली, "आई!"

पाठीमागें वळून निरूपमेनें त्याला पाहिलें आणि विचारलें, "काय रे भोला?" गेले कित्येक दिवस या घरच्या गाईला तो दाणापाणी

देत असे; पण रामच्या भयानें घरामध्यें मात्र पाय ठेवायचा नाहीं. त्यानें हळूच म्हटलें, "आई, इकडे तरी ये. कानांत एक गोष्ट सांगतों!"

निरूपमा जवळ येतांच तो कुजबुजून म्हणाला, "दोन रुपये देशील, तर तूं सांगितलं होतंस तसं होईल."

निरूपमेच्या कांहींच लक्षांत येईना. "काय होईल रे? कशाला हवेत दोन रुपये?" तिनें विचारलें.

भोला म्हणाला, "तूं दादाला सांगितलं नव्हतंस का जा म्हणून? तो जायला राजी झाला आहे.—बरं, दोन नाहीं तर एक रुपया तरी दे."

निरूपमेनें कळवळून विचारलें, "कुठं जायला राजी झालाय् रे? कुठं आहे तो?"

भोला म्हणाला, "बाहेर झाडाखालीं उभा आहे. कुठंसं त्या तिकडे, बाबांच्या गांवापलीकडे, त्याचं आजोळ आहे ना?"

"जा भोला तूं! लवकर घेऊन ये त्याला. सांग मी बोलावलें आहे."

भोला पळत पळत गेला. निरूपमा काष्ठवत् उभी राहिली. थोड्याच अवकाशांत राम एक लहानसें गांठोडें घेऊन भोलाबरोबर आला. निरूपमेनें कांहीं एक न बोलतां त्याच्या हाताला धरून त्याला घरांत नेलें!

दुरूनच विचक्षणेनें रामाला सैंपाकघरांत रिघतांना पाहिलें तेव्हां तिचा जीव कासावीस झाला. घाबऱ्याघुबऱ्या धांवत धांवत ती सैंपाकघरांत आली. वाढलेल्या पानासमोर निरुपमा रामाला मांडीवर घेऊन बसली होती. लगेच रामनें वयनीच्या कुशींत तोंड खुपसलें आणि त्याच्या पाठीवर श्रावण महिन्यांतील पावसासारखी तिच्या आंसवांची संततधार सुरू झाली!

हें दृश्य पाहून विचक्षणा चकितच होऊन गेली. क्षणभर उगी

राहून ती म्हणाली, "हं ! एवढ्यासाठीं का हा सैंपाक केलास ? छान् ! माझ्या जावयानं तुला शपथ घातली ती चुलींत गेली वाटतं ?"

मान वर करून निरुपमेनें उत्तर दिलें, "शपथ चुलींत का जाईल, आई ! त्यांच्या शब्दाबाहेर मुळींच गेलें नाहीं मी. तीन दिवसपर्यंत मी स्वत: कांहीं खाल्लें नाहीं कीं यालाहि खाऊं घातलें नाहीं."

विचक्षणा चिडून विचारते, "यालाच का म्हणतात शब्दाबाहेर गेलें नाहीं ? मग हें काय चाललं आहे ? ज्यांनीं तुला शपथ घातली त्यांची एकवेळ आज्ञा घ्यायला नको ?"

आपल्या हृदयावर झालेला हा कठोर प्रहार सोसून निरुपमा इतकेंच म्हणाली, "मी घेतली आहे त्यांची आज्ञा !"

विचक्षणेला खरें वाटेना. ती जास्तच चवताळून म्हणाली, "मी कुकुबाळ नाहीं बरं, निरू ! तूं आज्ञा घेतलीस नि मला कळल्या-वांचून बरी राहिली ?"

निरूपमेला हें सहन झालें नाहीं. ती कठोरपणें म्हणाली, "मी कुणाची कशी आज्ञा घेतली तें तुला कसं समजणार आई ? ज्यांना तोंड आहे ते शपथ घालूं शकतात पण–" इतकें बोलून अतिशय प्रेमपूर्वक रामला आपल्या छातीशीं घट्ट कवटाळलें आणि ती पुढें म्हणाली, "पण जी एखाद्याला आपल्या हृदयाशीं धरून लहानाचा मोठा करते तीच जाणते कीं आज्ञा कशी मिळवावी. तुला त्याची काळजी नको. इथून जरा जा पाहूं. याला दोन घांस भरवूं दे. माझा बाळ तीन दिवसांचा उपाशीं आहे !"

असें बोलत असतांच तिच्या डोळ्यांवाटे अश्रूंच्या सरीवर सरी ओघळूं लागल्या !

विचक्षणा किंचित् उगी राहून म्हणाली, "यापुढं मला कसं राहतां येईल इथं ! या घरीं माझा घडीभरहि निभाव लागणें शक्य

नाहीं हें आजच तुला मी स्पष्ट सांगतें. ”

निरूपमा म्हणाली, “ मी पण ही गोष्ट आजपर्यंत तुला स्पष्ट सांगूं शकलें नव्हतें. पण आतां सांगतें. आई तुला खरोखरच इथं रहातां येणार नाहीं. तुझीच दृष्ट लागून माझा एवढा मोठा बाळ वाळून गेला हो. तो दुष्ट असो किंवा आणखी कसाही असो, माझ्या घरांत, माझ्या डोळ्यांदेखत मी कुणालाहि याच्या अंगाला हात लावूं देणार नाहीं. आजचा दिवस तूं रहा; मात्र उद्यां तुला आपल्या घरीं गेलेंच पाहिजे. तुझ्या खर्चासाठीं मी नेहमीं पैसे पाठवीत जाईन

विचक्षणा क्षणभर स्तब्ध उभी राहून हळू हळू बाहेर चालती झाली. इतका वेळ राम वयनीच्या कुशींत तोंड खुपसून होता. तो आतां हळूच म्हणाला, “ नको ग वयनी ! तिला राहूं दे. आतां मी शहाणा झालों. मला सुबुद्धि आली. एकवेळ पहा तर खरं !

निरूपमेनें त्याची हनुवटी वर उचलून त्याच्या कपाळाचें ओझरतें चुंबन घेतलें, आणि अश्रुपूर्ण दृष्टीनें पण हंसतमुखानें ती म्हणाली, “ तूं जेव ना आतां ! ”

# विलासिनी

पक्के दोन कोस पायीं चालून शाळेला जात असें मी. एकटाच नव्हे कांहीं,—आणखीहि दहाबारा मुलें होतीं. जे लोक खेडोंपाडीं रहातात त्यांच्या मुलांना बहुतेक अशाच रीतीनें विद्यार्जन करावें लागतें यामुळें शेवटीं अभ्यासाची संख्या निव्वळ शून्य निघत नसली, तरी जी निघते तिचा हिशोब पडताळण्यासाठीं पुढील गोष्टींवर विचार करणें पुरेसें आहे.

ज्या मुलांना सकाळीं आठाच्या आंत न्याहारी करून दोन कोस जावें नि दोन कोस यावें लागतें, चार कोसांची वाट तुडवणें भाग पडतें,—चार कोस म्हणजे आठच मैल नव्हेत; त्याहून कितीतरी अधिक!—पावसाळ्यांत डोक्यावर पाणी नि पायाखालीं चिखल, तसेंच उन्हाळ्यांत पाण्या ऐवजीं कडक ऊन नि चिखलाऐवजीं धुळीच्या लोटांमधून तरंगत शाळेला आणि घराला जावें-यावें लागतें, त्या दुर्दैवी मुलांवर देवी सरस्वतीनें प्रसन्न होऊन त्यांना आशीर्वाद द्यावा कीं त्यांचे हाल पाहून तोंड लपवावें हें तिचें तिला देखील कळत नाहीं.

पुढें एक दिवस हीं शिकलेलीं मुलें मोठीं होऊन गांवींच बसोत

किंवा पोटाची खळगी भरण्यासाठीं कुठें जावोत, त्यांनीं चार कोस पायपीट करून मिळवलेल्या शिक्षणाचा उजेड पडल्यावांचून रहात नाहीं—पडतोच ! कुणी कुणी म्हणतात, कीं ज्यांना पोटाची चिंता आहे त्यांची गोष्ट निराळी; पण ज्यांना ती नाहीं ते सुखवस्तु लोक कोणत्या सुखासाठीं खेडीं सोडून पळतात बरें ? ते इथंच राहिले असते, तर खेड्यांची अशी दुर्दशा कां झाली असती ?

मलेरियाचा विषय काढत नाहीं ! तो असो. पण चार कोस पायीं चालाव्या लागणाऱ्या या आपत्तीच्या भयानें किती घरंदाज कुटुंबें मुलांबाळांसह खेडीं सोडून शहराकडे धांव घेतात याची मोजदाद का आहे ! नंतर एक दिवस त्यांच्या मुलांचें शिक्षण तर पुरें होतेंच; परंतु शहरांतील सुखसोईची चटक लागल्यावर त्यांचें गांवीं परत येणें घडत नाहीं.

नकोत त्या फालतू गोष्टी. मी शाळेला जाई—दोन कोसांमध्यें अशींच आणखीं दोनतीन खेडीं पार करावीं लागत. कुणाच्या बागेंतील आंबे पिकूं लागलेत, कुणाच्या रानांत करवंदें भरपूर धरलीं आहेत, कुणाच्या फणसावरील फणस पिकायला झालाय्, कुणाच्या रसबाळ केळ्यांचा लोंगर काढण्यासारखा आहे, कुणाच्या घरासमोरील झाडींत अननस उजळत चाललंय्, कुणाच्या तळीकाठील खजुरीवरचे खजूर तोडून खाल्ले असतां पकडला जाण्याची भीति कमी आहे—अशा साऱ्या बित्तम् बातम्या काढण्यांत वेळ निघून जायचा आणि जें खरें शिक्षण—कमस्तकाच्या राजधानीचें नांव काय, नि सैबेरियाच्या खाणींत चांदी मिळते कीं सोनें—या सर्व आवश्यक विषयांची माहिती करून घेण्यास सवडच व्हायची नाहीं. '

यामुळेंच परीक्षेच्या दिवशीं ‘ एडन काय आहे ’ विचारलें असतां लिही—‘ पर्शियाचें बंदर ! ’ आणि हुमायुनाच्या बापाचें नांव

विचारलें असलें तर लिहून टाकी—'तुगलघखान!'—आज चाळिशी उलटली असूनहि त्या सगळ्या विषयांची मनोधरणा बहुतेक तशीच शाबूत आहे—मग वर्ग बदलण्याच्या दिवशीं तोंड फुगवून घरीं परत येई. इतकेंच नव्हे, कधीं कट रचून मास्तरांना ठोकण्याचा बेत करी, तर कधीं ठरवी कीं, अशा निरुपयोगी शाळेलाच रामराम ठोकणें उत्तम!

आमच्या गांवांतील एक मुलगा कधींमधीं शाळेच्या वाटेवर भेटे. त्याचें नांव मृत्युंजय. आम्हां सर्वांपेक्षां तो वयानें थोर होता. तिसरींत शिकत असे. पहिल्याप्रथम कधीं तिसऱ्या इयत्तेंत तो दाखल झाला तें आमच्यापैकीं कुणालाच माहीत नव्हतें—कदाचित् पुराणवस्तु संशोधकांच्या चर्चेचा हा विषय होऊं शकेल!—आम्ही मात्र त्याला नेहमीं तिसरींतच पहात आलों. तो चौथींत गेल्याचें कधीं ऐकलें नाहीं, नि दुसरींतून तो पास झाला केव्हां ती बातमीहि मिळाली नाहीं. मृत्युंजयाला आईबाप, बहीणभाऊ कुणींच नव्हतें. होतें केवळ, गांवाच्या सीमेवर आंब्याफणसाची एक बाग, त्या बागेंतील पडकें घर आणि दूरच्या नात्याचे काका. त्या काकांना एकच काम होतें, पुतण्याची हर तऱ्हेनें नालस्ती करत फिरायचें. तो गांजा ओढतो, भांग पितो अन् आणखी काय काय करतो. याशिवाय आणखी एक कामगिरी होती त्यांना. गांवभर सांगत सुटायचें, कीं बागेचा अर्धा हिस्सा आपला आहे; जप्ती आणण्याचाच काय तो अवकाश.... मागाहून आपोआप समजेल ती हकीकत.

मृत्युंजय स्वतः सैंपाक करून जेवी. आंब्याच्या मोसमांत बाग कुणाला तरी खंडानें दिली म्हणजे त्याच्या अन्नवस्त्राचा सालीना खर्च भागे;—छे! त्याची चंगळच होई. पण जेव्हां कधीं तो भेटे तेव्हां पहावें, तर तींच जुनींपुराणीं फाटकीं पुस्तकें काखोटीला मारून

रस्त्याच्या कडेनें स्वारी गुपचुप चालली आहे. त्याला स्वतः होऊन कुणाशीं बोलतांना कधीं बघितलें नाहीं. उलट आम्हीच लोचटपणानें त्याच्याशीं सलगी करीत असूं याचें मुख्य कारण हें होतें, कीं, मेवा-मिठाई वगैरे विकत घेऊन खाऊं घालणारा त्याच्यासारखा आणखी कुणीहि उभ्या गांवांत नव्हता. आणि मुलेंच कशाला, पुष्कळशा मुलांचे पालकहि आपल्या मुलांना हळूच त्याच्याकडे पाठवीत व 'शाळेची फी चोरीला गेली', 'पुस्तक हरवलें' वगैरे सबबी सांगून त्याच्याकडून पैसे काढीत. परंतु याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचें तर राहोच, आपला मुलगा मृत्युंजयाशीं बोलतोसवरतो एवढें देखील कबूल करण्यास सभ्य समाजांत कुणी तयार नव्हता. गांवांत मृत्युं-जयाची अशीच कीर्ति पसरली होती !

बरेच दिवसांत मृत्युंजय भेटला नाहीं. एक दिवस ऐकलें, कीं तो मरायला टेकलाय. नंतर एक दिवस बातमी मिळाली, कीं मालपाड्यांतील एका म्हाताऱ्या मांत्रिकानें त्याला औषधपाणी दिलें, नि त्या मांत्रिकाची मुलगी विलासिनी हिनें त्याची सेवाशुश्रूषा करून त्याला मृत्युमुखांतून वांचवलें.

कितीदां तरी त्याच्या मिठाईवर मी ताव मारला होता. म्हणून त्याच्याबद्दल मला फार हुरहुर वाटूं लागली. मग एक दिवस संध्याकाळीं कुणाला नकळत त्याला भेटण्यास गेलों. त्याच्या पडक्या घराला भिंतींचें बंधन कुठून असणार ? मी बेधडक आंत गेलों. उजेडच उजेड देणारी एक दिवटी धडधड पेटत असून समोरच बाजेवरच्या सफेतशा बिछान्यावर मृत्युंजय निजला होता. त्याच्या किडकिडित शरीराकडे नजर जातांच मी ओळखलें, कीं त्याला गिळंकृत करण्यांत यमानें मुळींच कुचराई केलेली नाहीं. पण अखेर तो हरला. आणि हें केवळ त्या पोरीच्या प्रयत्नामुळें झालें. ती त्याच्या उशाशीं बसून

पंख्यानें वारा घालत होती. एकाएकीं मला येतांना पाहून ती दचकून उभी राहिली. त्या म्हाताऱ्या मांत्रिकाची ही मुलगी, विलासिनी. तिचें वय अठरा असावें कीं अठ्ठावीस याचा मला अंदाज करतां आला नाहीं. पण कामकाजामुळें आणि रात्रन् दिवस जागून जागून तिच्यांत कांहींच त्राण उरलेलें नाहीं, असें तिच्या चेहऱ्याकडे बघतांच मला पक्कें कळून चुकलें. फुलदाणींत पाणी घालून घालून टवटवीत राखलेलें तें फूल होतें जणुं ! किंचित् हालण्याचा, हात लागण्याचाच काय तो अवकाश कीं गळून पडलें असतें.

मृत्युंजयानें मला ओळखलें. त्यानें विचारलें, " कोण नैडा का रे ? "

मीं म्हणालों, " हो हो. "

मृत्युंजय म्हणाला, " बस ना ! "

विलासिनी मान खालीं घालून उभी राहिली. मृत्युंजयानें ज्या दोनचार गोष्टी सांगितल्या त्यांचा मतितार्थ हा होता, कीं तो अंथरुणाला खिळल्यास सरासरी दीड महिना होत आला. मध्यंतरी दहापंधरा दिवस बेशुद्धावस्थेंत होता. नुसता कोठें माणसाला ओळखूं लागला. तरी पण आतां कसली धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. इत्यादि.

धास्ती बाळगण्याचें कारण नव्हतें खरें. पण, मी अल्पवयी मुलगा असूनहि मला मात्र वाटलें, कीं अद्याप अंथरुणावरून उठण्याची ताकद ज्याला आलेली नाहीं अशा रोग्याजवळ या अरण्यांत राहून त्याला वांचवण्याचा भार एकट्या मुलीनें उचलणें म्हणजे कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे ! दिवस असो कीं रात्र—त्याची किती जतन केली तिनें, किती सेवाशुश्रूषा केली. किती धीर धरला, किती जाग्रणें सोसलीं,—मोजदाद का आहे या सगळ्याची ! किती साहसाचें काम होतें हें !

पण ज्या कारणानें ही अशक्य कोटींतील गोष्ट झाली तें कारण त्यावेळीं कळलें नाहीं तरी पण पुढें एक दिवस कळलेंच.

मी परत जाण्यास निघालों तेव्हां ती मुलगी एक दिवा घेऊन पुढें झाली व माझ्याबरोबर पडक्या भिंतीच्या टोकापर्यंत आली. अद्याप तिनें चकार शब्दहि काढला नव्हता. आतां मात्र हळूच म्हणाली, " रस्त्यावर पोंचवतें तुम्हांला. "

मोठमोठ्या आम्रवृक्षांमुळें त्या सबंध बागेंत दाट काळोख पसरला होता. वाट दिसणें तर राहोच, स्वतःचा हात देखील दिसण्याची पंचाईत. मी म्हणालों, " पोंचवायला येण्याचं कारण नाहीं; जरा दिवा दे मला. "

तिनें दिवा माझ्या हातांत दिला तेव्हां तिच्या उद्विग्न चेहऱ्यावर माझी नजर पडली. तिनें हळूच विचारलें, " भीति नाहीं ना वाटायची एकट्याला जाण्यास ? जरा दूर पोंचवण्यास येतें कीं ! "

एक स्त्री विचारत होती—भीति नाहीं ना वाटायची ? वाटो कांहींही. ' छे ' असेंच उत्तर देऊन मी पाय उचलला.

ती पुन्हा म्हणाली, " रानावनांतील वाट आहे. पायाखालीं पहात जा जरा. "

माझ्या अंगावर कांटा उभा राहिला ! पण ती मुलगी अशी उद्विग्न कां दिसली, आणि मला त्या रानापलीकडे दुरूनच दिवा दाखवून कां घालवूं पहात होती तें कळेना. बऱ्याच वेळानंतर तें माझ्या लक्षांत आलें. माझें न ऐकतां माझ्या सोबत ती आली देखील असती. परंतु आजारी मृत्युंजयाला एकटा टाकून येण्यास बहुतेक तिचें मन तयार झालें नसावें.

वीसपंचवीस बिघ्यांची बाग. काय कमी लांब वाट झाली ! त्या भयाण घनांधःकारांत मी प्रत्येक पाऊल भीत भीत टाकत होतों. पण लगेच त्या मुलीचें बोलणें माझ्या मनाला असें व्यापून टाकी, कीं भिण्याला अवसरच मिळत नसे. कुणा मरणासन्न रोग्याबरोबर तिथें रहाणें म्हणजे

किती कठीण गोष्ट, असेंच राहून मला वाटे. कोणत्याही घटकेला मृत्युंजयचें मरण ओढवूं शकतें. मग सारी रात्र त्या अरण्यांत एकट्या पोरीनें काय करावें ? कशी ढकलावी ती रात्र तिनें ?

अशा संबंधींची फार दिवसामागें घडलेली एक गोष्ट मला आठवते. एका नातलगाच्या मृत्युसमयीं मी हजर होतों. काळोखी रात्र. घरांत मुलेंमाणसें नोकरचाकर कुणी नव्हते. फक्त त्या नातलगाची आतां विधवा झालेली बायको नि मी. मयताच्या त्या बायकोनें शोकाच्या भरांत ऊर–कपाळ बडवून असा हाहाःकार केला म्हणतां ती देखील प्राणास मुकते कीं काय अशी मला भीति पडली. ती रडून रडून पुनः पुनः मला म्हणाली—“ मी स्वेच्छेनं सति जात असेन, तर त्यांत सरकारची आडकाठी कां ? जिवंत रहाण्याची मला आतां तिळमात्रही इच्छा नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांना इतकं देखील समजूं नये ? त्यांच्या घरांत काय बायका नाहींत ? आणि मी म्हणतें गांवांतील चारचौघांनीं मिळून रात्रीच्या रात्रीं माझ्या सति जाण्याची तयारी केली, तर तें पोलीसचौकीवरील अधिकाऱ्यांना कळेलच कसं ? ” अशाच न जाणों किती बाता झोकल्या तिनें पण नुसतें बसून राहून आणि तिची रडारड ऐकून काम भागण्यासारखें नव्हतें. बाहेर जाऊन चारचौघांना खबर दिलीच पाहिजे होती. सामानाची जुळवाजुळव करावयाची होती. म्हणून मी बाहेर जाण्याची गोष्ट काढली. त्याबरोबर ती ताळ्यावर आली. डोळे पुसून ती मला म्हणाली, “ बाबा, होणारं झालं. आतां बाहेर जाऊन काय करणार ? रात्र संपूं दे. ”

मी उत्तर दिलें, “ किती कामं आहेत ! गेल्यावांचून चालणार नाहीं.”

ती म्हणाली, “ कामं मरोत ! बस तूं. ”

मी पुन्हा उत्तर दिलें, “ बसून चालणार नाहीं. एकदां खबर ही दिलीच पाहिजे. ”

इतकें बोलून मी उठलों. तत्क्षणींच तिनें एकदम आरोळी ठोकली, "अरे बापरे! मी नाहीं राहूं शकणार येथें एकटी!"

मग बसणें भागच होतें. नंतर माझ्या लक्षांत आलें, कीं जो नवरा जिवंत असतांना तिनें एकटीनें निर्भयपणें पंचवीस वर्षेंपर्यंत प्रपंच चालवला त्याचें मरण ती कसेंबसें साहूं शकते; पण त्याच्या प्रेताजवळ पांच मिनिटें देखील राहूं शकत नाहीं. तिच्या काळजाचें कशामुळें पाणी पाणी होत असेल, तर तें आपल्या मृत पतीजवळ बसावें लागतें म्हणून!

तिचें दुःख कस्पटासमान लेखण्याचा माझा मानस नाहीं. तो खरा हेतु नव्हे. किंबहुना माझ्या म्हणण्याचा अर्थ तसा नाहींच. आणि एकाद्या माणसाच्या वागणुकीवरून अशा गोष्टी संबंधींचा सिद्धांत ठरवतां येणार नाहीं. अशीच आणखी एक घटना मला माहीत आहे तिचें वर्णन न करतां मला इतकेंच सांगायचें आहे कीं केवळ कर्तव्यप्रेरणेमुळें किंवा फार दिवस एकत्र राहिल्यामुळें देखील कोणतीहि स्त्री अशा भीतीपासून मुक्त होऊं शकत नाहीं. दीर्घकाळपर्यंत एकत्र नांदूनहि पुष्कळशा स्त्रीपुरुषांना जिची जाणीव होत नाहीं अशी एक निराळीच शक्ति आहे!

जवळ जवळ दोन महिने मृत्युंजयाची मी मुळींच विचारपूस केली नाहीं. ज्यांनीं खेडेगांव पाहिलेलें नाहीं—किंवा पाहिलें असलेंच तर फक्त आगगाडीच्या डब्यांतून डोकावून—ते आश्चर्यपूर्वक विचारतील कीं, म्हणतोस काय? स्वतःच्या डोळ्यांनीं ज्याची इतकी दुर्दशा झालेली पाहून आलास त्याची दोन महिन्यांत कांहींच विचारपूस केली नाहींस? असें होणें शक्य तरी आहे? या लोकांच्या माहितीसाठीं मला हें सांगितलेंच पाहिजे, कीं असें होणें शक्य आहे इतकेंच नव्हे, तर असेंच घडतें. गांवांत कुणावर बिकट प्रसंग गुदरला म्हणजे

आळीभरचे लोक त्याच्यावर उलटतात अशी किंवदंतीच आहे मुळीं. सत्ययुगांतील खेडगांवांतून अशीच स्थिति होती कीं काय नकळे. पण ....असो ! ज्या अर्थी तो वारल्याचें अद्याप कळलें नाहीं त्या अर्थी तो जिवंत असलाच पाहिजे असें मी ठरवलें.

याच सुमारास एक बातमी कानावर आली. मत्युंजयाच्या त्या बागेचे हिस्सेदार काका गांवभर शंखध्वनि करित फिरत होते,— "गेला ! गेला हो गांव पार रसातळाला गेला ! आतां लोकांत 'नालत्यांचे मित्तर' म्हणून घेण्यालायक माझं नांव राहिलं नाहीं. हरामखोरानं मांत्रिकाच्या पोरीला पळवून आणून तिच्याशीं लग्न लावलं. नुसतं लग्न लावलं इतकंच नव्हे, तर तिच्या हातचें अन्न खातोय् ! कोडोला नि हरिपुरचे लोक ही गोष्ट ऐकतील तर—" इत्यादि. बस ! मग काय विचारतां ! पोराटोराच्या तोंडीं एकच गोष्ट—अं ! काय झालं हें ! खरोखरच कली अवतरला कीं काय !

ते काका मोरे सांगत फिरत होते,—"असं होणार हें तर मला अगोदरपासूनच ठाऊक होतं. जरा रंगढंग बघूं या म्हटलं. मला तो कुणी परका शेजारीपाजारी नव्हे कांहीं. सख्खा पुतण्या माझा तो त्याला घरांत ठेवून घेतला नसता का मी ? वैद्य डॉक्टराकडून त्याला औषधपाणी देण्याची माझी ऐपत नव्हती ? पण हें सगळं कां केलं नाहीं तें आतां लोकानींच पाहून घ्यावं. यापुढं मात्र मी गप्प राहूं शकत नाहीं. मित्तिर घराण्याचं नांवच बुडतंय् कीं ! अन् गांवच्या नांवावरहि काळीमा फांसला जातोय् !"

मग गांवांतील आम्हीं सर्वजणांनीं मिळून जें कृत्य केलें त्याची नुसती आठवण होतांच आज देखील लज्जातिशयानें मला मेल्यापरी वाटतें ! ते काका नालत्याच्या मित्तिर घराण्याचे रक्षक बनून बाहेर पडले. आणि आम्ही दहाबाराजण त्यांच्याबरोबर निघालों. कशाला, तर गांवच्या नांवावर काळीमा फांसला जाऊं नये म्हणून.

मृत्युंजयाच्या पडक्या खोपटांत आम्हीं पोंचलों तेव्हां सांज होऊन गेली होती. पडवींत एका बाजूला बसून विलासिनी सैंपाक करत होती. अकस्मात इतके लोक लाठ्याकाठ्यानिशी आपल्या घराकडे येत असलेले पाहून ती भयानें कावरीबावरी झाली !

काकांनीं घरांत डोकावून बघितलें,—मृत्युंजय अंथरुणावर पडला होता. त्यांनीं चपळाई करून दाराला कडी लावली. आणि मग भयानें अर्धमेली झालेल्या त्या मुलीशीं बोलणें सुरू केलें. पृथ्वीच्या पाठीवर आजपर्यंत कोणत्याहि काकोबानें पुतण्याच्या बायकोशीं तशा तऱ्हेचें संभाषण केलें नसेल. त्यांचें बोलणें होतेंच अशा कोटींतलें, कीं ती मुलगी हीन जातीच्या मांत्रिकाची असूनहि तें सहन करूं शकली नाहीं. डोळे वटारून ती म्हणाली, " माझ्या बाबांनीं त्यांच्याशीं माझं लग्न करून दिलंय् माहित आहे ? "

काका उत्तरले, " अस्सं काय ! थांब " इत्यादि. आणि तत्क्षणींच दहाबाराजण वीर्योत्साहानें तिच्या मानगुटीवर तुटून पडले. कुणी तिच्या झिपऱ्या पकडल्या, कुणी कान पकडले, आणि कांहींजणांनीं तिचे हात धरले. ज्यांना हा सुयोग लाभला नाहीं ते देखील अगदींच स्वस्थ बसले असें समजूं नका.

कारण, 'रणक्षेत्रां'त आम्ही भित्र्यासारखे स्वस्थ उभे रहाणार कसे ?....इथें एक अप्रासंगिक गोष्ट सांगणें भागच आहे. असें ऐकतों, कीं विलायत वगैरे म्लेंच्छ देशांत पुरुषांच्या मनावर एक कुसंस्कार झालेला आहे—स्त्रिया अबला नि असहाय असल्यामुळें त्यांच्यावर हात टाकूं नये म्हणे. काय विचित्र बोलणें झालें हें ! सनातनी हिंदु असल्या कुसंस्कारांना माहीत नाहींत. आमचें म्हणणें तर असें, कीं ज्याच्या अंगांत त्राण नाहीं त्याच्यावरच हात टाकावा. मग ती व्यक्ति स्त्री-पुरुष कुणीहि कां असेना.

विलासिनी एकदां काय किंचाळली असेल तेवढीच. मग मेल्यासारखी अगदीं गप्प झाली. पण तिला गांवाबाहेर हांकून लावण्यासाठीं आम्ही फरफटत घेऊन निघालों तेव्हां ती विव्हळून म्हणाली, "बाबूसाहेब ! जरा सोडा ना मला ! भाकऱ्या घरांत ठेऊन येतें. बाहेर कोल्हेकुत्रे खाऊन टाकतील हो. ते अशक्त झाले आहेत, रात्रभर त्यांना उपाशीं रहावं लागेल."

बंद असलेल्या खोलींत मृत्युंजय पिसाळल्याप्रमाणें डोकें आपटूं लागला, दरवाजावर लाथाबुक्क्या मारूं लागला. श्राव्य-अश्राव्य असे सर्व प्रकारचे शब्दप्रयोगहि त्यानें केले. पण त्यामुळें आमच्या मनाला मुळींच पाझर फुटला नाहीं. सर्वजण स्वसमाजाच्या हितासाठीं तिला निर्दयपणें फरफटत घेऊन निघालों.

'घेऊन निघालों' असें एवढ्याचसाठीं म्हणतों कीं त्या कंपूंत मी पण होतों. मात्र त्यावेळीं माझ्यांत नेभळेपणा कुठून शिरला नकळे, मी कांहीं त्या मुलीवर हात टाकूं शकलों नाहीं. मनांतून उलट कष्टी झालों. तिनें भारी अपराध केला असून तिला गांवाबाहेर घालवणें उचित होतें खरें; तरीसुद्धां आपण हें सत्कृत्य करीत आहों असें कांहीं त्यावेळीं माझ्या मनाला वाटलें नाहीं. पण ही झाली माझ्या स्वतःविषयींची गोष्ट.

गांवांत नांवाला देखील उदारता नाहीं असें समजूं नका. छे, असें मुळींच नव्हे. उलट, आम्ही वडे लोक असल्यामुळें इतकें औदार्य दाखवत असूं, कीं तें ऐकून आपण थक्कच व्हाल !

हाच मृत्युंजय विलासिनीच्या हातचें अन्न खाण्याचें अक्षम्य पाप न करता, तर आम्हाला त्याचा इतका राग नसता आला. आणि तशांत या कायस्थाच्या मुलानें त्या मांत्रिकाच्या मुलीशीं लग्न केलें. मोठी हास्यास्पदच गोष्ट ! पण तिच्या हातचें अन्न उष्टावुनच त्यानें

आपलें मरण ओढवून घेतलें. अडीच महिने अंथरुणावर खिळला असला म्हणून काय तिच्या हातचा भात खावा त्यानें?—पुऱ्या नाहींत, सागोती नाहीं—भात खाल्ला त्यानें. भात खाणें म्हणजे अन्नपाप! त्या बाबतींत तिळमात्रहि हयगय करतां येत नाहीं. असें ठरलें. यावरून शाबीत होतें, कीं गांवांतील लोक अगदींच हलक्या मनाचे नव्हते. चार कोस पायपीट करून मिळवलेली विद्या ज्यांच्या डोक्यांत भरलेली असते तेच मोठेपणीं समाजांतील शिरोमणी होतात ना? मग देवी सरस्वतीच्या कृपेनें त्यांच्यामध्यें क्षुद्रता शिरणार तरी कशी?

आतां हेंच पहा ना—प्रातःस्मरणीय मुखोपाध्याय महाशयांची विधवा सून विरक्त होऊन काशीवासास गेली होती, ती दोन वर्षांनीं गांवीं परत आली. लगेच निंदकांत कानगोष्टी सुरू झाल्या. अर्धी इस्टेट त्या विधवेची होती. ती हातची जाऊं नये म्हणून तिचा धाकटा दीर तिला मुद्दाम घेऊन आला.......मग आपल्या उदार स्वभावानुसार त्यानें गांवच्या देवाला पूजेसाठीं म्हणून दोनशें रुपये दान दिले. आणि पांच गांवच्या ब्राह्मणांना सदक्षणा भोजन घालून प्रत्येक ब्राह्मणाला कास्याचें पात्र देऊन त्यांचा निरोप घेतला. तेव्हां सर्वत्र धन्योद्गार निघाले. इतकेंच नव्हे; तर घरीं येत असतां पुष्कळांनीं देशहिताची इच्छा प्रदर्शित करून म्हटलें, कीं सर्व थोरामोठ्यांच्या घरीं महिनेच्या महिने अशीं पुण्यप्रद अनुष्ठानें कां होत नाहींत बरें!

पण जाऊं दे हें सगळें. असल्या महत्त्वपूर्ण घटना थोड्या थोडक्या नाहींत. अनेक युगांपासून संचित झालेल्या अशा घटनांचे मनोरे प्रत्येक ग्रामवासियाच्या दारापुढें उभे आहेत. याच दक्षिण बंगालच्या बऱ्याचशा गांवांत हिंडून फिरून गर्व वाहण्याजोग्या कितीतरी गोष्टी प्रत्यक्ष मीच पाहिल्या आहेत. आचारविचारांत काय आणि सामाजिक नि

शैक्षणिक बाबतींत काय, कसली उणीव म्हणून राहिलेली नाहीं. आतां फक्त इंग्रजांवर शेलक्या शिव्यांची लाखोली वाहून देशोद्धार करायचाच काय तो बाकी आहे !

सरासरी एक वर्ष होत आलें. मग कष्टक्लेश अधिक सोसवेनात तेव्हां भटकेगिरीला रजा देऊन घरीं परत आलों. एक दिवस दुपारच्या प्रहरीं गांवापासून दोन कोसांवर असलेल्या मालपाडा खेड्यांतून चाललों असतां, अकस्मातच एका झोपडीच्या दारांत मृत्युंजय बसलेला दिसला. त्याच्या डोक्यावर गेरुआ रंगाची पगडी होती, जटा नि दाढीमिशाही होत्या, आणि गळ्यांत रुद्राक्षाच्या माळा पण !—हा मृत्युंजयच आहे असें कोण म्हणूं शकला असता ? कायस्थाचा पोर स्वजात सोडून वर्षाच्या आंत पक्का मांत्रिक बनला कीं ! मनुष्य किती झट्दिशीं आपल्या चौदा पिढ्यांना तिलांजलि देऊन विजातीय होतो हें पाहिलें म्हणजे फार नवल वाटूं लागतें ! ब्राह्मणाचा मुलगा भंगीणीशीं लग्न करून भंगी झाल्याचें बहुतेकांच्या ऐकण्यांत आलें असेल. उच्च ब्राह्मण जातींतील एक मुलगा मॅट्रिक पास होऊनहि डोमाच्या पोरीशीं लग्न करून डोम बनलेला मी बघितला आहे. सुपें चटया वगैरे करून तो विकायचा आणि डुकरांना पण चरवायचा. एका घरंदाज कायस्थ कुटुंबांतील मुलगा कसायाच्या पोरीशीं संबंध जोडून कसाई झालेलाहि माझ्या पाहण्यांत आला. आतां स्वतःच्या हातांनीं गाई कापून त्यांचें मांस तो विकतो. त्याला पाहून कोण म्हणूं शकेल, कीं कधींकाळीं हा कसायाहून अगदीं निराळाच होता ? पण या सगळ्याचें मूळ कारण एकच—स्त्रिया ! म्हणूनच मला वाटतें कीं ज्या स्त्रिया अशा रीतीनें पुरुषांना इतक्या झटकन् खालच्या पायरीवर ओढूं शकतात, त्याच खेळीमेळीनें त्यांना उन्नत करूं शकणार नाहींत काय ? ज्या गांवकऱ्यांची कीर्तिपताका फडकवण्यास मी आज सज्ज झालों आहें

त्यांच्या गौरवाचा सर्व वांटा फक्त त्यांनाच मिळणार काय? स्वत:च्याच हिंमतीवर हे पुरुष इतक्या लवकर खालीं उतरतात का? त्यांना आंतून तिळमात्र प्रोत्साहन किंवा काडीचीहि मदत मिळत नाहीं?

आपल्याच नादांत कदाचित् अनाधिकार चर्चा करून मी मोकळा व्हायचा. पण, आमच्या स्त्री-पुरुषांपैकीं शेंकडा नव्याण्णव खेडेगांवीं राहूनच 'मनुष्य' बनतात ही गोष्ट विसरणें मला फार जड जातें. अस्तु. तर काय सांगत होतों,—त्याला पाहून हा मृत्युंजयच आहे असें कोण म्हणूं शकला असता? त्यानें आपुलकीनें माझें आगत-स्वागत केलें. विलासिनी तळीवर पाण्याला गेली होती. ती देखील आली तेव्हां मला पाहून ती फार आनंदित झाली. ती पुन: पुनः मला म्हणते कशी—"त्या दिवशीं तूं वाचवलं नसतंस, तर त्यांनीं मला जिवानिशीं मारलंच असतं. माझ्यासाठीं तूं पण न जाणें किती मार खाल्ला असशील!"

आज साप पकडण्यासाठीं तीं कुठेंतरी जाणार होतीं. 'सचकार' तर अगोदरच घेतला होता त्यांनीं. तीं दोघें जाण्यास निघालीं तेव्हां मी पण त्यांच्याबरोबर जाण्यास उतावळा झालों. लहानपणापासून मला दोन गोष्टींचा विलक्षण नाद होता. पहिली गोष्ट म्हणजे गोखुरा जातीचा काळा सर्प पकडून पाळणें; नि दुसरी मंत्रसिद्धी प्राप्त करणें. मंत्रसिद्धीचा मार्ग मला अजूनपर्यंत शोधूनहि सांपडला नव्हता. म्हणून मृत्युंजयासारखा गुरु लाभणार या आशेनें मी हुरळून गेलों. आपल्या नांवाजलेल्या सासऱ्याचा तो शिष्य होता; अर्थात् मोठाच माणूस नाहीं का? माझें नशीब असें अचानक उदयाला येईल हें कुणाच्या ध्यानींमनीं तरी होतें!

पण काम फार कठीण. जोखीमहि कमी नाहीं. म्हणून अगोदर त्यानें हरकत घेतली. परंतु मी हट्टच धरल्यावर महिन्याच्या आंत मला

शिष्य करण्यावांचून त्याला गत्यंतर उरलें नाहीं. मृत्युंजयानें सर्प पकडण्याचा मंत्र व रीत मला शिकवली, आणि माझ्या दंडावर औषधी-युक्त ताईत बांधून मला खराखुरा मांत्रिक बनवून टाकलें !

मंत्र काय होता माहीत आहे ? त्याचा शेवटचा भाग मला आठवतो:

अरे अरे सापा !
तूं मनसा देवीचें वाहन
मनसा देवी माझी माय
उलट पालट पाताळ फोड
धुंडिराजाचें विष तूं घे
तुझें विष धुंडिराजाला दे
दूधराज ! मणिराज !
कुणाच्या आज्ञेनें ?
मांत्रिकाच्या !

याचा अर्थ मला माहीत नाहीं. कारण, या मंत्राचे जे स्रष्टा होते, कुणी ना कुणी अवश्य असणार !—त्यांचें कधीं दर्शन घडलें नाहीं.

अखेर एक दिवस या मंत्राच्या खरेखोटेपणाची चांगलीच परीक्षा झाली ! पण तोंपर्यंत मी साप पकडण्यांत सुप्रसिद्ध होऊन चुकलों होतों. सगळेजण म्हणत,—'नैडा आहे खरा गुणी माणूस. भटकेगिरी करून कां होईना देवीच्या कृपेनें मांत्रिक तर झाला !" इतक्या लहान वयांत पटाईत मांत्रिक बनल्यामुळें मी किती शेफारून गेलों तें विचारूंच नका !

फक्त त्या दोघांनींच माझ्या मंत्रसिद्धीवर विश्वास ठेवला नाहीं. माझा गुरु बरेंवाईट कांहींच म्हणत नसे. पण विलासिनी कधींमधीं खुदकन् हंसून म्हणायची,—"बाबा, ते किनई भयंकर प्राणी आहेत हो. जरा जपून त्यांना हालवडुलव बरं." खरोखर विषारी

दांत पाडलेले असतात. अशा सापांच्या तोंडांतून विष काढण्याचें काम मी इतक्या बेपर्वाईनें करीं, कीं त्याचीं नुसती आठवण होतांच आज देखील माझा थरकांप होतो!

खरं म्हणजे साप पकडणें कांहीं कठीण काम नव्हे. आणि पकडलेल्या सापाला दोनचार दिवस मडक्यांत झांकून ठेवलें कीं मग त्याचे दांत पाडा किंवा पाडूं नका, तो चावायचाच नाहीं. फडा उभारून चावायला आल्यासारखा करील; पण चावणार नाहीं.

कधीं कधीं विलासिनी आम्हां गुरुशिष्यांबरोबर वादविवाद करी. मांत्रिकाला सगळ्यांत जास्त फायदेशीर धंदा म्हटला म्हणजे विषाच्या उताऱ्यावरील मुळ्या विकणें हा होय. त्या मुळ्या पहातांच साप पळून जातो म्हणें! मात्र, तत्पूर्वी एक लहानशी गोष्ट करणें अगत्याचें असतें. ज्या सापाला मुळी दाखवून पळवून लावायचें असेल त्याचें तोंड लोखंडाच्या सळीनें खूपदां डागून त्याला सोडून द्यावें. मग त्याला मुळी दाखवा नाहींतर आणखी कांहीं दाखवा; तो जीव घेऊन पळाल्याशिवाय रहाणार नाहीं. या गोष्टीला विलासिनीची फार हरकत होती. ती मृत्युंजयाला म्हणत असे, "हें पहा, माणसाला अशा रीतीनं फसवणं बरं नाहीं."

मृत्युंजय उत्तर देई, "सगळेचजण तर असं करतात. यांत दोष कसला?"

विलासिनी म्हणे, "करूं दे सगळ्यांना. आम्हाला तर खाण्यापिण्याची चिंता नाहीं. मग उगाच आम्ही लोकांना का लुटावं?"

आणखी एक गोष्ट बऱ्याचदां माझ्या पहाण्यांत आली. साप पकडण्याबद्दलचें बोलावणें आलें, कीं विलासिनी हरतऱ्हेनें त्यांत मोडा घालायची. 'आज शनिवार आहे,' तर 'आज मंगळवार' असें वाटेल तें कारण ती दाखवी. मृत्युंजय घरीं नसला म्हणजे तर ती

लोकांना खुशाल वाटेला लावी. पण मृत्युंजय स्वत: हजर असला, कीं त्याला पैशांचा मोह आवरतां येत नसे. आणि मला तर एक प्रकारें वेडच जडलें होतें या गोष्टीचें. त्याला सर्वतोपरी प्रोत्साहन देण्यास मी मुळींच मागेंपुढें पहात नसे. आणि खरोखरच या कामांत गंमतीखेरीज भय इत्यादि कांहीं आहे असें कधीं आमच्या मनाला शिवलेंहि नाहीं. पण या पापाचें प्रायश्चित्त त्या दिवशीं मला खासें भोगावें लागलें. !

त्या दिवशीं गांवापासून दोन कोसांवर असलेल्या एका गवळ्याच्या घरीं साप पकडण्यास आम्ही गेलों होतों. विलासिनी नेहमींच बरोबर असे, तशी आजहि होती. कुडाच्या भिंतींत शोधतां एके ठिकाणीं बीळ आढळलें. आमच्या कुणाच्याच लक्षांत आलें नाहीं तें. पण विलासिनी पडली मांत्रिकाच्या पोटची पोर ! तिनें हळूच वांकून कागदाचे कपटे उचलत मला म्हटलें, " बाबा, जरा संभाळून खण हं ! साप एकच नाहीं बरं. जोडी तर आहेच; कदाचित् आणखीहि असतील."

त्यावर मृत्युंजय म्हणाला, " हे लोक सांगतात, कीं एकच साप आहे. एकच दिसला त्यांना . "

कागदाच्या कपट्यांकडे बोट करून विलासिनी म्हणाली, " दिसत नाहीं का इथं वस्ती केलीय् त्यांनीं ? "

मृत्युंजयानें उत्तर दिलें, " कागद तर उंदीरहि आणूं शकतात. "

पण विलासिनीचेंच म्हणणें शेवटीं खरें ठरलें—अगदीं मर्मान्तिक सत्य बरें ! दहा एक मिनिटांतच एक भला मोठा विषारी जातीचा काळा साप पकडून मृत्युंजयानें माझ्या हातांत दिला. तो पेटाऱ्यांत बंद करून मी येतों न येतों मृत्युंजय ' उः ' करून कण्हत सुस्कारत बाहेर येऊन उभा राहिला. त्याच्या तळहातांतून झर झर रक्त वहात होतें!

अगोदर सर्वजण कुंठीतच झालों. कारण, सापाला पकडत असतां साप पळून जाण्याचा प्रयत्न न करतां बिळावाटे तोंड काढून चावला. कल्पनेबाहेरची ही गोष्ट जन्मांत प्रथम आजच बघितली. दुसऱ्याच क्षणीं विलासिनी आरडतओरडत तिथें आली. तिनें आपल्या साडीचा पदर फाडून त्याचा हात घट्ट बांधला. आणि जितक्या मुळ्या तिनें बरोबर आणल्या होत्या त्या सर्वच्या सर्व त्याला चावण्यास सांगितल्या. मृत्युंजयाचा स्वतःचा ताईत तर होताच; शिवाय, माझाहि ताईत सोडून मी त्याला बांधला. आशा वाटत होती, कीं विष चढणार नाहीं. विषाच्या उताऱ्यावरील मंत्र मी जोराजोरानें म्हणूं लागलों. सभोंवती चिक्कार गर्दी जमली. या कामीं उपयोगीं पडण्यासारखे जे कोणी होते त्यांना बोलावण्याखाठीं चारीकडे माणसें रवाना केलीं. विलासिनीच्या बापालाहि खबर देण्यांत आली.

मी अखंड गतीनें, न विसावल्यावांचून मंत्र म्हणत होतों. पण कांहीं उपयोग झाल्यासारखें दिसेना. तरी देखील मंत्रोच्चार सारखा सुरू होता. पण पंधरावीस मिनीटांनीं मृत्युंजयाला वांती होऊन तो नाकांतून बोलूं लागला तेव्हां विलासीनी धाडकन् जमिनीवर पडली. मग मी सुद्धां समजून चुकलों, कीं विषाच्या उताऱ्यावरील मंत्र आतां कामीं येणार नाहीं.

जवळपासचे दोन तीन मंत्रिक आले. आम्हीं कधीं सगळे मिळून तर कधीं एकएकटे तेहतीस कोटी देवांचा धांवा करूं लागलों. पण विषानें कशाला दाद दिली नाहीं. रोग्याची अवस्था अधिकच नाजूक झाली. सरळ रीतीनें काम होत नाहीं असें पाहून तीन चार मांत्रिकांनी विषाला अशा शिव्या दिल्या कीं, विषाला जर कान असते तर तें मृत्युंजयालाच कां सगळा गांव सोडून पळालें असतें. पण कशाचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. आणि अर्ध्या पाऊण तासाच्या धडपडी-नंतर रोग्यानें त्याच्या आईबापांनीं त्याला ठेवलेलें मृत्युंजय नांव नि

सासऱ्यानें शिकवलेले मंत्र इत्यादि खोटे ठरवून इहलोकची यात्रा संपविली ! नवऱ्याचें डोकें मांडीवर घेऊन बिचारी विलासिनी पाषाणा-सारखी बसून राहिली.

आतां तिच्या शोकाचें रामायण सांगत बसत नाहीं. फक्त एकच गोष्ट सांगून आटोपतें घेतों. एक आठवड्याहून अधिक दिवस जिवंत रहाणें तिला असह्य वाटलें. एक दिवस ती मला म्हणाली, "बाबा, माझ्या गळ्याची शपथ घालतें तुला, कधींही हें काम तूं करूं नकोस ! "

मी माझ्या ताईत वगैरेला मृत्युंजयाबरोबरच मूठमाती देऊन मोकळा झालों होतों. 'मांत्रिकाची आज्ञा' काय ती मजजवळ होती. पण ती 'आज्ञा' कांहीं मॅजिस्ट्रेटची आज्ञा नव्हती. आणि सर्पाचें विष म्हणजे 'काळ्या आदमी'चें विष नव्हे हें पण मी उमजून चुकलों होतों !

एक दिवस समजलें कीं,—विलासिनीच्या घरांत विषारी मुळ्यांना तोटा नव्हता—तिनें आत्महत्या करून घेतली ! आतां शास्त्रानुसार ती नक्की नरकांतच गेली असावी. ती कुठेंहि जावो, माझ्या जाण्याची वेळ येईल तेव्हां मी पण तशाच प्रकारच्या नरकांत जाण्यास मुळींच कचरणार नाहीं, एवढेंच सांगून ठेवतों.

ते काकोबा बागेवर सोळा आणे हक्क शाबीत करून अतिशय हुशार माणसाप्रमाणें गांवभर डांगोरा पिटत सुटले—"त्याला अप-घातानं मरण येणार नाहीं तर कुणाला येणार ? पुरुषानें एक सोडून दहा बायका कराव्या ! त्यानं कांहीं मोठंसं होतजात नाहीं पण तिच्या हातचं अन्न खाऊन आपलं मरण कशाला ओढवून घ्यावं बरं ? स्वतः तर दुर्गतीला गेलाच, वरती माझ्या तोंडालाहि काळं फासून गेला. ना कोणी आग देणारा राहिला, ना पिंडपाणी देणारा. श्राद्धादि क्रियाकर्म राहून गेलं कीं नाहीं ! "

गांवांतील सगळे लोक एकमुखानें म्हणाले, “यांत काय संशय? अन्नदोष! त्यासाठीं कुठं प्रायश्चित्त आहे?”

विलासिनीची आत्महत्या अनेकांच्या थट्टेचा विषय बनला. मला मात्र राहून राहून वाटतं, कीं चूक त्या दोघांचीहि झाली. पण मृत्युंजय तर खेडवळच; तो खेड्यांतील वातावरणांत वाढलेला होता. असें असूनहि हें दुःसाहस अंगिकारण्यास जिनें त्याला प्रवृत्त केलें तिच्याकडे कुणी ढुंकूनहि बघितलें नाहीं!

ज्या देशांत प्रीतिविवाहाची पद्धत नाहीं—उलट, तें निंद्य समजलें जातें, त्या देशांतील स्त्री-पुरुष आशा-आकांक्षांपासून मिळणाऱ्या उच्च आनंदाला चिरकाल पारखेच होणार. विजयाचें सुख किंवा पराजयाचें दुःख, चुक केल्याबद्दलची हळहळ किंवा न चुकल्याबद्दलचा हर्ष यापैकीं कशाचीहि लहानशी झुळूक देखील आपल्या आयुष्यांत त्यांना अनुभवतां येत नाहीं. त्यांना जन्मभर कोरे मनुष्य बनून कसें रहातां येईल याची व्यवस्था सनातन धर्मानें करून ठेवली आहे. हे लोक विवाहविधीला एक ‘कॉन्ट्रॅक्ट’ समजतात; आणि वैदिक मंत्रांनीं त्याला ‘डॉक्युमेन्ट’चें स्वरूप देतात. म्हणूनच मी समजतों, कीं मृत्युंजयाच्या अन्नदोषाचें कारण समजण्याइतकी या लोकांची लायकी नाहीं. विलासिनीची ज्यांनी थट्टा केली ते सर्व स्त्री-पुरुष ‘सभ्य’ असून त्यांना ‘स्वर्गवास’ लाभणार हें मला माहीत आहे. पण ती मांत्रिकाची मुलगी अंथरुणाला खिळलेल्या एका दुखणेकऱ्यास वांचवण्यासाठीं तिळ तिळ खपत असतां तिला जो आनंद मिळाला त्यांतील एक कण देखील या शिष्टांपैकीं कुणी कधींहि पाहिला नसेल. मृत्युंजय कदाचित् एक क्षुल्लक इसम असेल. परंतु विलासिनीला प्रीतिवश केल्यावर त्याला झालेला आनंद तर क्षुल्लक नव्हे. त्याची ती कमाई नगण्य नव्हे.

पण हें सर्व आमच्या लोकांच्या लक्षांत येणें म्हणजे किती कठीण गोष्ट आहे! भूदेव मुकर्जींनी लिहिलेल्या 'कौटुंबिक निबंधांना मी मुळींच दोष देणार नाहीं. मी निंदा केली, तर शास्त्रांत सांगितलेल्या नियमांचीहि निंदा करणार नाहीं. मी निंदा केली, तर लोक उत्तर देतील, "हा हिंदु समाज आपल्या नीतिनियमांमुळेंच इतकीं शतकें अनेक विद्रोही चळवळींना तोंड देऊन जिवंत राहिला आहे." या लोकांचा मी अनादर करणार नाहीं. मी असें विचारणार नाहीं, कीं जिवंत रहाण्यांतच परम सार्थकता आहे का?....मी इतकेंच सांगेन,— एकाद्याला इनामदाराच्या 'बाळू' प्रमाणें रात्रन्‌दिवस कडेखांद्यावर घेऊन राहिलें; तर त्याच्या जिवाला अपाय होणार नाहीं हें खरें; पण अशा रीतीनें त्याला सुखरूप राखण्यापेक्षां कडेवरूनच उतरून इतरांप्रमाणें पांच पावलें चालायला लावलें, तर पुढें वांकडें पाऊल पडल्यामुळें करावा लागणारा पश्चाताप खास टळेल!

---

# बाल्य-स्मृति

बारशाच्या दिवसापर्यंत एकतर मीच चांगला गुटगुटीत झालों नसेन, किंवा आजोबांचा ज्योतिषशास्त्रावर फारसा विश्वास नसावा;—कोणत्याहि कारणानें असो, माझें नांव सुकुमार ठेवण्यांत आल. पण अधिक दिवस लागले नाहींत—तीनचार वर्षांतच आजोबा समजून चुकले कीं नांवासारखें माझ्यांत कांहींच नाहीं! आतां त्यानंतर बारातेरा वर्षांनीं घडलेली गोष्ट सांगतों. अर्थात् माझ्या आयुष्यांतील सर्वच गोष्टी कुणाला नीट समजणार नाहींत, तरी पण—

ऐका बरं का! आम्हीं खेडेगांवचे रहाणारे. माझें बालपण तिथेंच गेलें. वडील कुठेंतरी दूर नोकरी करीत होते. मी त्यांच्याकडे बहुधा जात नसें. गांवींच आजीजवळ रहायचा. 'घरांत माझ्या द्वाडपणाला सीमा नव्हती. मी एक छोटासा रावणच होतों म्हणाना! म्हातारे आजोबा जेव्हां म्हणत,—"तूं असा कसा निपजलास! कुणाचं ऐकत नाहींस. थांब तुझ्या बापाला पत्र लिहितों." तेव्हां मी हंसून म्हणायचा, "आजोबा! ते दिवस विसरा. बापाचं राहूंच द्या; बापाच्या बापालाहि मी भीत नाहीं!" आजी जवळ असल्यावर भय कुणाचें? तीच आजोबांना म्हणायची, "कां, कसं मिळालं उत्तर? जाल का पुन्हा त्याच्या वाटेला?"

आजोबांनीं अत्यंत वैतागून वडिलांना पत्र लिहिलेंच तर मी लगेच त्यांच्या अफूच्या डबीवर हल्ला करीत असें. आणि तें लिहिलेलें पत्र फाडून फेंकत नसत तोपर्यंत डबी द्यायची नाहीं. या उपद्रवांच्या भीतीनें विशेषतः अफूच्या तलफींत विघ्न येत आहे असें पाहून त माझ्या वाटेला जात नसत. मग मी देखील गुण्यागोविंदानें वागें.

पण सर्व सुखांना अखेर एक सीमा आहेच ना ? माझ्या बाबतींतहि तसेंच घडलें. आजोबांचे चुलत भाऊ गोविंद बाबू अलाहाबादेस नोकरी करीत होते, ते पेन्शन घेऊन गांवीं रहाण्यास आले. त्यांचा नातू रजनीकांतहि बी. ए. होऊन त्याच्या बरोबर आला. त्याला मी 'दादा' म्हणून हांक मारीत असें. अगोदर त्याची माझी अधिक ओळख नव्हती. कारण, तो सहसा गांवीं येत नसे. आणि मुख्य म्हणजे आमचीं दोघांचीं घरें निरनिराळीं होतीं. कधीं भेट झालीच, तर तो एवढेंच विचारायचा—"काय रे, कसा आहेस, काय शिकतोस ?" बस एवढेंच.

मात्र या खेपेला तो गांवीं आल्यावर घरीं बरेच दिवस राहिला. तेव्हां कारणपरत्वें माझ्याकडे त्याचें लक्ष जाऊं लागलें. लवकरच त्यानें माझ्यावर असा वचक बसवला, कीं त्याला बघतांच माझा थरकांप होई, छाती धडधडे, घसा कोरडा पडे,—जणुं मी एकादा अपराध केला असून त्याबद्दल मला शिक्षा होणार असेंच वाटे. आणि खरें म्हणाल तर त्यावेळीं माझ्याकडून अपराध घडतहि. करूं नयेत अशा कांहीं गोष्टी नि कांहीं ना कांहीं खोड्या करण्याचा माझा नित्य नेम होता.

दादाला मी इतका भीत असूनहि मला तो भारी आवडायचा. भाऊ भावावर इतकें प्रेम करूं शकतो हें अगोदर मला माहीत नव्हतें. तो देखील माझ्यावर खूप प्रेम करी. त्याचा मी कितीहि अपराध केला

असला तरी तो मला बोलत नसे. आणि कांहीं बोललाच, तर मी मनांत म्हणे कीं दादा आहे तो; जराशानें विसरून जाईल.

त्याच्या मनांत आलें असतें तर कदाचित् तो मला सुधारूंहि शकला असता. पण त्यानें या गोष्टींत लक्ष घातलें नाहीं. तो गांवीं आल्यामुळें माझ्या उनाडपणाला खो बसला खरा; तथापि मी मजेंतच होतों !

दररोज आजोबांच्या तंबाकूंतील एक पैशाचा तंबाकू चोरून ओढत असे. बिचारा म्हातारा माझ्या भयानें कधीं बाजेच्या नवारींत, कधीं बाजेखालच्या पेटींत, तर कधीं घराच्या छपरांत तंबाकू लपवून ठेवायचा. पण मी तो सगळा शोधून काढी नि ओढून मोकळा होई ! खावें प्यावें, पतंग उडवावा आणि मजेंत रहावें एवढेंच मला ठाऊक होतें. माझ्या मागें कसली दगदग नव्हती. शिकणें सवरणें तर एकप्रकारें सोडूनच दिलें होतें. पक्ष्यांना पकडी, खारींना मारून भाजून खाई नि रानावनांतून बिळांतील ससे शोधीत फिरे. ना कुणाचें भय, ना कसली काळजी !

वडील परगांवीं नोकरीस होते. तिथून ते मला पहाण्यास येत नसत, आणि मारण्यास तर मुळींच येणार नाहींत. आजा-आजींची गोष्ट अगोदरच सांगितली. तात्पर्य, मी अगदीं स्वतंत्र होतों.

एके दिवशीं दुपारीं घरीं आलों तेव्हां आजीकडून कळलें, कीं दादाबरोबर मला शिक्षणासाठीं कलकत्त्यास जावें लागणार. सावकाश पोटभर जेवून आजोबांची चिलीम घेऊन मी त्यांच्याकडे गेलों आणि त्यांना विचारलें, “ आजोबा ! मला कलकत्त्यास जावें लागणार हो ?”

आजोबा म्हणाले,“ होय !”

मला अगोदरपासून वाटत होतें, कीं हें सगळें कारस्थान म्हाताऱ्याचेंच असलें पाहिजे. मी म्हणालों, “असें आहे, तर आजच जातों.”

आजोबा हंसून म्हणाले, " त्याची तूं काळजी कशाला करतोस बाबा? रजनी आजच कलकत्त्याला जाणार. तिकडे खोली घेऊन ठेवली आहे, तेव्हां आजच रवाना झालं पाहिजे."

मी नुसता संतापलों. एकतर त्या दिवशीं आजोबांनीं लपवून ठेवलेला तंबाकू कुठें मिळाला नाहीं—एक चिलीम मिळाली, पण ती एका झुरक्यापुरती देखील नव्हती.—आणि वर ही चलाखी. पण स्वतःच कबूल करून फसलों होतों. तेव्हां माघार घेतां येईना. अर्थात् त्याच दिवशीं मला कलकत्त्यास जाण्यासाठीं घरून निघावें लागलें. निघतेवेळीं आजोबांच्या पायां पडतांना मी मनांत म्हटलें—देव करो नि उद्यांच तुझ्या श्राद्धानिमित्त मला परत यावें लागो! मग पहातों मला कलकत्त्यास पुन्हा कोण पाठवतो तें!

## २

त्या दिवशीं प्रथमच कलकत्त्यांत मी पाऊल ठेवलें. इतकें अजस्र नि चित्ताकर्षक शहर यापूर्वीं कधींच पाहिलें नव्हतें. मनांतल्या मनांत म्हटलें—जर कां विस्तीर्ण गंगेवरील पुलाच्या मध्यभागीं, किंवा डोल-कांठ्यांची दाटी झालेली दिसते त्या बाजूला गर्दींत एकदां मिसळून गेलों, तर घरीं परत जाण्याची आशाच नको! कलकत्ता मला मुळींच आवडलें नाहीं. इतक्या भयभीत मनःस्थितींत तें आवडणार तरी कसें? पुढें कधींकाळीं आवडेल असा विश्वासहि वाटेना!

कुठें आमच्या खेडेगांवांतील तो नदी किनारा, तीं वेळूचीं बेटें, बेलफळांचीं रानें, मित्रबाबूंच्या बागेंतील कोपऱ्यावरचें पेरूचें झाड! कांहीं म्हटल्या कांहीं नव्हतें इथें. केवळ उंच उंच हवेल्या, लांब रुंद सडका, उत्तमोत्तम गाडी घोडे आणि माणसांची चिक्कार गर्दी. घरांमागें अशी एक देखील बाग नव्हती, कीं जिथें लपून मी तंबाकू ओढूं

शकलों असतों. मला रडूं कोसळलें. डोळे पुसून मी स्वतःशींच म्हटलें, 'ज्यानं दांत दिले आहेत तो चणेहि देईल!'

कलकत्त्याला आलों. शाळेंत प्रवेश मिळाला. नीट रीतीनें अभ्यास करूं लागलों. थोडक्यांत मी गुणी बाळ बनलों. माझ्या गांवींहि ही बातमी पसरली.

दादानें नि त्याच्या दोस्तांनीं मिळून एक क्लब काढला होता. त्यांत आम्हीं चौघेजणच होतों. दादा, मी, रामबाबू आणि जगन्नाथबाबू. राम व जगन्नाथ बाबू दादाचे दोस्त. याशिवाय एक गडी नि एक आचारी पण होता.

आमचा आचारी गदाधर माझ्यापेक्षां तीन चार वर्षांनीं मोठा होता. असा सज्जन मनुष्य मी कधीं कुठें पाहिला नाहीं. आळींतील कुणाहि मुलाशीं माझें बोलणें चालणें झालें असेल तर शपथ. पण गदाधर अगदीं निराळ्या वृत्तीचा असूनहि माझा जानी दोस्त बनला. आमच्या गप्पागोष्टींना सुमार नसे. मिदनापुर जिल्ह्यांतील एका खेडे-गांवचा तो रहाणारा. तेथील गोष्टी आणि त्याच्या बाळपणची हकीकत वगैरे मला कितीतरी आवडली. त्या गोष्टी मी इतक्यांदा ऐकल्या, कीं त्याच्या त्या खेडेगांवांत माझे डोळे बांधून मला सोडलें असतें तरी मला वाटतें, सर्व जागीं मी खुशाल हिंडूं फिरूं शकलों असतों. रविवारीं मी त्याच्यासह किल्ल्याच्या मैदानांत फिरायला जात असें. सैंपाकघरांत बसून त्याच्याबरोबर दररोज पत्त्यांनीं खेळायचा. जेवण आटोपल्यावर आम्हीं दोघेहि त्याची छोटीशी गुडगुडी ओढत असूं. आळींतील कुणाहि मुलाशीं मी मैत्री केली नाहीं. माझा मित्र, सखा, सोबती, दोस्त—सर्व कांहीं गदाधरच होता. त्याच्या तोंडून अपशब्द निघालेला मी कधींहि ऐकला नाहीं. सगळेजण उगाचच त्याचा

अनादर करीत. परंतु तो म्हणून कुणाला प्रत्युत्तर देत नसे. जणुं तोच अपराधी.

सर्वांना जेऊंखाऊं घालून सर्वांच्या मागून सैंपाकघरांतील एका कोपऱ्यांत तो जेवण्यास बसे तेव्हां, कितीहि कामें असलीं तरी तीं सोडून मी तिथें नेमका हजर राहीं. बिचाऱ्याचें नशीबच असें, कीं मागाहून त्याला कांहीं उरत नसे. इतर पदार्थ राहूंद्याच, भात देखील कमी पडे. कुणी जेवीत असतां मी कधींच हजर राहिलों नसल्यामुळें पानावर बसल्यानंतर एकाद्याला अर्धपोटीं उठांव लागल्याचें मला माहीत नव्हतें. पण तें प्रत्यक्ष पाहून मला कसेंसेंच वाटलें!

मी लहान असतांना आजी कधीं कधीं मला उद्देशून म्हणायची, "बाळ, अर्धपोटीं राहून अगदीं किडकिडीत झालास बरं!" पण मी कधींच आजीच्या भाषेंत 'पोटभर' जेवूं शकलों नाहीं. किडकिडीत होवो नाहींतर वाळून जावो, 'अर्धपोटीं' राहणेंच मला आवडे. कलकत्त्याला आल्यावर मात्र तिच्या बोलण्यांतील अर्धपोटीं रहाणें नि हें अर्धपोटीं रहाणें यांत केवढा फरक आहे तें मला चांगलेंच समजलें.

कुणाला पोटभर जेवायला न मिळाल्यामुळें मला रडण्याचा आजपर्यंत अनुभव नव्हता. मी कितीदांतरी आजोबांच्या ताटांत उष्टें पाणी ओतून त्यांना जेवूं दिलेलें नाहीं. अनेकदां आजीच्या अंगावर कुत्र्याचें पिलूं सोडून तिच्या कामाचा खोळंबा केला आहे व तिलाहि जेवूं दिलेलें नाहीं! पण याबद्दल माझे डोळे कधींच ओले झाले नाहींत. आजी-आजोबा घरचीं माणसें, माझ्यावर अतिशय माया करणारीं मला आदरणीय पण त्यांना त्रास दिल्याबद्दल मला चुकूनहि वाईट वाटलें नाहीं. उलट, त्यांना अर्धपोटीं किंवा पूर्ण उपाशीं ठेवण्यांत मला आनंदी आनंद वाटायचा. आणि हा गदाधर कोणाचा कोण,—परंतु त्याच्यासाठीं माझ्या डोळ्यांतून आपोआपच टिपें पडत!

कलकत्त्याला येऊन मला असें काय झालें नकळे. डोळ्यांतून इतकीं टिपें पडतात कशीं तें समजेनाच. यापूर्वी कधींच रडलों नव्हतों. शाळेंत दांडगाई केल्याबद्दल मास्तरांनीं खजुरीची अक्खी छडी माझ्या पाठीवर फोडली तरी देखील मला ते रडवूं शकले नाहींत. मुलें म्हणालीं, "सुकुमारचं शरीर दगडासारखं घट्ट आहे बुवा !" मी मनांत म्हणालों,—'शरीर नव्हे, मन आहे दगडासारखं घट्ट ! मी नाहीं रडत लहान पोराप्रमाणं.' खरें म्हणजे रडायला मला भारी लाज वाटे. आजहि लाज वाटते. पण रडें आवरतां येत नाहीं. कुणीहि पहाणार नाहीं अशा जागीं लपून रडून घेतों नि डोळे पुसून मोकळा होतों !

मी शाळेला जाण्यास निघे तेव्हां वाटेंत भिकाऱ्यांच्या झुंडी दृष्टीस पडत; कुणाला हात नाहीं, कुणाला पाय नाहीं, तर कुणी आंधळाच असे कितीतरी प्रकारचे भिकारी मला आढळत. आजपर्यंत मला फक्त तेच भिकारी माहीत होते जे कपाळाला टिळा लावून टिमकी वाजवीत 'जय राधे' म्हणून भिक्षा मागतात. मग हे इतर भिकारी आले कुठून ? मनांत फारच कष्टी होऊन मी म्हणालों,—'देवा ! यांना माझ्या खेडेगांवीं पाठवून दे ना !'

दुर्दैवी भिकाऱ्यांची कहाणी राहूं दे. माझी गोष्ट सांगतों. मी डोळे खूप बिघडून घेतले, पण 'विद्या—सागर' होऊं शकलों नाहीं. खोडकर-पणांत मात्र पटाईत झालों होतों. घरांतील कुणाचे काय वाईट करतां येण्यासारखें आहे याचाच मी नेहमीं विचार चालवी. राम बाबूंनीं तासभर वेळ खर्चून आपल्या धोतराच्या निऱ्या काढून ठेवल्या होत्या. संध्याकाळीं फिरायला जातांना ते नेसणार होते. संधि साधून मी त्या विसकटून टाकल्या. संध्याकाळीं घरीं आल्यावर धोतराची ही दशा पाहून त्यांनीं थबकणच मारली ! तेव्हां माझा आनंद पोटांत मावेना !

जगन्नाथ बाबूंची ऑफिसांत जाण्याची वेळ झाली होती. घाईघाईनें

ते जेवीत होते. क्षणाचाहि विलंब त्यांना खपला नसता. हा प्रसंग साधून मी त्यांच्या शर्टचीं बटणें काढून घेतलीं, आणि शाळेंत जाण्यापूर्वी हळूच चोरून पाहिलें—बिचारे रडकुंडीस आले होते! रस्त्यानें मी आनंदानें नाचत हंसत गेलों. संध्याकाळीं ऑफिसांतून घरीं आल्यावर ते म्हणाले, "माझ्या शर्टचीं बटणें बेट्या गदाधरानेंच चोरून विकलीं आहेत. काढून टाका त्या पाजी मांणसाला." जगन्नाथ बाबूंचीं बटणें हरवलीं हें ऐकून दादा नि राम बाबू पोट धरून हंसले, "दादा म्हणाला," पुष्कळ प्रकारचे चोर आहेत बुवा; पण शर्टचीं बटणें चोरणारा कुणी ऐकीवांत नाहीं. दादाच्या या थट्टेनें अधिकच चिडून जगन्नाथ बाबू म्हणाले, "हरामखोरानं सकाळीं नाहीं, संध्याकाळीं नाहीं, रात्रीं—नेमकीं ऑफिसांत जाण्याच्या वेळींच बटणें चोरलीं बघा. माझी पुरीच फजीती केली कीं! एक फाटका मळकट शर्ट घालून ऑफिसांत जावं लागलं आणखी काय?"

सर्वांना हंसू आलें. जगन्नाथ बाबू पण हंसले. मी मात्र हंसू शकलों नाहीं. गदाधराला कदाचित् ते काढून टाकतील अशी मला भीति वाटली. तो अगदींच भोळसर होता बिचारा. कांहीं बोलला देखील नसता. त्यानें सर्व अपराध स्वतःवरच ओढवून घेतला असता.

बटणें कोणी घेतलीं तें दादाला बहुतेक समजलें असावें. गरीब गदाधराला कांहीं शिक्षा करण्यांत आली नाहीं. त्या दिवशीं मी प्रतीज्ञा केली, कीं दुसऱ्यावर खोटा आळ येईल असलें कृत्य पुन्हां कधींहि करणार नाहीं.

कुणाचें वर्तन कशा रीतीनें सुधारतें तें सांगतां येत नाहीं. मास्तरांच्या, आजोबांच्या किंवा दुसऱ्या अनेकांच्या खूप खटपटीनेंहि जी प्रतिज्ञा मी केली नसती, ती एका गदाधराकडे पाहून मला करावीच लागली. इतकीं वर्षें लोटलीं, त्या मुदतींत प्रतिज्ञेचा भंग झाला कीं काय तें

सांगतां येत नाहीं. एवढें मात्र नक्की सांगूं शकतों, कीं समजून उमजून मी कधींहि ती प्रतिज्ञा मोडलेली नाहीं.

आतां दुसऱ्या एका माणसाची गोष्ट सांगतों. आमचा एक रामा गडी होता. रामा जातीनें कायस्थ किंवा गवळी असाच कुणीतरी असावा. कुठला रहाणारा तें पण मी नीटसें जाणत नाहीं. त्याच्या-सारखा हुशार नि चटपट काम उरकणारा गडी मी कधींच पाहिला नाहीं. तो पुन्हा भेटला, तर त्याचा पत्ता मी अवश्य विचारून ठेवीन.

चरखा जसा गरगर फिरतो तसा रामा कामासाठीं इकडून तिकडे फिरत राही. आतां बघावें तर रामा कपडे धूत आहे, जराशानें बघावें तर दादा आंघोळ करत असून रामा त्याचें अंग चोळतो आहे, लगेच पुन्हा पाहावें तर रामा पानपट्टी करण्यांत गुंतलेला. तो सदोदित असाच गडबडघांईत असायचा. दादाचा तो 'फेव्हरिट्' होता. गडी चांगला. पण मला दृष्टीसमोर देखील नकोसा वाटे. त्या बेट्या-मुळें मला कितींदा तरी दादाकडून बोलून घ्यावें लागलें होतें. गदाधराला तर तो फारच भंडावून सोडी; आणि त्यामुळें मी जास्तच चिडलों होतों. पण करणार काय? तो पडला दादाचा 'फेव्हरिट्!' राम बाबूंना सुद्धां तो आवडत नसे. ते त्याला 'धी रूज' म्हणत. त्यावेळीं त्यांना स्वत:लाच या शब्दाचा अर्थ ठाऊक नव्हता. तरी पण आम्हांला पक्कें माहीत झालें, कीं रामा खरोखरच 'रूज' आहे! रामबाबूंच्या चिडण्याचीं कारणें अनेक होतीं. मुख्य म्हणजे, रामा स्वत:ला रामबाबू म्हणत असे. दादा देखील कधीं कधीं त्याला रामबाबू म्हणून हांक मारायचा. आमच्या रामबाबूंना हें खपत नसे.

एके दिवशीं संध्याकाळीं दादानें नवा दिवा विकत आणला. फारच किंमती वस्तु. पन्नास-साठ रुपये पडले असतील त्या दिव्याला. सगळेजण फिरायला गेल्यावर मी गदाधराला बोलावून तो दिवा-

दाखवला. त्यानें असा दिवा कधींच पाहिला नव्हता. आज तो पाहून त्याला आनंद झाला. त्यानें दोनतीन वेळां दिवा मागेंपुढें फिरवून पाहिला आणि तो आपल्या कामाला निघून गेला. पण माझी जिज्ञासा अजून पुरी झाली नव्हती. त्या दिव्याची चिमणी काढून मला आंतील भाग पाहावयाचा होता. मी दिवा खूप हालवला, चालवला, इकडे तिकडे फिरवून पाहिला पण चिमणी निघेना. सूक्ष्म निरीक्षण केल्यावर दिव्याच्या खालच्या बाजूस मला एक स्क्रू दिसला. अर्थात् मी तो फिरवल्यावांचून रहाणार कसा? तो फिरवत होतों इतक्यांत दिव्याचा खालचा भाग अलग झाला. घाईघाईत मी तो सावरूं शकलों नाहीं. चिमणी टेबलावरून खालीं पडली आणि तिचे तुकडे तुकडे झाले!

३

त्या रात्रीं फार उशीरां मी घरीं परत आलों. पाहतों तर, घरांत एकच गडबड उडालेली; सगळेजण गदाधराला घेरून बसलेले! दादा फारच चिडून गदाधरची खरडपट्टी काढत होता.

गदाधराच्या डोळ्यांतून टप् टप् टिपें पडत होतीं. तो म्हणाला, "बाबूजी, मी चिमणीला जरासा शिवलों खरा. पण मी ती फोडली नाहीं. सुकुमार बाबूनें मला ती दाखवली. मी आपली पाहिली. मग तो फिरण्यास गेला आणि मी सैंपाकाला लागलों."

कुणीहि त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला नाहीं. त्यानेंच चिमणी फोडली असें गृहित धरण्यांत आलें. त्याचा पगार बाकी होता, त्यांतून साडेतीन रुपये कापून घेऊन नवी चिमणी मागवण्यांत आली. पुन्हां दिवा लावला तेव्हां सर्वजण खूष झाले अगदीं. फक्त माझ्याच डोळ्यांची आग होऊं लागली. मला पुनः वाटूं लागलं कीं, जणुं त्याच्या आईचे साडेतीन रुपये मी चोरले!

मग तिथें मला रहावेना. रडूनरुसून मी दादाला राजी केलें आणि गांवीं आलों. आजीकडून रुपये आणून साडेतीनच्या बदलीं सात रुपये गदाधराला देण्याचा माझा विचार होता. त्यावेळीं माझ्याकडे एक पै देखील नव्हती. सगळे पैसे दादाकडे होते. म्हणून रुपयांसाठीं मला गांवीं यावें लागलें. तिथें एक दिवसाहून अधिक रहायचें नाहीं असा बेत होता. पण झालें अगदीं उलट. आजोबांचें श्राद्ध संपादण्याची वेळ आली नव्हती, तरी सात आठ दिवस तिथें मोडलेच.

सातआठ दिवसांनीं पुन्हा कलकत्त्याला आलों. घरांत पाय ठेवतां-क्षणींच मी हांक मारली–गदा! पण कुणीहि ओ दिली नाहीं. मी पुन्हा हांक मारली–गदाधर ठाकूर! या खेपेलाहि ओ मिळाली नाहींच. परत एकदां म्हणालों–गदा! इतक्यांत रामानें येऊन म्हटलें, "बाबू! कधीं आलास?"

"हा नुकताच येतों आहे. ठाकूर कुठें?"

"ठाकूर इथें नाहीं."

"कुठें गेला?"

"दादांनीं त्याला हांकलून दिलें."

"हांकलून दिलें! तें कां?"

"चोरी केली म्हणून!"

तो काय म्हणत होता तें अगोदर मला नीटसें समजलेंच नाहीं. त्यामुळें थोडा वेळ मी त्याच्याकडे नुसता पहात राहिलों. माझा मनोभाव ओळखून रामा किंचित् हंसून म्हणाला, "बाबू! इतकं आश्चर्यसं वाटलं तुला? तुम्ही कोणी त्याला जाणत नव्हतां, म्हणून तो तुम्हाला हवासा वाटे पण...."

मला कांहींच समजलें नाहीं. मी विचारलें, "त्यानें कुणाचें काय चोरलें?"

"दादांचे रुपये."

"कुठें होते रुपये?"

"कोटाच्या खिशांत."

"किती?"

"चार"

"कुणी पाहिलं त्याला चोरतांना?"

"आपल्या नजरेनं तर त्याला कुणी पाहिलं नाहीं पण पाहिल्यांतच जमा!"

"तें कसं?"

"अरे! त्यांत विचारतोस काय एवढं? तूं घरीं नव्हतास, राम बाबूनीं घेतले नाहींत, जगन्नाथबाबू कधींहि घेणार नाहींत, मी पण घेतले नाहींत,–मग रुपये गेले कुठें? कुणी घेतले सांग?"

"तूं त्याला पकडलंस काय?

राम हंसत म्हणाला, नाहींतर आणखी कोण पकडणार!"

अधिक बोलण्यांत मी वेळ घालविला नाहीं. सैंपाकघरांत जाऊन रडलों! गदाधरची ती छोटीशी काळी गुडगुडी कोपऱ्यांत धूळ खात पडली होती. गेल्या चारपांच दिवसांत तिला कुणी शिवला नव्हता, तिच्यांतील पाणी बदललें नव्हतें. भिंतीवर एके ठिकाणीं कोळशानें लिहिलेलें होतें,—सुकुमार बाबू मी चोरी केली हो. आतां इथून जातों. जिवंत असलों तर पुन्हा कधीं येईन!

तेव्हां मी पोरच तर होतों. अगदीं लहान पोराप्रमाणें त्याची ती गुडगुडी छातीशीं घट्ट धरून मी खूप रडलों!

मग त्या घरांत रहाणें मला आवडेनाच. संध्याकाळीं फिरून आल्यावर मी सैंपाकघरांत जाई, आणि दुसऱ्या सैंपाक्याला जेवण करतांना पाहून त्याच पावलीं परत येई. आपल्या खोलींत येऊन

अभ्यासाला बसें. पुढें दादा देखील मला दृष्टीसमोर नकोसा झाला. जेवणखाणहि रुचेनासें झालें.

* * * *

पुष्कळ दिवसांनंतर एका रात्रीं मी दादाला विचारलें, "दादा, तूं काय केलंस हें?"

"कुणाचं काय केलं मी?"

"गदानें तुझे रुपये मुळींच चोरले नाहींत. सगळ्यांना माहिती आहे कीं गदाधर माझा आवडता होता."

दादा म्हणाला, "हो, तें बरं झालं नाहीं सुकुमार. असो! व्हायचं होतं तें होऊन गेलं. पण रामा गड्याला तूं कां मारलंस?"

"अलबत् मारलं! काय मला देखील तूं हाकून देणार?"

माझ्या तोंडून असे शब्द निघालेले दादानें कधींच ऐकले नव्हते. मी पुन्हा विचारलें, "किती रुपये वसूल झाले तुझे?"

दादाला फार वाईट वाटलें. तो म्हणाला, "गोष्ट तर चांगली झाली नाहीं रे! त्याच्या पगाराचे अडीच रुपये साठले होते, ते सगळे कापून घेतले. असें करण्याची माझी इच्छा नव्हती."

मी सदान् कदा रस्त्यावर भटकूं लागलों. दूर अंतरावर कुणीहि मळकट पंचा नेसून आणि फाटक्या चपला घालून जातांना दिसला, कीं मी त्या त्याच्याकडे धांव घेतलीच म्हणून समजा. पण माझी मनीषा कधींच पुरी झाली नाहीं. माझी आशा नित्य निराशेंतच विलीन होत गेली. आणखी काय सांगूं!

सरासरी पांच महिन्यांनी दादाच्या नांवची एक मनीऑर्डर आली,— 'फक्त दीड रुपया'ची बरं! मी त्याच दिवशीं काय तें दादाला डोळे पुसतांना पाहिलें. त्या मनीऑर्डरचें कुपन अजूनहि माझ्याकडे आहे.

या गोष्टीला किती वर्षें झालीं कोण जाणें. पण आजहि गदाधर ठाकूर माझें अर्धें हृदय व्यापून बसलाच आहे!

# हरिचरण

त्या गोष्टीला आज बरेच दिवस होऊन गेले. दहाबारा वर्षांमागची गोष्ट. तेव्हां दुर्गादास बाबू वकील झाले नव्हते. दुर्गादास वंद्योपाध्याय यांस कदाचित् तुम्ही ओळखत नसाल. पण मी त्यांना चांगलेच ओळखतों. या, त्यांचा तुम्हाला परिचय करून देतों !

* * *

आईबापावांचूनचा एक अनाथ कायस्थ मुलगा. कोण जाणें कुठूनसा येऊन रामदास बाबूंच्या घरीं राहिला. सगळेजण म्हणाले कीं मुलगा अगदीं चांगला आहे. देखणा नि समजुतदारहि दिसतो. दुर्गादासाच्या वडिलांना—रामदास बाबूंना—पाहिजे होता तसा गडी मिळाला.

लहानमोठीं सगळीं कामें आपण होऊन करण्यास तो तयार असे. गाईला वैरण देण्यापासून रामदास बाबूंचे पाय दाबण्यापर्यंत सारीं कामें तो मोठ्या आवडीनें करायचा. नेहमीं काम करीत रहाण्यांतच त्याला गोडी वाटायची.

त्या मुलाचें नांव हरिचरण. मालकीणबाईला त्याचें काम पाहून बहुधा नवल वाटे. म्हणून ती कधींमधीं त्याला उगाचच रागें भरून

म्हणायची, "हरि, आणखी पण नोकर आहेत; ते करतील कामं. अजून तूं लहान आहेस. कशाला हाडं मोडून घेतोस विनाकारण ?" हरीला एक वाईट खोड लागली होती. हंसत रहाण्याचा त्याला कोण नाद ! तो हंसून म्हणत असे, "बाई, आम्ही बोलूनचालून गरीब माणसं. आम्हाला जन्मभर राबलंच पाहिजे. उगा बसून कसं चालेल ?"

अशा प्रकारें कामकाजांत, सुखदुःखांत आणि मायाममतेंत हरिचरणनें जवळजवळ एक वर्ष ढकललें.

* * *

रामदास बाबूंची धाकटी मुलगी सुरू पांचसहा वर्षांची होती. हरिचरणशीं तिची चांगली गट्टी जमली. या चिमुरड्या पोरीला तिची आई कांहीं धड दूध पाजूं शकत नसे. दूध पाजण्याच्या वेळीं या मायलेकींत खूप झोंबाझोंबी व्हायची. दूध पाजलें नाहीं, तर पोर रोडावेल या काळजीनें व्याकुळ होऊन सुरुबाळेची आई तिचे गालगुच्चे घेण्यास देखील कमी करीत नसे. इतकें करूनहि सुरू दुधाला शिवेल तर शपथ. पण हें काम हरिचरणच्या नुसत्या सांगण्यानें तेव्हांच होई.

असो.....आतां मुद्याची गोष्ट सांगतों.

दुर्गादास वीस वर्षांचा असतांनाची गोष्ट. तेव्हां तो कलकत्त्यांत शिकत होता. गांवीं येण्यांत त्याला अडीअडचणी फार. अगोदर बोटीनें प्रवास करा, मग पायवाटेनें चालावें;—आणि पायवाटहि सोईची नाहींच. यामुळें दुर्गादास सहसा गांवींच येत नसे.

पण बी. ए. झाल्यावर एकदांचा तो आला. तेव्हां त्याच्या आईची कोण धांदल उडाली. त्याला चांगलें चांगलें खाऊंपिऊं घालण्यास आणि त्याची उत्तम बदोस्त ठेवण्यास घरांतील सारीं माणसें सारखींच उत्सुक असत.

एक दिवस दुर्गादासानें विचारलें, " हा कायस्थाचा मुलगा आहे. त्याला आईबाप कुणी नसल्यामुळें तुझ्या वडिलांनीं ठेवून घेतलं. गड्यांचीं सगळीं कामं करतो तो. आणि आहेहि फार थंड स्वभावाचा. कुणी कांहीं बोलो, हा आपला रागावत नाहीं. बिचाऱ्याला जवळचं कुणी नाहीं बरं. मला कीं नाहीं भारी आवडतो."

दुर्गादास घरीं आल्यावर त्याला हरिचरणची एवढीच माहिती मिळाली.

अलीकडे हरिचरणला काम फार पडे. तरी तो नाखूष झाला नाहीं. मजेंतच राहिला. धाकट्या बाबूच्या—दुर्गादासाच्या—आंघोळीची तयारी करणें, त्याला लागेल तेव्हां पाण्याचा तांब्या आणून देणें, वेळेवर पानाचा डबा हजर करणें आणि गुडगुडी भरून देणें वगैरे कामें करण्यांत हँरिचरण तरबेज झाला होता. यामुळेंच दुर्गादास मनांत म्हणत असे, कीं छोकरा फार 'इन्टेलिजन्ट' आहे. मात्र जर कां हीं कामें हरिचरणनें केलीं नसतीं, तर दुर्गादासच्या पसंतीला तो निखालास उतरला नसता.

* * * *

एक दिवस दुर्गादास बाबूला बड्या मेजवानीचें आमंत्रण आलें. अर्थात् घरीं जेवण्याचें कारण नव्हतें. रात्रीं परत येण्यासहि उशीर होण्याचा संभव होता. म्हणून नित्याचीं कामें आटोपून झोपीं जाण्याविषयीं हरिचरणाला तो सांगून गेला.

रात्रीं धाकट्या बाबूचा बिछाना घालणें, तो अंथरुणावर पडला कीं त्याचे पाय दाबणें अशीं कितीतरी कामें हरिचरणलाच करावीं लागत. बाबू गाढ झोपीं गेला म्हणजे हरिचरण बाजूच्या खोलींत जाऊन निजे.

पण आज सांज होण्यापूर्वींच हरिचरणचें डोकें दुखूं लागलें. आतां ताप येण्यास अधिक उशीर नाहीं हें तो समजून चुकला. अधूनमधून

त्याला ताप यायचाच. त्यामुळें तापाचीं पूर्वलक्षणें त्याच्या चांगल्या परिचयाचीं झालीं होतीं. त्याला अगदींच बसवेना तेव्हां तो खोलींत जाऊन निजला. धाकट्या बाबूचा बिछाना आपण घातला नाहीं ही गोष्टच तो विसरला. रात्रीं सर्वांचीं जेवणें झालीं. पण हरिचरण जेवला नाहीं. त्याची मालकीणबाई त्याच्या समाचाराला आली. त्याच्या अंगाला तिनें हात लावला तेव्हां तिला फार कढत लागलें तें. त्याला ताप आला आहे हें ती समजली. म्हणून त्याचा जीव त्रासेल असें कांहीं न करतां ती निघून गेली.

रात्रीचे अकरा वाजले असतील. धाकटा बाबू मेजवानीहून परत आला. बघतो तर, बिछाना देखील घातलेला नाहीं. आधींच त्याला नीज येत होती. तरी कसाबसा घरीं येऊन पोंचला. घरीं गेल्यावर हरि आपला सूटबूट उतरून हळू हळू पाय दाबील, आणि गुडगुडीची नळी तोंडाला लावून त्या सुखासमाधानाच्या तंद्रींत सकाळपर्यंत खुशाल झोपीं जाऊं, असा वाटभर विचार करीत तो घरीं आला होता !

पण मनोराज्य भंग पावल्यामुळें त्याचा भडका उडाला. अत्यंत संतापून त्यानें मोठमोठ्यानें हांका मारल्या,—हरिचरण ! अरे हरि ह्न्या !—पण हरि आहे कुठें जाग्यावर ? तापानें फणफणत तो पडला होता. दुर्गादासला वाटलें, कीं तो झोंपी गेला. त्याच्या खोलींत जाऊन त्यानें पाहिलें. —खरंच, व्यवस्थीत चादर पांघरून तो निजला होता.

बाबूला हें सहन झालें नाहीं. त्यानें जोरानें हरीच्या झिंजोट्या पकडून त्याला उठवण्याचा प्रयत्न केला. पण तो जशाचा तसा पडून राहिला. तेव्हां तर बाबूच्या रागाला पारावार उरला नाहीं. त्याला मागचा पुढचा विचार न राहून त्यानें हरीच्या कंबरत बुटाची लाथ लगावली. त्या भयंकर आघातानें शुद्धीवर येऊन, हरि उठला.

दुर्गादास त्याला विचारतो, "लहान पोरासारखा झोपलास काय! आणि बिछाना कोण घालणार मी ? " इतकें बोलत असतांच त्याच्या रागाचा पारा आणखी चढला. आणि त्यानें हरीवर छडीचाही प्रयोग केला.

त्या रात्रीं हरि बाबूचे पाय दाबीत होता तेंव्हां बाबूच्या पायावर एक कढत अश्रु ठिपकला !

सारी रात्र दुर्गादासला नीज आली नाहीं. तो अश्रुबिंदु त्याला किती कढत लागला पण! तसें पाहिलें, तर हरिचरण दुर्गादासला आवडायचा. आणि दुर्गादासलाच कां, घरांतील एकूणएकाला तो आवडे.

त्या रात्रीं दुर्गादासला कितीदां तरी वाटलें, कीं एकवेळ जाऊन हरीला पहावें. पण हरि पडला नोकर; म्हणून तसें करणें ठीक दिसेना. कितीतरी वेळां त्याच्या मनांत आलें, कीं त्याचा ताप काढला किंवा नाहीं हें त्याला जाऊन विचारावें. पण लाज वाटूं लागली.

सकाळीं हरिचरणानें तोंड धुण्यासाठीं दुर्गादासला पाणी आणून दिलें. तेंव्हां तरी दुर्गादासनें दुःख व्यक्त करायचें. अजून हरि लहान पोर होता. त्याचें वय तें किती ? तेरा वर्षें सुद्धां त्याला झालीं नसतील. पोर समजूनच एकवेळ त्याला दुर्गादासनें जवळ बोलावून विचारायचें होतें,—कुठें मार बसला, कुठें रक्त निघालें का बुटाच्या लाथेनें कुठें सुजलें तर नाहीं ? पोराची लाज बाळगण्याचें कारण काय ?

नऊ वाजण्याच्या सुमारास कुठूनशी एक तार आली. तारेचें नांव ऐकतांच दुर्गादासबाबू विलक्षण घाबरला. तार फोडून वाचतो तर पत्नी फार आजारी असल्याची बातमी. त्याच्या काळजांत एकाएकी धडकी भरली ! त्याच दिवशीं त्याला कलकत्त्यास रवाना व्हावें लागलें. गाडींत चढतां चढतां तो स्वतःशीं म्हणाला,—देवा ! प्रायश्चित्त तर देत नाहींस ना !

जवळ जवळ एक महिना निघून गेला. इतक्या दिवसांनीं आज कुठें दुर्गादासबाबू आनंदित दिसला. कारण, त्याच्या बायकोचा पुनर्जन्म झाला होता! मरतां मरतां ती वांचली.

आजच दुर्गादासला गांवाहून पत्र आलें. त्याच्या धाकट्या भावानें लिहिलें होतें. पत्राच्या शेवटीं 'ताजा कलम' मध्यें पुढील मजकूर होता—

"कळविण्यास फार वाईट वाटतें, कीं दहा दिवस ताप येऊन काल सकाळीं आमचा हरिचरण वारला. मरण्यापूर्वी अनेकदां तुम्हांला पहाण्याची त्यानें इच्छा दर्शविली."

अहाहा! बिचारा आईबापावांचूनचा पोर! असें म्हणून दुर्गादास बाबूनें त्या पत्राचे चिटोरे करून टाकले.

IRBK-0102405

पुढील प्रकाशन

देवदास

लवकरच प्रसिद्ध होईल.

IRBK-0102405

IRBK-0102405